


# माणूस

६ एप्रिल १९६८
४० पैसे

# सेतु बांधारे सागरी..

मुंबईतील अपोलो बंदर येथे गेटवे-नजीक सिंधुसागरात देशी गव्हाचे प्रतिकात्मक अर्घ्य सोडून श्री कैलास ते सिंधुसागर या 'अन्न स्वतंत्रता संचलना'ची आज सांगता झाली व त्याचबरोबर स्वावलंबनाचे हे सूत्र अधिक निर्धाराने आचरण्याचा संकल्प सोडण्यात आला.

'माणूस' साप्ताहिकाचे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर यांच्या नेतृत्वाखाली २६ जानेवारीला हे संचलन वेरूळपासून सुरू झाले. 'परदेशांतून आयात केलेले धान्य नको, एकवेळ भूकबळी झाले तरी चालतील, पण भीकबळी नको' या स्वावलंबन-सूत्राचा प्रचार करीत ही मंडळी शुक्रवारी मुंबईत पोचली. आज अपोलो बंदरावर सिंधुसागरात गव्हाचे अर्घ्यदान करण्याच्या अनौपचारिक समारंभाने या संचलनाची सांगता झाली.

अर्घ्यदान करण्यात आलेल्या गव्हांना विशेष महत्त्व होते. उंबरगावच्या खेडुतांनी एकोप्याने गेल्या तीन वर्षांत खेड्यातील धान्योत्पादन चौपटीने वाढविले व मनावर घेतले तर भारतीय शेतकरी काय करू शकतो हे दाखवून दिले. याच शेतकऱ्यांनी गव्हाचे एक पोते अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सनसाहेब यांना पाठविण्यासाठी संचलन-पथकाच्या हवाली केले होते. त्यातलेच काही गहू आज समुद्रस्तृप्यंतु करण्यात आले. या पाठीमागची भावना श्री. माजगावकरांनी शब्दरूप केली. ते म्हणाले की, भारत अन्नधान्याबाबत केवळ स्वावलंबीच होईल असे नव्हे, तर धान्य निर्यातही करू शकेल.

तीन यंत्रनौकांतून सुमारे १५० मंडळी गेटवेनजीकच्या समुद्रात आतपर्यंत गेली व तेथे त्यांनी हे गव्हाचे प्रतिकात्मक दान केले. या अनौपचारिक समारंभाच्या प्रारंभी प्रसंगाला साजेसे 'सेतु बांधारे सागरी' हे गीत श्री. सुधीर फडके यांनी म्हटले. नंतर श्री. ज. द. जोगळेकर यांचे भाषण झाले.

बॉस्टनला चहाची जहाजे बुडवूनच अमेरिकेच्या स्वातंत्र्य लढ्यास सुरुवात झाली या घटनेचे श्री. जोगळेकर यांनी स्मरण करून दिले. ते म्हणाले की, "बॉस्टनच्या त्या प्रसंगापासून अमेरिकेत सामाजिक क्रांतीचे पर्व सुरू झाले. आज येथे काही अनामिक मंडळींनी गव्हाचे मूठभर दाणे समुद्रात टाकून स्वाभिमान जागविणाऱ्या नव्या सामाजिक क्रांतीचा ओनामा घातला आहे.

गेल्या काही शतकांतील सततच्या पराभवाने आमच्या समाजात निर्माण केलेली दुखणी आम्हांला दूर करायची आहेत. स्वतंत्रतेचे हे सूत्र अन्नाप्रमाणेच इतर क्षेत्रांतही अवलंबिले पाहिजे," असे श्री. जोगळेकर यांनी सांगितले.

या कार्यक्रमास चित्रपट निर्माते के. असिफ, पत्रकार परिषदेचे अध्यक्ष श्री. कांतिलाल गुजराथी, श्री. दामोदरदासजी मुंदडा, श्री.पंढरीनाथ रानडे, श्री. माणिकचंद देवडा, श्री. विद्याधर पुंडलीक, श्री. यदुनाथ थत्ते, श्री. दि. वि. गोखले आदी मंडळी उपस्थित होती. □

**महाराष्ट्र टाईम्स—१ एप्रिल १९६८**

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : पंचेचाळिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

---

**स. न.** मार्च २७

'अन्न स्वतंत्रता संचलन'च्या उपक्रमाबद्दल आपले अभिनंदन. या उपक्रमाला जनतेकडून अपेक्षित असा प्रतिसाद मिळेल का नाही या विषयी माझे मन साशंक होते. पण 'प्रतिपच्चंद्ररेखेव' प्रमाणे होणारी प्रगती पाहून शंका कुठल्या कुठे पळून गेली. संचलनात सहभागी होण्याची तीव्र इच्छा असूनही दूर खेडेगावात राहत असल्यामुळे पूर्ण होऊ शकत नाही.

**विजयकुमार जतकर**, उमदी

माझे २३ मार्चच्या अंकातील पत्र, मूळचे मोठे असल्याने कमी करून छापले आहे असे दिसते. पण त्यामध्ये माझ्या विचारांवर अन्याय झाला आहे. पत्राच्या शेवटी ज्या दोन ओळी घातल्या गेल्या आहेत त्या आधीच्या विचारांशी विसंगत आहेत. मी जो नागालँडमधला प्रसंग सांगितला तो अनाठायी भावनिक आवाहनाला विरोध दर्शविण्याकरता आहे. मी पुढे एवढेच मान्य केले होते की ऋण फेडण्यासाठी नाही, पण आपण मदत स्वीकारून दाखविलेल्या बेशरमपणाचे प्रायश्चित्त म्हणून खाऊ पाठवावा पाहिजे तर. एरवी या अन्नप्रश्नाची कठोर राष्ट्रवादी भूमिकेनेच सोडवणूक होऊ शकेल.

**अजीत पटवर्धन**, पुणे

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

---

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# एका वाटेवरच्या गावी

**वि. ग. कानिटकर**

शहापूर, जि. ठाणे. मुंबई–नासिक रस्त्यावर, नासिककडे जाताना, असनगाव स्टेशनाचे फाटक ओलांडल्यावर दोन मैलांवर लागणारे छोटे गाव. सिंधूसागराच्या दिशेने चालत निघालेला माझा एक मित्र दि. १९ ला कसाऱ्याला येऊन पोचला होता. वेरूळच्या कैलास लेण्यापासून २६ जानेवारीला त्याने प्रस्थान ठेवले तेव्हा त्याला निरोप देण्यासाठी अनेकजण जमले होते त्यांत मी होतो. भव्य–दिव्य कैलास लेण्यापुढेच. इतके भव्य आणि उदात्त अन्यकाही या पूर्वी घडले होते की नाही कुणास ठाऊक ? ना. ग. गोरे तेव्हा म्हणाले होते, "खोटया गोष्टीचा अभिमान बाळगणारा माणूस मी नाही. परंतु परकीय धान्य मदतीवर अवलंबिलेले लाजिरवाणे जिणे आता नको, हा स्वाभिमानाचा पहिला जाहीर ललकार, या माझ्या महाराष्ट्रातूनच यावा याचा मला निश्चित विशेष अभिमान वाटतो."

जवळ जवळ दोन महिने या घटनेला झाले होते. संचलन खेडयापाडयांतून पुढे सरकत पैठण–संगमनेर–नासिक मार्गे आता अगदी माझ्या वास्तव्याजवळ कसाऱ्यापर्यंत आले होते. मुंबई–पुण्याची वृत्तपत्रे या संचलनाच्या बातम्या तुरळक

देत होती. ' जमिनीच्या मांडणावरून खून ' किंवा 'मंत्र्याचा नेत्रदीपक सत्कार' अशा बातम्यांच्या माऊगर्दीत कुठेतरी संचलन सरकलेले—की—सरकवलेले दिसत होते. लाचारीचे आवाज वृत्तपत्राची पहिली पाने अडवीत होती. ९० टक्के कच्छ जिकल्याच्या बातम्यांत वृत्तसृष्टी मश्गुल होती आणि अन्न स्वतंत्रता संचलनाचा स्वाभिमानाचा क्षीण सूर गुदमरून पडला होता. नाही म्हणायला ' केसरी ' पत्रात साप्ताहिकी आवृत्तीत ' अन्नासाठी दाही दिशा ' काही प्रमाणात श्री. दि. बा. मोकाशी उजळवीत होते. परंतु त्यातून संचलनाची नेमकी खुशाली कळत नव्हती.

संपादन सोडून भाषण पत्करलेले ' आक्रंदन ', वृत्तपत्रांतून काही पूर्वहिशेब करून कसे गाजवावे याचे आडाखे संचलनाला निघण्यापूर्वी तयार केलेले नव्हते. त्याचा हा परिणाम आहे, हे कळवळून सांगणारी अनेक मंडळी मला भेटली. परंतु अन्नब्रह्माच्या भयानक दर्शनाने अस्वस्थ झालेल्या माझ्या मित्राने हे हिशेब केले नाहीत, याचे मला मुळीच दुःख वाटत नव्हते. स्वातंत्र्यापूर्वी सामान्य स्वाभिमानी माणसावर सत्ताधारी गोळ्या झाडीत होते, तेव्हा हौतात्म्याचे हिशेब करून माणसे थोडीच छाती पुढे काढीत होती. आता सामना आहे तो कधी ' गोळी ' विरुद्ध परंतु प्रत्यही ' झोळी विरुद्ध ! गोळी लागली तर रक्त वाहते. रक्ताचे ते दर्शन जनतेला हौतात्म्य जाहीर करते. परंतु झोळीविरुद्ध, भिक्षांदेहीविरुद्ध आवाज कसा घुमवायचा ? झोळीत प्रत्यही भिक्षा पडत असताना, झोळी टाक असे कळवळून सांगितले तरी हा माणूस वेड्यात काढण्याची शक्यताच अधिक होती.

उद्ध्वस्त झालेल्या नगरात पाऊल टाकताच. ' काय हो हे घडले ?' म्हणून हुकमी गळा काढल्यानंतर पुढच्याच प्रश्नात " वार्ताहर कुठे दिसत नाहीत ?" असा आस्थे-वाईक धोरणी प्रश्न सहजी बाहेर यावा इतका बेडरपणा माझ्या या मित्रात नाही हे मला ठाऊक होते. स्वतःच्या साप्ताहिकात गेल्या सहा वर्षांत आत्मप्रसिद्धीच्या दोषाच्या भयाने स्वतःचे छायाचित्र वा अगदी निकटच्या प्रियजनांच्या मृत्यूची श्रद्धांजलीदेखिल न छापणारा त्याचा भिडस्तपणा मला माहीत होता. म्हणूनच ' माणूस ' साप्ताहिकात संचलनाची छायाचित्रे ज्या पद्धतीन येऊ लागली, तेव्हा मी काहीसा विषण्ण झालो होतो. आशा एकच होती की छायाचित्रांचे विषय लवकरच पालटतील. सुदैवाने ते लगेचच पालटले होते. " आम्ही लवकरच ख्रिस्ती होणार " असे म्हणणाऱ्या बांधवांची छायाचित्रे प्रसिद्ध होऊ लागताच मला वाटणारी भीती आता संपली होती.

—आणि इतक्या ' असंग्रह ' वृत्तीने जगायला हा माझा मित्र कुणी आचार्य नाही की आजन्म ब्रह्मचर्याश्रमाने कोरडा झालेला ' पाषाण ' नाही. ज्या वयात ' पदर-यात्रा ' सुटू नये त्या वयात ही पदयात्रा त्याने पत्करली आहे. छोट्या मुलांची आठवण यावी इतपत त्याचीही मुले गोड आहेत. पत्नीची फक्त आठवण यावी याहून तो अधिक ' रसिक ' आहे. कदाचित पदयात्रेच्या या नेतृत्वातील बदलामुळेच

लोकांना चुकल्यासारखे तर होत नसेल ? दाढी वाढलेली नाही, उपासतापास नाहीत, खेड्यात 'अभक्ष्य' पुढे आले तरी हा नाही म्हणेलच अशी शाश्वती नाही, अंगावर जाडभरडे काही नाही, यजमानाच्या घरी मुक्काम पडल्यावर आकाशवाणीवर वसंतराव देशपांड्यांचे 'शूरा मीं वंदिले' सुरू असले, तर भेटायला आलेल्यांकडे दुर्लक्ष करू शकणारा हा कसला पदयात्रिक, म्हणून लोक बिचकले तर नाहीत ?

श्री. माजगावकरांच्या वाटेवरचा हा गाव लहान. मुंबईहून पन्नास मैलांवर असल्याने खेड्याशी सोयरीक सांगणारा. भातशेतीची आगरे अंगावर मिरवणारा. यंदा पीकपाणी चांगले आल्याने विशेष खुषीत असलेला. सोनार आळी, तांबट आळी, जैन आळी, ब्राह्मण आळी, अशा गावावर 'अळचा' पडूनही वृत्तीने खेळीमेळीत वावरणारा–काहीसा रांगडा ! हजार विद्यार्थ्यांचे हायस्कूल, आग्रारोडवरची 'शहरी' नाती सांगणारी उपाहारगृहे आणि गावातली दोन–तीन स्वच्छ मंदिरे ही इथल्या गावकऱ्यांची स्थावरसंपदा ! बालकमंदिर आहे पण अजून 'कॉन्व्हेंट' नाही. तमाशाचा तंबू क्वचित असला तरी सिनेमा थिएटर महिन्यांतून ७–८ वेळा गच्च भरते. सध्या लग्नसराई असल्याने दुपारच्या तापत्या उन्हात टांग्यांच्या गर्दीतून वाट काढीत, बैलगाड्यांतून खेडुतांची वऱ्हाडे सरकत असतात. ऐन उन्हात गाणी गात बैलगाडीतून जाणाऱ्या खेडूत स्त्रिया अर्ध्या तोंडावर पदर ओढून किनऱ्या आवाजात लक्ष वेधून घेतात. अशा या ६–७ हजार वस्तीच्या गावात संचलनाचे स्वागत कसे होईल ?

पुरंदऱ्यांची शिवचरित्रावरील व्याख्याने इथे, तीन महिन्यांपूर्वी झाली तेव्हा इथे लोटणारी गर्दी मी पाहिली होती. शिवाजीमहाराज हे आज मतलबी राजाश्रय लाभलेले वाजते–गाजते दैवत झाले आहे. पुरंदऱ्यांच्या व्याख्यानांची शतमुखाने प्रसिद्धी झाली आहे. परंतु 'परकीय धान्य मदत झुगारा आणि भारत उभारा' ही घोषणा देण्याकरता येणाऱ्या व्यक्तीला हे 'अवधान' लाभेल की नाही? मी तरी साशंक होतो.

दिनांक २२ ला संचलन शहापूरला येणार होते. बाबा गुजराथी हे इथले 'माणूस'चे वाचक. पोरगेलासा हा माणूस, धनवान असेल अशी कुणाला वेषावरून शंकादेखील येणार नाही. पोटावर हात फिरवीत नुसती माडी गोळा केली, तरी तीन-चार पिढ्या सुखात जातील, असा धंद्याचा व्याप आहे. परंतु त्यांचे मन याहून मोठे आहे. दि. १९ बाबा भेटला. म्हणाला, "माजगावकर तुमचे स्नेही आहेत. संचलन इथे दोन दिवस राहिले पाहिजे. मुंबई–पुण्याहून काही साहित्यिकांना व पुढाऱ्यांना बोलावू. शनिवारी संचलनाचा मुक्काम इथे असला तर ते सुलभ होईल."

संचलनाचा मार्ग व मुक्काम ठरलेला आहे, वगैरे माझ्या अडचणी त्यांनी ऐकल्या नाहीत. म्हणाला, "माझ्याकडे वाहन आहे. आपण कसाऱ्याला आजच त्यांना भेटू."

दिनांक १९ ला सायंकाळी आम्ही कसाऱ्याला गेलो. बरोबर डॉ. सोमणही होते. गावातली सभा आम्ही पोचलो तेव्हा संपलेली होती. जंगल सोसायटीच्या कार्या-

लयात संचलन उतरलेले होते. आदिवासी भागात जंगल सोसायट्या व आदिवासींच्या आश्रम पद्धतीच्या शाळा चालवणारे आचार्य भिसे, यांनी माजगावकरांना ताब्यात घेतलेले होते. शहापूरला संचलन एक दिवस अधिक राहील, ही गोष्ट माजगावकरांनी मान्य केली. संचलनात सामील झालेले नवे मित्र होते विनायकराव पाटील. निफाड तालुक्याचा सभापति. तानाजी छाप मिशांचे झुपके असूनही विनायकरावजी स्वभावाने राजा होते. त्यांच्या जवळचे एक एक किस्से ते सांगू लागले— की वेळ कसा जातो, याचा अनुभव पुढे शहापूरला आला. छाया चित्रकार मोरे लुंगी नेसून पुढे नकला करण्यासाठी मसाला जमवीत होते. नारायणगावहून श्री. रा. सबनीस आलेले होते. युरोपखंड भटकून व इस्रायलमध्ये काही महिने राहून आलेले असल्याने त्यांच्यापाशीही गप्पांचा खजीना होता. ' ठेविले अनंते ' ही मोकाशींची मूळ वृत्ती वहराला आलेली दिसत होती !

आम्ही परतलो तेव्हा रात्र झाली होती. त्याच रात्री बाबा गुजराथी पायी हिंडू लागला. संचलनाच्या स्वागताची चक्रे फिरू लागली. संचलनाचा मुक्काम येथील शाळेचे कर्तबगार मुख्याध्यापक प्रा. शेवडे यांच्याकडे ठरला. गोपालजी ठक्कर, गजाननराव गुजरे, अण्णासाहेब परांजपे, यांच्यावर संचलनासंबंधीची छोटी–मोठी कामे सोपवण्यात आली. पत्रके वाटली होती. गावाला कळले—माजगावकर नावाचे ' माणूस ' साप्ताहिकाचे संपादक, " अन्न स्वतंत्रता संचलन " घेऊन गावात दि. २२ ला येणार आहेत. दि. २३ ला रात्री खाडे विद्यालयाच्या पटांगणात सभा आहे. अध्यक्ष आहेत— ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पां. सि. देशमुख.

दि. २१ ला रात्रीच मोकाशी माझ्या खोलीवर आले. म्हणाले— " अटगावला आम्ही उतरलो आहोत. तिथे लिहिण्याची सोय नाही. रात्रीं इथे लिहितो म्हणजे मजकूर उद्या पोस्टात पडेल. "

" मला ठाऊक होते हा गोष्टीवेल्हाळ माणूस आजही इथे लिहिणार नाही. झाले तसेच. रात्री गप्पा रंगल्या. मोकाशी आपल्या या संचलन यात्रेबरोबरच्या प्रवासांतील हकिगती सांगत होते. काही कडू काही गोड. ' एका चळवळीचा जन्म ' ते जवळून पाहत होते. आणि पुढारीपणाचाही ! विचाराची बांधणी कशी होते ? उच्चारांत विवक्षित शब्दप्रयोग कसे पक्के होत जातात ? कुणाकडून काय काय उचलले जाते ? गावात संचलन शिरले की गाव कसा दचकतो ? आपल्याकडे आता लोक नेतृत्त्वाच्या अपेक्षेने पाहत आहेत अशी जाणीव होताच माणसाच्या वागणुकीत काही फरक पडतात ते का ? अलिप्त वृत्तीने एखाद्या चळवळीचे किती व्यवच्छेदन होऊ शकते हे मोकाशींकडून ऐकताना मी भांबावलो. या संचलनाच्या हेतूविषयी तरी या लेखक मित्राला सहानुभूती आहे का नाही, अशी शंका यावी, इतकी ही अलिप्तता मला पचवणे कठीण जात होते. परंतू साहित्यिकाची चव

[ पृष्ठ ६२ वर ]

# मुंबई महापालिकेची निवडणूक

दिल्ली दरबार

महापालिकांच्या वा नगरपालिकांच्या निवडणुका हा सामान्यत: त्या त्या शहरांतील नागरिकांच्या उत्सुकतेचा विषय असणे, स्वाभाविक असते. अशा निवडणुकांकडे साऱ्या देशाचे लक्ष लागलेले आहे, असे सहसा घडत नाही. परंतु काही वेळेला याच निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. गेल्या वर्षी सार्वत्रिक निवडणुकांच्या सुमारास दिल्लीच्या महानगर मंडळाच्या निवडणुका झाल्या आणि त्या निवडणुकीत काँग्रेस आणि जनसंघ यांत कोण विजयी होतो, याबद्दल साऱ्या देशात उत्सुकता व्यक्त केली जात होती. गल्या आठवड्यात पार पडलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीबाबतही असेच घडले.

याचे कारणही साधे आणि सरळ होते. गेल्या वर्षापासून श्री. बाळ ठाकरे यांची शिवसेना मुंबईच्या राजकीय प्रांगणात उतरली असून या वेळी ती प्रथमच निवडणुका लढवीत होती. महाराष्ट्रीय माणसाला मुंबई शहरात निर्वासितांसारखे कुचंबलेले जीवन जगावे लागत आहे, ही 'शिवसेने'ची तक्रार असून तिच्या निवारणार्थ झगडण्यासाठी 'शिवसेने'चा अवतार झालेला आहे, असे तिचे प्रवक्ते सांगतात. प्रारंभी केवळ दक्षिण भारतीयांवर राग व्यक्त करणाऱ्या या संघटनेने महाराष्ट्रीय माणसाची सर्व दुखणी दूर करणे, हे आपले ध्येय आहे, असे सांगावयास प्रारंभ केला आणि त्याबरोबर आर्थिक व सामाजिक दृष्टीने उपेक्षित जीवन जगत असलेला मुंबईतील मराठी भाषिक कामगारवर्ग आणि

मध्यमवर्ग ' शिवसेने 'कडे खेचला गेला.

ठाणे नगरपालिका ' शिवसेने 'ने जिकल्यानंतर या संघटनेची गंभीर दखल घेतली पाहिजे, असे प्रधानमंत्र्यांपासून मद्रासच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांनाच वाटू लागले. अशी ही अल्पावधीतच नावारूपाला आलेली शिवसेना मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उतरल्यामुळे तिला किती यश मिळते, याकडे साऱ्या देशाचे व विशेषत: दक्षिण भारताचे लक्ष लागणे, स्वाभाविक होते. या निवडणुकीत ' शिवसेने 'ने चाळीस जागा जिंकून मराठी जनमानसात आपण किती लोकप्रिय आहोत, हे निखालस सिद्ध केलेले आहे. काँग्रेसच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून शिवसेना आता मुंबई महापालिकेत जाऊन बसली आहे.

## राजकीय स्वरूप

तसे पाहिले तर महापालिकांच्या निवडणुकांना राजकीय स्वरूप येण्याचे काहीच कारण नाही. निवारा, आरोग्य, वाहतूक आदी दैनंदिन गरजांच्या प्रश्नांचा विचार करणारी यंत्रणा असे महापालिकांचे आणि नगरपालिकांचे स्वरूप आहे. त्यामुळे लोकसेवेची आवड असणाऱ्या व्यक्तींनी या निवडणुकीत भाग घ्यावा आणि कोण अधिक निस्पृह वृत्तीने आणि कार्यक्षम रीतीने नगराची सेवा करील, याचा विचार करून लोकांनी आपल्या प्रतिनिधींना निवडून द्यावे, असे याचे स्वरूप असावयास हवे. परंतु आपल्याला कोणताही प्रश्न वा यंत्रणा राजकारणाच्या कक्षेत गोवल्यावाचून चैन पडत नाही. सहकारी बँकांच्या निवडणुका असोत किंवा स्थानिक स्वराज्याची चिंता वाहणाऱ्या जिल्हा परिषदा, महापालिका यांच्या निवडणुका असोत, त्या राजकीय भूमिकेवरूनच लढविण्याचा आपला आग्रह असतो. त्यामुळे साहजिकच सर्व राजकीय पक्ष या निवडणुकांमध्ये मोठ्या अहमहमिकेने भाग घेत असतात.

मुंबई महापालिका अस्तित्वात आल्यापासून १९५७ पर्यंत तेथे काँग्रेस पक्षाचेच निर्विवाद बहुमत असे. १९५७ साली संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन जोरात असल्यामुळे काँग्रेसेतर पक्षांनी स्थापन केलेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई महापालिकेच्या निवडणुका लढविल्या व त्यात तिला भरघोस यशही आले. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर समितीचे कार्य संपले व तत्काल तिची लोकप्रियता ओसरू लागली. त्यामुळे १९६६ च्या निवडणुकीत समितीला फारसे यश लाभले नाही. तरीही दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून समिती मुंबई महापालिकेत वावरत होती. १९६२ च्या फेब्रुवारीत निवडणुका झाल्या आणि त्यानंतर आठ महिन्यांनी चिनी आक्रमणाचा आपल्याला अनुभव घ्यावा लागला. या आक्रमणाने आपल्याला अनेक चांगले धडे शिकविले. त्यातली एक चांगली गोष्ट म्हणजे कम्युनिस्टांच्या राष्ट्रद्रोही स्वरूपाची लोकांना नीट कल्पना आली. चीनने भारतावर आक्रमण केले आहे की नाही हे ठरविण्यासाठी या पक्षास सहा महिन्यांचा काळ लागला यावरून या पक्षाच्या धोरणाचे सूत्रचालन कोण करते हे समजून आले.

रशिया आणि चीन यांच्यात कुरबुरी सुरू झाल्यानंतर भारतातल्या कम्युनिस्ट पक्षाचीही दोन छकले झाली आणि त्यातल्या रशियावादी गटाने कालांतराने चिनी आक्रमणाचा सोईस्कर धिक्कार करण्यास प्रारंभ केला. चीनवादी कम्युनिस्ट तर हा भारत-चीन सीमावाद वाटाघाटी करून मिटविला पाहिजे असा उपदेश करू लागले.

या साऱ्या घटनांमुळे लोकमानसातून धिक्कारल्या गेलेल्या कम्युनिस्ट पक्षाला कोणत्यातरी चळवळीची संधी साधून पुन्हा आपले बस्तान बसविणे आवश्यक वाटत होते. बळगावचा प्रश्न भिजत पडला आहे हे पाहून महाराष्ट्रातल्या कम्युनिस्टांनी संपूर्ण महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात पुढाकार घेतला. या समितीमुळे आपल्याला लोकांपुढे जाताना संकोच वाटणार नाही व लोकही आपल्याला आसरा देतील हाच निखळ व्यावहारिक दृष्टिकोन कम्युनिस्टांनी समितीच्या निर्मितीत पुढाकार घेताना स्वीकारला होता. अशी ही नवी समिती बेळगावचे नाव घेऊन मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उतरली होती.

## शिवसेनेचे यश

या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला सर्वांत अधिक जागा मिळणार हे सर्वांनाच माहीत होते. दुसऱ्या क्रमांकाच्या जागेबाबत तेवढी चुरस होती. समिती नि शिवसेना असा लढा होता आणि या लढतीत ठाकरे यांच्या शिवसैनिकांनी समितीच्या लाल सैनिकांचा पुरा फजितवाडा करून टाकला. मुंबईतील गिरणीकामगार वर्ग आपल्या हाताशी आहे या भ्रमात वावरणाऱ्या कम्युनिस्टांचा आता तरी भ्रमनिरास व्हायला हरकत नाही. १९५७ साली भाषिक विद्वेषाचा पदर धरूनच समितीने यशःसोपानावर पाय ठेवला होता. दहा वर्षांनी ठाकरे यांनी त्याच पदराचा आधार घेऊन महापालिकेच्या प्रांगणातून समितीची हकालपट्टी केली आहे. १९५७ साली मुंबई डावी होती आणि १९६८ मध्ये ती उजवी झाली. या कम्युनिस्टांच्या कांगाव्यात काहीही अर्थ नाही. समितीमुळे संपूर्ण महाराष्ट्र मिळल असे वाटल्यामुळे मुंबईतील मतदारांनी त्या वेळी समितीच्या उमेदवारांचे ' कुल-शील ' न पाहता तिला डोक्यावर घेतले. आज या मतदारांना आपल्या गाऱ्हाण्यांना ' शिवसेना ' वाचा फोडील असे वाटत असल्यामुळे त्यांनी आपली मते ' शिवसेने 'च्या पेटीत टाकली. मुंबईतील कामगार वर्गाचे केवळ आपणच प्रतिनिधित्व करतो हा लालभाईंचा दावा या निवडणुकीने खोटा ठरविला आहे.

वस्तुतः या लालभाईंना बेळगाव–कारवारचे बिलकुल सोयरसुतक नाही. राष्ट्र न मानणाऱ्या या मंडळींना एखादे शहर या राज्यात आहे की दुसऱ्या राज्यात आहे याचा विचार करण्याचे कारण नाही. तसा ते विचारही करीत नाही. परंतु बेळगाव–कारवारचे नाव घेतल्याशिवाय लोकांपुढे आपल्याला जाता येत नाही हे कळल्यानंतर ही मंडळी संयुक्त आघाडीचे परिचित राजकारण खेळू लागली. या संधिसाधू

राजकारणाचा मुंबईतील मतदारांनी बुरखा फाडला. ही माझ्या दृष्टीने समाधानाची गोष्ट आहे.

मात्र त्याबरोबरच शिवसेनेच्या प्रवक्त्यांची आताची भाषणे वाचल्यानंतर ' शिवसेने 'च्या वाढीमुळे भारतीय एकात्मतेला तडे जाण्याचाच अधिक संभव आहे हेही मान्य करावयास हवे. केवळ इतर भाषिकांविरुद्ध विद्वेष पसरवून मुंबईतील मराठी माणसाचे आर्थिक प्रश्न सुटणार आहेत काय, याचा ' शिवसेने 'च्या सूत्रधारांनी विचार केला पाहिजे. समजा, उद्या मुंबईतील दक्षिण भारतीय नागरिक मुंबईतून बाहेर पडले की मराठी कामगारांची आणि कारकुनांची आर्थिक दुरवस्था दूर होणार आहे काय ? शिवाय द्रविड मुन्नेत्र कळघमने याच मागणीचा पुकारा करून नोकरी-धंद्यासाठी मद्रास राज्यात गेलेल्या तीन साडतीन लाख महाराष्ट्रीय नागरिकांना मद्रास राज्याबाहेर जायला सांगितले तर त्यांची आपण कोणती सोय करणार आहोत ? मुंबईतील महाराष्ट्रीय नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी आपण जर दंगल आणि लूटमार ही साधने वापरणार असलो तर मग महाराष्ट्राबाहेर कारखाना वा दुकान स्थापन केलेल्या मराठी भाषिकांच्या मालमत्तेला तेथील स्थानिक नागरिकांनी हात लावला तर आपण आपल्या या बांधवांना कोणते संरक्षण देणार आहोत ?

## नवी जबाबदारी

मुंबई महाराष्ट्राची आणि मुंबई महाराष्ट्रीयांचीच या घोषणेतील फरक ' शिवसेने 'च्या चालकांनी ध्यानात घेतला पाहिजे. मराठी माणसाच्या भावनांना आवाहन करून महापालिकेच्या निवडणुकीमध्ये भरघोस यश संपादन करणाऱ्या ' शिवसेने 'ने सर्व समस्यांचा साकल्याने आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या भूमिकेवरून विचार केला नाही तर केवळ मुंबई महापालिकेत प्रभाव गाजवून आपण आपल्या समस्यांची उकल करू या विश्वासाला अर्थ उरणार नाही. उलटपक्षी आज ठिकठिकाणी ज्या भाषिक आणि प्रादेशिक प्रवृत्ती उफाळून येत आहेत त्यांनाच आपणही आपल्या शक्तीनुसार खतपाणी घातले एवढीच ' शिवसेने 'ला कबुली द्यावी लागेल. तात्कालीन यशामुळे मूळ प्रश्नांचा विसर पडला तर केवळ एक स्टंट या पलीकडे शिवसेनेच्या कार्याचे स्वरूप राहणार नाही. मुंबईतील मराठी माणसाची गाऱ्हाणी दूर होणे अगत्याचे आहे. परंतु ही गाऱ्हाणी दूर करण्याच्या प्रयत्नात तो जसा मुंबईचा नागरिक आहे, महाराष्ट्राचा नागरिक आहे तसाच तो भारताचाही नागरिक आहे आणि त्याबाबतचे त्याचे कर्तव्य काय आहे याचीही शिवसेनेने आपल्या अनुयायांना जाणीव करून दिली पाहिजे. तसे जर झाले नाही तर समितीची वाटचाल आणि शिवसेनेची वाटचाल यात फारसे अंतर राहणार नाही.

—सदाशिव पेठकर

●

# विचार वारे

समीर

## ☐ मनोवैद्यक

"मनोवैद्यक हे अजूनही वद्यकीय शिक्षणाचे सावत्र अपत्य समजले जाते," असे मत परवा दोन पाश्चिमात्य मानसिक रोगतज्ज्ञ डॉ. जोहान्स वॉल्टन आणि डॉ. आल्फ्रेडो लिऑन यांनी दिल्लीत प्रकट केले आणि आधुनिक वैद्यक–शास्त्रात मानसोपचाराचे महत्त्व वर्णन केले. शारीरिक रोगाने ग्रस्त झालेल्या खूपच रुग्णांना मानसिक व्याधीही असते, व असे सिद्ध झाले आहे की औषधोपचारासाठी डॉक्टरकडे जाणाऱ्या मंडळींपैकी दहा टक्के लोकांना मुख्यत्वे मानसिक रोग लागलेला असतो. असे असूनही वैद्यकीय शिक्षणाचे तज्ज्ञ मानसोपचाराला योग्य ते महत्त्व देत नाहीत' वास्तविक पाहता मेडिकल विद्यार्थ्यांचा मानसशास्त्राशी अधिक जवळचा संबंध आला पाहिजे. वैद्यकीय शिक्षणात मानसोपचाराचे स्थान या विषयावर भारतात नुकतीच एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. तिच्यात असे ठरले आहे की मेडिकल कोर्सच्या पहिल्या दोन वर्षांत मानसोपचाराची मूलभूत शास्त्रे––विशषतः मानसशास्त्र व लिंग–विज्ञान शिकवण्यासाठी कमीत कमी आठ तास खर्च झाले पाहिजेत. नंतरच्या शिक्षणक्रमातही इतकाच वेळ मनोवैद्यकावर खर्च व्हायला हवा.

परंतु मनोवैद्यकाच्यासंबंधी बरेच लोकभ्रम पसरले आहेत. त्यांतील सर्वांत अधिक पसरलेला भ्रम म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसाराबरोबर मानसिक रोगही अधिक फैलावले आहेत. " या समजुतीला पुष्टी देणारा सबळ पुरावा अजूनही उपलब्ध नाही." 'न्युरॉसिस' सारखी काही किरकोळ मानसिक दुखणी कदाचित वाढली असण्याची शक्यता आहे; परंतु खरी परिस्थिती अशी आहे की लोकांना आता मानसोपचाराच्या उपक्रमाची अधिक जाणीव होऊ लागली आहे. दुसरा भ्रम म्हणजे पौर्वात्य देशांपेक्षा पाश्चिमात्य देशांत मानसिक रोगांचे प्रमाण अधिक आहे. तज्ज्ञांच्या एका गटाने या बाबतीत नायजीरियासारख्या मागासलेल्या

देशांत व कानडासारख्या पुढारलेल्या देशांत पाहणी केली तेव्हा त्यांना आढळून आले की प्रमाणात फरक नाही.


## ☐ व्हिएटनाममध्ये काय करायला पाहिजे ?

अमेरिकेने बॉम्ब-हल्ले थांबवायला पाहिजेत आणि तसे करण्यासाठी अमेरिकेला प्रवृत्त करण्यासाठी इंटरनॅशनल कंट्रोल कमिशनच्या तीन सदस्य देशांनी व जिनेव्हा परिषदेच्या दोन अध्यक्षांनी मिळून एक प्रकारची प्रस्थापी सुरक्षा-परिषद म्हणून पुढाकार घेतला पाहिजे असे उत्तर युगोस्लाव्ह न्यायाधीश आणि वर्ल्ड फेडरेशन ऑफ युनायटेड नेशन्स असोसिएशन या आंतरराष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष अलिस बेब्लर यांनी परवा भारत-भेटीत दिले. रशिया, इंग्लंड, भारत, कानडा आणि पोलंड यांनी बॉम्बहल्ला थांबवल्यानंतर त्या मध्यंतराचे रूपांतर सबंध व्हिएटनाम समस्येचे एकाकी समाधान होण्यात करण्यासाठी त्यांनी आवश्यक ती कारवाईदेखील करायला पाहिजे. पण मग याच देशांनी घेतलेला निर्णय अमेरिकेला मान्य होईल काय ? बेब्लर यांचे उत्तर : अमेरिकन सरकार या गटाशी सहकार्य करील असे मला पत्र आले आहे. पत्रावर अध्यक्ष जॉन्सन यांचे खास सचिव वॉल्टर रॉस्टो यांची सही आहे. वर उल्लेखिलेल्या पाच देशांची अजून बैठक झालेली नाही, परंतु आता त्यासाठी प्रयत्न चालू झाला आहे, कारण " रणांगणावर, अमेरिकेत व इतरत्र घडलेल्या नवीन घटनांमुळे मला पुन: आशा वाटू लागली आहे. " अमेरिकेतील राज्यकर्त्या पक्षाच्या वृत्तीत आता फरक पडला आहे.

## ☐ पश्चिम जर्मनीतील विद्यार्थी-जग

शिक्षणावरील एका परिसंवादासाठी भारतात आलेल्या पश्चिम जर्मन शिक्षण-तज्ज्ञांपैकी प्रा. हार्टमुट फॉन हेन्टिग यांच्या मते व्हिएटनाम युद्धाच्या बाबतीत पश्चिम जर्मन सरकारने तटस्थ धोरण स्वीकारावे याचा तेथील विद्यार्थ्यांना फार राग येतो. असे दिसून आले आहे की, सुमारे ७५ टक्के पश्चिम जर्मन विद्यार्थी " व्हिएटनाममधील अमेरिकन अतिक्रमणा "च्या विरुद्ध आहेत आणि पश्चिम जर्मन सरकारने या बाबतीत आपले मत स्पष्टपणे मांडावे असे त्यांना वाटते. विद्यार्थ्यांच्या असंतोषाचा दुसरा प्रश्न म्हणजे विश्वविद्यालये वाढविण्याची आवश्यकता. जर्मन विद्यार्थ्यांना विश्वविद्यालयांत सात वर्षे काढावी लागतात, त्यामुळे बरीच गर्दी झाली आहे. शिक्षण-पद्धती बदलण्याचीही आवश्यकता आहे. ग्रीक आणि लॅटिन यांचा एकेकाळी उपयोग झाला असेल, पण आता (पारंपरिक) ज्ञानापेक्षा काही तरी अधिक पुरविणे आवश्यक झाले आहे.

दुसरे एक तज्ज्ञ डॉ. हान्स रॉझेन्थल : जर्मनीत शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी फक्त आठ टक्के विद्यार्थी विश्वविद्यालयात जातात. बाकीचे बहुतेक सर्वजण कारखान्यात तीन वर्षे उमेदवारी करतात. हिंदुस्थानात ही पद्धती अमलात आणता येईल. ○



अपूर्ण 'राजसंन्यास' मधली काव्यात्म धुंदी वा 'बेबंदशाही'-तला कणखर धर्मनिष्ठेचा परधर्मावरील विजय, या ऐवजी तितके परिणामकारक असे वेगळे काही या नाटकाला लाभू शकले नाही. म्हणूनच नाटकाच्या अखेरीस काळजाला भिडतात काही तुटक प्रसंग.




'इथे ओशाळला मृत्यू' 'रायगड' परंपरेतले नवे नाटक. 'रायगड' प्रेक्षकांच्या काळजाला भिडले ते एक ऐतिहासिक नाटक म्हणून नव्हे तर ऐतिहासिक वैचित्र्याचे कौटुंबिक हृदयस्पर्शी नाटक म्हणून. त्यातील पितापुत्र-संघर्ष घराघरातला होता. महापुरुषांनाही हा चुकला नाही ही या नाटकातली गर्भित सूचना प्रेक्षकांना सांत्वनासारखी सुखद वाटली. नव्या 'ओशाळला मृत्यू' मध्ये त्या जुन्या नाटकातले संभाजीचे सूत्र पुढे ओढून संभाजीच्या देहान्तापर्यंतचा कथाभाग वसंत कानेटकरांनी रंगवला आहे.

## विजय तेंडुलकर

या कथाभागावर मराठीत आधीच निदान चार नाटके लिहिली गेली आहेत. पैकी गडकरीमास्तरांचे वाङ्मयीन 'राजसंन्यास' आणि औंधकरांचे नाट्यसंपन्न 'बेबंदशाही' ही गाजली. नाथमाधवांचे 'मराठ्यांचा आत्मयज्ञ' तुलनेने मागे पडले परंतु त्यातही संभाजीचे एक व्यसनाधीन भला माणूस, त्याचा अधःपात आणि त्याची उपरती या प्रकारचे रंगवलेले चित्र ऐतिहासिक कालखंडातले परंतु विशुद्ध सामाजिक दृष्टिकोनातून केलेले होते. त्या काळच्या ऐतिहासिक नाटकांच्या ढाच्यात ते बसले नाही. आणखी एक ज्ञात नाटक ग. कृ. बोडस यांचे 'धर्मवीर संभाजी'. हे या तीन्ही नाटकांच्या मानाने सामान्य होते. कानेटकरांनी 'रायगड' मधला संभाजी रंगवला तो या चारही नाटकांपासून मूलतः निराळा—इतिहासकार बेंद्रे यांनी केलेल्या नव्या संशोधनाच्या बळावर. या संशोधनानुसार आणि त्यावर आधारलेल्या कानेटकरांच्या निष्कर्षानुसार संभाजी काहीसा अविचारी होता परंतु बदफैली नव्हता, व्यसनाधीन-नादान नव्हता, क्रूर आणि बेजबाबदार नव्हता, उलट तो उमदा होता, बाणेदार होता, जबाबदारीने वागू बघणारा होता, सहृदय होता आणि शिवाजीराजांइतकाच स्वराज्यासाठी तळमळणारा होता. शिवाजीराजांनीच त्याच्यावर जाणता अजाणता काही अन्याय केले, त्याच्या संवेदनाक्षम मनाचा मुलाहिजा ठेवला नाही. याची प्रतिक्रिया घडून पोरसवदा संभाजीने काही किरकोळ आगळिका केल्या त्याचा इतरांनी बाऊ केला, विपर्यास केला, आणि शिवाजीराजांनी हा विपर्यास विश्वसनीय मानला.

### नवा इतिहास

'रायगड' मधला हाच संभाजी 'ओशाळला मृत्यू' मध्ये कानेटकरांनी अधिक प्रौढ, परिपक्व अशा अवस्थेत पुन्हा रंगमंचावर आणला आहे. या नव्या नाटकात तो बराचसा शिवाजीच झाला आहे. मात्र शिवाजीचा धोरणीपणा त्याच्याकडे नाही. शिवाजीचे नशीबही त्याच्याकडे नाही. त्याच्याविषयी दरोबस्त गैरसमज आणि अफवा सर्वत्र पसरलेल्या आहेत. वडिलांचे स्वामिनिष्ठ चाकर नव्याने राज्यावर आलेल्या या मुलाविरुद्ध कटकारस्थाने रचू लागलेले आहेत. तिकडे पाताळयंत्री औरंगजेब शिवाजीपश्चात मराठेशाही खतम करण्याची आकांक्षा बाळगून, टोप्या शिवीत आणि कुराणाच्या प्रती काढीत संधीची वाट पाहतो आहे. औरंगजेबाचा शाहजादा अकबर संभाजीला येऊन मिळतो आणि औरंगजेबविरुद्ध संभाजी या

मुकाबल्याला तोंड लागते. संभाजीही दंड थोपटतो पण दगाबाजीने त्याला कैद केले जाते. संभाजीचा मेहुणा गणोजी शिर्केच याला कारणीभूत होतो. पण तोही नीच नसतो, अगर सूडाने पेटलेलाही नसतो. कारण संभाजीने शिर्क्यांची कत्तल केली हीच एक ऐतिहासिक अफवा. 'शिरकाण' म्हणजे शिर्क्यांचा मुलूख; त्यांची कत्तल नव्हे. गणोजी शिर्के थोडाफार स्वार्थी असतो. पुढे त्याला केल्या कृत्याची उपरती होते. मोंगलांहाती सापडतो तेव्हा संभाजीही नशेत नसतो, चांगला शुद्धीवर असतो. कलुषा हा त्याला व्यसनाधीन बनवून पकडून देणारा अधम नव्हे, तो संभाजीची साथ करीत त्याच्याचबरोबर पकडला गेलेला एक कनौजी कवी. शूर नव्हे पण दगाबाजही नव्हे. औरंगजेब धर्मांतराची 'ऑफर' संभाजीला देत नाही आणि संभाजीही त्याच्या मुलीशी निका लावण्याची उद्दाम इच्छा त्याला सुनावीत नाही. संभाजी औरंगजेबाच्या अन्य मायावी भुलावण्यांना भीक न घालता अगर वेदनेचा हुंकारही न काढता क्रमशः मृत्यू कवटाळतो आणि संभाजीच्या शरणागतीची प्रतीक्षा करीत अखेर नियतीला शरण जातो तो औरंगजेब. संभाजीची अखेर हीही एक प्रकारे अनेक महापुरुषांच्या अखेरींप्रमाणे नियतीचे कर्तृमकर्तृमत्वच सिद्ध करते.

इतिहासाचा मुद्दा या नाटकापुरता फार लक्षात न घेतलेलाच बरा. इतिहास निश्चितपणे आणि निर्विवादपणे काय असतो ते केवळ इतिहाससंशोधकच सांगू शकतात; आणि त्यांच्यांतही परस्परांत याविषयी अटीतटीचे वाद चालू असतात. नवे पुरावे उपलब्ध होणे वेगळे आणि त्यांवरून निष्कर्ष निघणे वेगळे. मतभेद निष्कर्षांबाबत होतात आणि ते मिटणारे नसतात. नाटकापुरता, विशिष्ट नाटकाच्या मर्यादेत जो इतिहास किंवा जी जुनी–नवी परिस्थिती उभी केली जाते, ती कितपत पटते, तर्कशुद्ध वाटते तेवढेच पाहणे नाटकाला न्याय देणारे ठरते.

## तीन चित्रे

'इथे ओशाळला मृत्यू' मध्ये औरंगजेब पुष्कळच पटणारा आहे. आधीच्या सर्व ऐतिहासिक नाटकांहून या नाटकात त्याचे अनेकरंगी व्यक्तिमत्त्व उजवे उमटले आहे. तो केवळच खलपुरुष नाही (आणि नव्हताही असे काही वस्तुनिष्ठ विचाराचे इतिहाससंशोधक सांगतात;) त्याचा प्रत्यय रंगमंचावर या नाटकानिमित्ताने प्रथमच मिळत आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्याचे कौटुंबिक जीवन प्रकाशात न ओढता कानेटकर एक माणूस म्हणून त्याचे चित्रण करण्यात बरेच यशस्वी झाले आहेत. त्याचे पाताळयंत्री डोके आणि तऱ्हेवाईक, संशयी मन, आणि यातही कुठे तरी आपल्याहून कितीतरी अधिक बलिष्ठ अशा शक्तीची–नियतीची त्याला असलेली जागरूक जाणीव यातून कानेटकरांनी पटण्याजोगा औरंगजेब उभा केला आहे.

संभाजीलाही असेच महापुरुषाच्या तसबिरीतून माणसात आणण्याची कोशिस 'रायगड'पासून कानेटकरांनी आरंभिली, तिचा महत्त्वाचा उत्तरार्ध या नाटकात

आढळतो. एकतर शिवाजीप्रमाणे संभाजीच्या कौटुंबिक जीवनात शिरून त्याचे माणूसपण शोधण्याचा प्रयत्न कानेटकर करतात आणि त्याच्या पत्नीपुढचे—येसूबाई-पुढचे—त्याचे मूलपण खुले करून दाखवतात. याबरोबरच छत्रपती म्हणून त्याचे चित्रण करताना त्याला तसबिरीतलाच गृहीत धरतात. त्याच प्रकारचे ऐतिहासिक नाटकातले तलवारीला हात घातलेले ठरीव, औपचारिक, कृत्रिम, जडवलेले वागणे-बोलणे त्याच्यासाठी नेमून देतात. आजवर इतिहासाने आणि लोकसमजुतींनी संभाजी-वर ठेवलेल्या व्यसने, नादान वृत्ती आदि दोषा-रोपांतून त्याची मुक्तता करण्यासाठी 'रायगड 'प्रमाणे याही नाटकात कानेटकरांनी आवर्जून युक्तिवाद केले आहेत आणि त्यातील काही संभाजीच्याच तोंडी आहेत. या आत्मसमर्थनात्मक बचावपर भाष-णांनी एक तिसराच आरोपी संभाजी तयार होत जातो. माणूस म्हणून या नाटकातला संभाजी मुलाइतका निरागस, संवेदनाक्षम, रागीट, बंडखोर, पोरका, चळवळ्या आहे. छत्रपती म्हणून तो जबाबदार, लढाऊ आहे, सहनशील आहे, विचारी आहे, कर्तव्यकठोर आहे. थोडाफार द्रष्टा आहे. आणि आरोपी म्हणून तो भित्रा आहे, आपल्या केल्या कृत्यांची केविलवाणी समर्थने देणारा आहे आणि तरीही एका अपराधी भावनेने मनोमन पिचणारा आहे. ही तीन चित्रे एकसंध लिपून यांतून एकच एक असे संभाजीचे रसरशीत व्यक्तिमत्त्व कानेटकरांना निर्माण करता आलेले नाही. संभाजी-औरंगजेब या ऐतिहासिक लढतीचे या नाटकातले मुख्य चित्र यामुळेच एकत्रितपणे अर्थपूर्ण होऊ शकत नाही. उठून येतात ते काही सरळ सरळ नाट्यपूर्ण प्रसंग, त्यातील ढोबळ नाट्यामुळे. एरवी एकीकडे 'तसबिरीत' असल्याप्रमाणे छाती पुढे काढून गुरगुरत फिरणारा परंपरागत मानव-व्याघ्र संभाजी पत्नीपुढे केवळ मानव म्हणून रुसता-रागावताना आणि वैतागताना हास्यास्पद होतो आणि आबासाहेबांच्या आत्म्यापुढे आपल्यावरील आरोपांचे खुलासे करणारी जबानी देताना दयनीय वाटतो. त्याची वीरश्रीपूर्ण अखेर त्यामुळेच वरवरच्या नाट्याहून अधिक खोल परिणाम करीत नाही. औरंगजेब—संभाजी मुकाबल्यातून नियतीचे कर्तुमकर्तुमत्व सिद्ध करण्याचा कानेटकरांचा प्रयत्न असल्यास तो सफल होत नाही. वस्तुतः संभाजी, कवी कलश, गणोजी शिर्के, आणि औरंगजेबदेखील एका मानवी पातळीवर गृहीत धरल्यानंतर संभाजीची भयंकर आणि तरीही उदात्त अखेर आणि वस्तुतः ती घडविण्याला कारणीभूत होऊनदेखील तिने उत्तेजित न होता निराश होऊन औरंगजेबाला महाराष्ट्रातून करावे लागलेले गमन ही एका घटनाचक्राची अपरिहार्य अखेर म्हणूनदेखील सिद्ध करता आली असती आणि हिंदु-मुस्लिमत्व शत्रु-मित्र भावना, युद्धे, मनसुबे, कटकारस्थाने यापलीकडील एका चिरंतन शक्तीचा ऐतिहासिक प्रत्यय याच कथानकातून मिळाला असता. या कथानकावरील आधीच्या सर्व नाटकांहून या नाटकाला एक स्वतंत्र, मौलिक आणि व्यापक हेतू लाभला असता.

पण हे घडलेले नाही. कदाचित नाटककाराला हे अभिप्रेतदेखील नसावे. काही

असले तरी, अपूर्ण ' राजसंन्यास ' मधली काव्यात्म धुंदी वा ' बेबंदशाही 'तला कणखर धर्मनिष्ठेचा मानवी स्खलनशीलतेवर आणि परधर्मावर आवेशपूर्ण विजय या ऐवजी तितके परिणामकारक असे वेगळे काही या नाटकाला कानेटकर देऊ शकलेले नाहीत. त्यामुळे या दोन नाटकांच्याच विषयावरील पाचवे नाटक याहून अधिक महत्त्व या नाटकाला आलेले नाही. सर्वमिळून एखादा उत्तुंग नाटयाचा वा सखोल आशयाचा परिणाम हे साधत नाही. प्रेक्षकाला भिडतात ते काही तुटक प्रसंग आणि टाळयांची वाक्ये.

' नाटयसंपदा 'च्या प्रयोगात या संस्थेच्या पेटंट सरकत्या रंगमंचाव्यतिरिक्त आणि या रंगमंचाच्या विविध वापरांव्यतिरिक्त तांत्रिक अंगात फारसे लक्षणीय काही नाही. या वापरानेही एखादा विशेष परिणाम साधतो असे नाही. जितेंद्र अभिषेकींच्या पार्श्वसंगीतात या एकोणीसशे अडुसष्ट सालात पडद्यामागे ' गाँग ' वाजल्याने पार्श्वसंगीतदेखील ' ऐतिहासिक ' वाटते. श्याम आडारकर यांच्या एरवी ठाकठीक नेपथ्यात संभाजीच्या अखेरीचा चंद्रप्रकाशातला देखावा हृदयस्पर्शी न वाटता रमणीय वाटला.

## खानदानी डौलातील येसुबाई

अभिनयात प्रभाकर पणशीकर (औरंगजेब), काशीनाथ घाणकर (संभाजी), सुधा करमरकर (येसूबाई), चित्तरंजन कोल्हटकर (गणोजी शिर्के) आणि अप्पा गजमल (काझी) एवढी मंडळी याच क्रमाने वगळल्यास बाकी सर्व नटसंच मगनलाल ड्रेसवाला यांजकडून पोशाखासोबत सवलतीच्या दरात आणल्याप्रमाणे नाटकापासून सर्वतोपरी फटकून बाजूला पडत होता. पणशीकरांनी खरोखरीचे गुळगुळीत करून घेतलेले डोके त्यांची अभिनयाची तळमळ निर्विवादपणे सिद्ध करीत होते. त्यांची ' फिगर ' मात्र संभाजीला सोईची होती. उलट औरंगजेबाला सोईचे डोळे असलेले ' संभाजी ' घाणेकर भरपूर पॅडिंग घालूनही पायात पोरसवदा वाटत होते. या दोघांनीही आपापल्या भूमिकांना न्याय देण्याची शिकस्त केली; परंतु आपल्या हातखंडा लकबी त्यांना आवरता आल्या नाहीत. औरंगजेब मधून मधून प्रिन्सिपल औरंगजेब वाटला, संभाजी नानासाहेब फाटकांचे हॅम्लेट नुकतेच पाहून आल्यासारखा काही स्वगतांत फाटकांच्या हॅम्लेटने झपाटल्यागत भासत राहिला. चित्तरंजन कोल्हटकर गणोजी म्हणून अखेरपर्यंत शोभले; अखेरीच्या उपरतीच्या आक्रोशात मात्र गणोजी बुडून चित्तरंजन कोल्हटकर उरले. सुधा करमरकर ऐतिहासिक येसूबाईच्या मानाने जरा सामाजिक धिटाईनेच रंगमंचावर वावरत होत्या. संभाजी उभा असता येसूबाई सुखाने बसलेली पाहून माझ्या रांगेतले एक ज्येष्ठ इतिहास-ज्ञ बसल्या जागी जे बेचैन झाले ते अखेरपर्यंत तसेच होते. संभाजीच्या देहांताचेही दिग्दर्शनातील या आगळिकीपुढे त्यांना काही वाटले नाही. पण एरवी करमरकरबाई अस्सल राजबिंड्या डौलाने वावरल्या,

बोलल्या. त्यांची ठेंगणी ठुसकी येसूबाई संभाजीहून कर्तबगार वाटत होती. असेही वाटले की औरंगजेबाशी या मुत्सद्दी बाईचा मुकाबला यदाकदाचित जुंपता तर त्याची धडगत नव्हती.

पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे दिग्दर्शन शिस्तीचे होते. रीतिरिवाजात जखडलेल्या ऐतिहासिक वळणाचे ते नव्हते – विशेषतः, खासगी जीवन दाखविणाऱ्या प्रसंगांत– म्हणूनच ते कित्येकांना अनतिहासिक वाटून खटकले.


पहिल्या प्रयोगाच्या आरंभी प्रदीर्घ आशीर्वादपर आणि नाट्यवाङ्मय – समालोचनात्मक भाषणात साताऱ्याच्या राणीसरकार म्हणाल्या, ऐतिहासिक नाटकांच्या क्षत्रातली बेबंदशाही कानेटकरांनी दूर करावी.

प्रयोग पाहून वाटले, बेबंदशाही दूर होऊ द्या पण 'बेबंदशाही' मात्र राहणार. ☐

दि
नेकेड
रनर

उत्कृष्ट दिग्दर्शक
आणि
ताकदवान कथा
असूनही
एक वेगळा हेरपट
एवढेच याचे मोल.

एका दृष्टीने वहिर्जी नाईक भलताच भाग्यवान. आपण कुणाच्या बाजूने आणि कुणाविरुद्ध हेरगिरी करतो हे त्याला कोणत्याही परिस्थितीत पक्के माहीत असे. आधुनिक वहिर्जी नाइकांना अनेकदा याच एका गोष्टीचा पत्ता नसतो. विशिष्ट गोष्ट करण्यासाठी त्यांना 'क्ष' नियुक्त करतो, 'ज्ञ' हे त्यांना सांगतो, 'ह'च्या मागे ते जिवाच्या बाजीने अनेक हद्दी ओलांडून जातात, ठरल्याप्रमाणे 'ळ'ला ठार मारतात, गुप्त माहिती 'ङ'च्या स्वाधीन करतात आणि प्रसंगी स्वतःही मरून जातात. पण शेवटपर्यंत क्ष, ज्ञ, ह, ळ, ङ हे कोण, कुणाच्या बाजूचे, त्यांच्याशी आपला संबंध कुणामुळे आला, आपण केल्या गोष्टींचे परिणाम काय, याविषयी त्यांना विश्वास ठेवा वा न ठेवा, पण सुतराम् ज्ञान नसते. ते विचारे बुद्धिवळातल्या प्याद्यांसारखे नमुन्यावारी वापरले आणि मारले जातात. त्यांच्या पराक्रमांबद्दल त्यांचा सन्मान कधीही होत नाही. त्यांना परमवीर चक्रेही मिळत नाहीत. किंबहुना काम होताच त्यांना सोईस्करपणे विसरण्यात येते.



**फ्रँक सिनॅट्रा – दि नेकेड रनर**

हेराइतका सहानुभूतिपात्र प्राणी या जगात आजकाल क्वचितच असेल.

या हेरावर शेकडो बरेवाईट देशीपरदेशी चित्रपट आपल्याकडे आजकाल चित्रपटांची बाजारपेठ भरून टाकीत आहेत. 'मिशन अमुक तमुक' या ठराविक शीर्षकांचे परदेशी मदनमस्त देमार चित्रपट, 'स्पाय इन रोम' सारखे देशी इमिटेशन चित्रपट, 'स्पाय हू केम इन फ्रॉम द कोल्ड' सारखा एखादा खरोखरी कलापूर्ण शोकात्म, जबरदस्त चित्रपट, 'स्पाय वुइथ अ कोल्ड नोज' सारखे या सगळ्याच प्रकाराची टवाळी करणारे गमत्ये चित्रपट, असे या चित्रपटांचे ठळक वर्ग आहेत. एवढे खरे की कितीही निघाले तरी या 'ठोठो–पटां'चा कंटाळा कसा तो प्रेक्षकांना येत नाही. तीच रहस्ये, तेच चेहरे, तीच शरीरे आणि त्याच मारामाऱ्या पुन्हा पुन्हा पाहूनही पुन्हा नव्या उत्साहाने प्रेक्षक मंडळी यातल्या नव्या चित्रपटाच्या तिकिटासाठी रांग धरतातच.

वॉर्नर ब्रदर्स निर्मित 'द नेकेड रनर' हा फ्रँक सिनॅट्रा या भूतपूर्व नर्तक नटाचा ताजा चित्रपट या प्रकारचा. पण केवळ हा हाणामारीचा हेरपट नव्हे. या प्रकारच्या चित्रपटांना 'हिरो' म्हणून साजेसा फ्रँक सिनॅट्रा दणकट नव्हे आणि गुलजारही नाही. या 'नेकेड रनर' चित्रपटाचा 'हिरो' सिनॅट्राच्याच सायझीचा आणि

वयाचा बेतलेला आहे. त्यात कुठल्याच अर्थाने काहीही नजरेत भरणारे नाही. केव्हा तरी हा ब्रिटिश हेरखात्यात कुठे तरी होता. पुढे याला बाहेर टाकण्यात आले. चार मामुली माणसांसारखा हा एरवी जगला असता; पण नाही. त्याच्या दुर्दैवाने हेरखात्याला त्याची आठवण झाली. एक आतल्या ' गोटा 'तला माहीतगार माणूस कम्युनिस्ट हेरांच्या हाती पडून कम्युनिस्ट देशात नेण्यात येत होता. त्या माणसाचा काटा कोठल्याही परिस्थितीत काढला जाणे जरूर होते; कारण त्याच्यापाशी फार महत्त्वाची माहिती होती. त्याला मारणे ही तर राष्ट्रीय गरज होती आणि त्याला ब्रिटिश हेरखात्याने मारले हे तर चुकूनही उघड व्हायला नको होते. मग एक कारस्थान रचण्यात आले.

## वजनदार कथा

त्या कारस्थानात सिनॅट्रा (कथेतले नाव वेगळे) हा अत्यंत महत्त्वाचा दुवा झाला. सिनॅट्राच्या हस्ते हा खून घडवण्यात येणार होता. सावज हुकू नये इतका निखालस तो व्हावा म्हणून सिनॅट्राला एका योजनाबद्धपणे खून चढवण्यात येणार होता. परंतु आपण हा खून का करतो आहोत, तो ज्याचा होणार तो कोण असणार आहे, यातले काहीही सिनॅट्राला कळू देण्यात येणार नव्हते. लढतीच्या एखाद्या बैलाला डिवचून डिवचून आणि वर्मी जखमा करून बुद्धचा पिसे करावे तसे या भल्या माण-साला वर्मी जखमी करून, डिवचून खुनाला प्रवृत्त करण्यात आले. यासाठी त्याच्या खासगी आयुष्यातली एक नाजूक वेदना आणि त्याचा आईवेगळा एकुलता एक पोर या दोन गोष्टी हेरून योजनाबद्धपणे आणि निर्घृणपणे राबवण्यात आल्या. सिनॅट्राने एका बेफाम बेहोपीत खून पाडला आणि आपलीही शंभर वर्षे भरली असे त्याला वाटले त्या क्षणी हेरखात्याच्या म्होरक्यांनी प्रकट होऊन त्याला अभय देऊन मोटारीत घालून नेले. पण तेव्हा सिनॅट्रा आधीच्या अफाट मानसिक ताणाने जवळ जवळ अर्धमेलाच झालेला होता. एक महाभयंकर अनुभव त्याला घ्यावा लागला होता. त्याचा मुलगा जिवंत आणि सुरक्षित होता. पण त्याच्या मरणाच्या आणि स्वतःच्या असहायतेच्या दारुण वेदना सिनॅट्राला सहन कराव्या लागल्या होत्या.

' द नेकेड रनर ' चित्रपटाची ही कथा वस्तुरूढ छापाच्या हेरपटांहून अधिक वजनदार आणि सनसनाटी घटनांपेक्षा एका खोल खोल जाणाऱ्या संथगती वेदनेचा मागोवा घेणारी आहे. या वेदनेतून अखेरचा खून उसळतो. पाठोपाठ मृत्यूचे सावट झाकोळून येते. आणि येतायेताच ते एखाद्या महाभयानक स्वप्नातून जाग यावी तसे दूर केले जाते. हे स्वप्न उःत्स्फूर्तपणे पडलेले नाही, ते पद्धतशीरपणे रचण्यात आले आहे. हे रचणारे तज्ज्ञ बिनकाळजाचे वाटण्याइतके कठोर आहेत. याला त्यांचाही इलाज नाही, कारण यासाठीच त्यांना नेमलेले आहे. हेरखात्याच्या व्यवहारांचे स्वरूप हे असेच असायचे. हेरखात्यांची निर्मिती, नियंत्रण आणि संचालन हा आंतर-राष्ट्रीय राजकीय स्पर्धेचा, अविश्वासाचा, वैमनस्यांचा आणि शीतयुद्धाचा एक

महत्त्वाचा भाग आहे. जोवर या गोष्टी आहेत तोवर हे सर्व असेच चालणार.

या चित्रपटात शीतयुद्धाचा हा मुद्दा गृहित आहे पण त्यावर भर नाही. भर आहे तो फ्रँक सिनॅट्रा या वस्तुतः निरपराध, बिनमहत्त्वाकांक्षी, सर्वसामान्य माणसाला मिळालेल्या एका घोर आणि चमत्कारिक अनुभवाच्या शिक्षेवर. या अनुभवातला प्रत्येक अधिकाधिक तंग क्षण आपणापर्यंत भिडवण्याची कोशिस दिग्दर्शक सिडने फ्युरी यांनी केली आहे. यासाठी चित्रणाचे एक प्रभावी तंत्र त्यांनी वापरले आहे. दृश्ये रूढ पद्धतीने कधी अंतरावरून तर कधी जवळून चित्रित करण्याऐवजी सातत्याने ती खूप जवळून चित्रित करण्याची पद्धत त्यांनी स्वीकारली आहे. यामुळे चेहरे, वस्तू या सर्वांना एक अवास्तवपणे मोठे गडद स्वरूप आले आहे. झगझगीत प्रकाशापेक्षा मंद प्रकाश, सावल्या आणि अंधार यांचा उपयोग करून पडद्यावर सातत्याने एखाद्या नकोशा स्वप्नासारखे वातावरण त्यांनी ठेवले आहे. पार्श्वसंगीता-बरोबरीने स्तब्धतेचा उपयोग केला आहे. नटांच्या तोंडचा शब्द एरवीपेक्षा किंचित खालच्या पट्टीत उच्चारला जावा असे धोरण ठेवले आहे. प्रसंगांना एरवीच्या सर्व-सामान्य हेरपटांची ओघवती जलद गती नाही. उलट ते तुटक आणि मंदगती आहेत. या सगळ्यामुळे या चित्रपटाची कथावस्तू परोक्षपणे जाणवण्याऐवजी आपणच चित्रपटाचे नायक असावेत तितकी आपल्यापर्यंत भिडते, आपल्याला एक भयंकर अनुभव देऊन जाते.

हा चित्रपट एवढ्यापुरता यशस्वी झाला आहे. परंतु हा त्रासदायक अनुभव प्रेक्षकांना देण्यामागे आजच्या आंतरराष्ट्रीय वातावरणातील वरवरच्या शांतते-खालच्या निर्घृणपणाविषयी एक उबग त्यांच्या मनी निर्माण करणे ('स्पाय हू केम इन फ्रॉम द कोल्ड' हे असे उदाहरण;) हा वा असा एखादा हेतू सिद्ध होत नाही. प्रेक्षकांच्या काळजाला वा मेंदूला तो एक ताण निर्माण करण्यापलीकडे भिडत नाही. या निव्वळ ताणाला मग फारसा अर्थ उरत नाही. त्यापासून कोणतेही कलात्मक समाधान किंवा असमाधान लाभत नाही. एक विशिष्ट प्रकारचा समर्थ, वेधक अनुभव फक्त पदरी पडतो. म्हणजे वस्तुतः अधिक मोठी ताकद कथावस्तूत आणि दिग्द-र्शकात असूनही 'एक वेगळा हेरपट' एवढेच या चित्रपटाचे मोल राहिले आहे.

फ्रँक सिनॅट्रा आपली भूमिका ठाकठीक बजावतो. तो प्रथमश्रेणीचा नट कधीही नव्हता आणि याही चित्रपटात त्याच्या अभिनय कौशल्याचा एखादा दिपविणारा प्रत्यय मिळत नाही. मात्र हॉलीवुडमधले एकेकाळचे गायक-नर्तक नटदेखील बद-लत्या परिस्थितीत अभिनयाचे अंग मेहनतीने अवगत करून कसे आपला लौकिक टिकवून धरतात ते पाहण्यासारखे आहे.

मला विचाराल तर हे असे अकारण त्रास देणारे चित्रपट, अकारण त्रास देणाऱ्या माणसाप्रमाणेच, मला विशेष आवडत नाहीत. त्रासाला आपली ना नाही, पण पुढे काय ते बोला, किंवा कसेही पण आमचे झक्क मनोरंजन करा! ○

चवथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

मालतीही अखेर हाडामांसाचा गोळाच आहे. तोही अखेर माती होऊन भूमीला मिसळणारा. पण रजनीने जपलेल्या प्रीतीचा सुगंध तिच्या मृत्यूनंतरही मातीतून येत आहे .........

# "रजनी, मी चुकलो"

प्र भा क र मु ळे

बोरगावच्या स्टँडवर एस. टी. थांबली तेव्हा दुपारची उन्हं पार ओसरली होती. स्टँडवरच्या एकुलत्या एक लिंबाची सावली पुसट पडली होती. हवेत किंचितसा गारवा येऊ पाहात होता. चिमुकले बोरगाव डोंगराच्या कुशीत शांतपणे विसावलेले दिसत होते. कामधंद्याची घाई एव्हाना संपली होती. गाईगुरं घराकडे परतत होती. तर शेळयामेंढयांच्या बे ऽ बे ऽ ने साऱ्या बोरगावाला जाग येत होती. घराकडे परतणाऱ्या शेतकऱ्यांच्या वहाणांच्या बेसूर आवाजात खुरपी घेऊन घराकडे घाई-घाईने निघालेल्या बायांच्या हातांतील बांगडयांची मंजुळ किणकिण मिसळत होती.

मी गाडीतून उतरलो आणि मला पाहताच विश्वासराव तोंडातली तंबाखू थुंकत थुंकत मला सामोरे झाले.

" केव्हा आलात ? "

खरं तर मी उतरताना त्याने पाहिलेले होतेच.

" हां असाच. " मी उत्तरलो.

" मग चला की राव घराकडे. तुमी आता मोठं कारखानदार झालात. गरिबा-घरचा चहा तरी घेऊन बगा."

"मी ५-६ दिवस आहे इथंच. काही कामानिमित्त आलो होतो कोल्हापूरला. म्हटलं तसंच जावं वहिणीकडे. बऱ्याच दिवसांत तिची गाठ-भेट झाली नाही. "

" ते बी खरंच हाय म्हणा ! पण सवड काढून जाण्याआधी एकदा याच बघा. मी पोरगा धाडू का बोलवायला ?"

" मुलगा पाठविण्याची काही एक जरुरी नाही. मी तुमच्याकडे नक्की येईन."



मला रामराम करून ते निघून गेले. जोरजोरानं पाय आपटीत चालण्याची आणि तंबाखू खाऊन थुंकण्याची त्यांची सवय अद्यापही गेलेली दिसत नव्हती.

मी घरी आलो. मेहुणे तालुक्याच्या गावाला धान्याची पोती घेऊन गेले होते.

मी आणि गिरिजा. आम्ही दोघे भाऊबहिणी पण परिस्थितीमुळे गिरिजा फारशी न शिकताच तिला लग्न करावं लागलं. ४०-५० एकर जमीन आणि तीही बागायती. मग काय ? वडिलांनी ते स्थळ पक्कं केलं. गोरी गोरीपान गिरिजा हळदीच्या पायांनी श्रीमंताची सून बनली. मी मात्र परिस्थितीशी झगडत शिकत राहिलो. कधी नोकरी करून, कधी शिकवण्या करून मी आज मोठ्या कारखान्यात वरिष्ठ अधिकारी होतो.

गिरिजाने मला पाहताच दाराशीच थांबायला सांगितले. तांब्या आणि भाकरी घेऊन माझ्यावरून ओवाळून टाकली आणि मग आमच्या इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पा झाल्यावर मी म्हटले, " ताई, मी जरा गावात चक्कर मारून येतो. येऊ ना ? "

" जा, पण लवकर ये. रात व्हायला आली आहे. मी जेवण करून ठेवते. सकाळचा जेवून निघाला असशील, होय ना ?"

मी लवकर येण्याचे आश्वासन देऊन बाहेर पडलो. काळोख गडद होत होता. त्या काळोखात मला रजनीची सावळी मूर्ती दिसत होती. रंग सावळा पण डोळ्यात गूढता होती. दोन डोळ्यांत काही तरी लपून राहिले आहे असे वाटायचे. त्या दोन भावदर्शी डोळ्यांनी मला वेडे केले होते. उंचेली, नाकीडोळी नीटस अशी ही

षोडश वयाची मुलगी. मी पुढे पुढे जात होतो. डोळयांपुढे तिच्या स्मृतीचे चांदणे लखलखत होते...

तीन वर्षांपूर्वी जेव्हा मी प्रथमच गिरिजाकडे आलो होतो तेव्हा मी बी. ए. ला होतो. नोकरी करून शिकत होतो. दुपारचा असाच मेहुण्यांबरोबर शेतावर गेलो होतो. सारा मळा हिरव्या पाचूंनी वाऱ्यावर डुलत होता. ज्वारीची टपोरी कणसं मोत्याचा साज लेवून बाळसं धरीत होती.

थंडगार आंब्याच्या सावलीला बसून बराच वेळ गप्पा मारीत मारीत केव्हा झोप लागली ते कळलेच नाही. उठलो तेव्हा सावल्या दूरवर पसरल्या होत्या. मेहुण बैलांना दाणापाणी करीत होते. मी पेंगुळल्या नजरेने नदीच्या बाजूला पाहिलं. विश्वासरावांची रजनी हातांत वही–पुस्तकं घऊन येत होती. दुरूनही तिची मूर्ती नीटस अन रेखीव वाटत होती. प्रत्येक पावलातून मोहाची असंख्य वलयं माझ्या डोक्यात फेर धरीत होती.

मला पाहताच डोक्यावरून ढळलेला पदर सावरीत तिची दृष्टी जमिनीवर खिळली. आणि लगेच ती निघून गेली. तिच्या दोन डोळयांत असे कारुण्याचे शांत भाव उमटले होते की त्यांतले गूढ उकलून पाहावे तो ते भाव क्षणात मेघाप्रमाणे विरून जावेत.

तीच वेळ आणि तीच जागा. तीच थंडगार आंब्याची सावली आणि तीच शाळेतून घराकडे नेणारी रजनीची पाऊलवाट. त्या पाऊलवाटेवर तिची – माझी प्रथम भेट घडली आणि त्याच पाऊलवाटेने आमच्या प्रीतीच्या मर्यादशील क्रीडा साठवून ठेवल्या.

रजनी ही मर्यादशील वागणुकीची मराठा युवती होती. शाळेच्या वेळेशिवाय ती घराबाहेर क्वचितच दिसायची. घरंदाजपणाचे लेणे जपवीत तारुण्याचा पारिजात तिच्या मनात हसत होता.

मी गाव सोडताना ती रडली होती. तिच्या डोळयांतील संतत अश्रुसरिता पाहताना माझे मन बावरले होते.

" मला विसरणार नाही ना ? मी साधीभोळी मुलगी आहे. परपुरुषाकड कधी वळून बघायची नाही, ती तुमच्यापुढे माझे मन उघडे करीत आहे. आम्हा मुलींनी मनाने ज्याला एकदा वरले, त्याच्यासाठी प्राणही देण्याची तयारी असते. तुम्ही माझ्या सौभाग्याचे, अब्रूचे रक्षक आहात. गावात आपल्याबद्दल लोक नाही नाही ते बोलतात. पण मानी असूनही मी ते सारे ऐकून घेते. मला माहीत आहे आपण मर्यादेच्या पलीकडे कधी वागलो नाही. स्त्रीजातीला कलंक लागेल असे वर्तन आपल्या हातून कधी घडले नाही. पण आमच्या समाजात एक समजूत आहे. ज्या पुरुषाला स्त्रीने आपले प्रेम प्रथम अर्पण केले त्याशिवाय दुसऱ्या पुरुषाकडे पाहण्याचा अधिकार तिला पोहोचत नाही. तुम्ही मला फसवले तर मी प्राण देईन.

पण दुसऱ्याची होणार नाही.'

तिला जवळ घेऊन मी किती वेळ थोपटीत होतो कोण जाणे. अंधाराची चाहूल लागताच ती माझ्यापासून वाऱ्यासारखी दूर धावली होती...

तिचं घर गावाच्या खालच्या अंगाला होतं. विश्वासराव तिचे वडील. प्रीतीच्या जुन्या भावनांना आवाहन करीत, मी तिच्या घराकडे वाटचाल करीत होतो.

दारावर थाप पडताच दार उघडले गेले. मला पाहताच रजनीन डोक्यावरचा पदर सावरला व जमिनीवर दृष्टी लावून घरात पळाली. इतक्या रात्री मी तिच्याकडे कधीच गेलो नव्हतो. आमच्या आजपर्यंतच्या प्रेमाच्या पाऊलवाटेला अंधाराने मर्यादा घातली होती. पण आज मी पुरुष बनलो होतो. तारुण्याच्या साऱ्या कामवासना उफाळून सारं शरीर पिसाळलं होतं.

घरात तिची आई होती. मला पाहताच बसायला सतरंजी अंथरली. मी बसलो एवढ्यात विश्वासराव आलेच. मला पाहताच मोठ्या आनंदाने बोलले--" वा, आज आमची फार आठवण झालेली दिसते. "

मी लाजून, संकोचून, अवघडलेल्या अंगाने बसलो. बराच वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर ते म्हणाले,

" मग वसंतराव, लग्नाचा मुहूर्त केव्हाचा धरायचा ?"

आमचे प्रेमप्रकरण त्यांच्यापर्यंत पोहोचले होते तर.

" मी अजून तसे निश्चित काहीच ठरवलेले नाही. "

मी उत्तरलो.

" पण आता थांबण्यात काय अर्थ आहे. शिक्षण संपले, नोकरी लागली. आता उडवून टाकू या बार. "

मी ओसरीपलीकडील दरवाजाकडे पाहिले. दोन डोळे विलक्षण प्रभावीपणे माझ्याकडे रोखले गेले होते.

मी म्हणालो, " माझी संमती आहे. पुढील महिन्यातील मुहूर्त निश्चित करा. "

शांत डोळ्यांच्या दोन ज्योतींत किती निरागसता आणि कमालीची मार्दवता होती.

दोन-चार दिवसांत मी बोरगाव सोडले. स्टँडवरील लिंबाच्या पानापानांतून माझी रजनी लग्नाचा हिरवा चुडा भरलेली दिसत होती. गाव मागे पडत होता आणि मी नव्या वातावरणात शिरत होतो. दगडाधोंड्यांत जपलेली ती प्रीतीची नाजूक भावना ऐश्वर्यसंपन्न शहरी दिमाखात जागवू पाहात होतो.

ऑफिसमध्ये शिरताच मालतीने मजकडे पाहून नेहमीचे स्मित केले. गोऱ्यापान केवड्याचा आजचा थाट काही न्याराच होता. मी माझ्या स्वतंत्र रूममध्ये बसताच तिला मी बोलावले. निळ्या गर्द झिरझिरीत साडीतून तिचे अवयव जवानीच्या खुणा पटवीत होते. मी सुन्न झालो. भावनेच्या अतिरेकाने मी क्षणभर अधिकाराची

जागा विसरलो. दूर बोरगावातील ते भोळेभाबडे मूक तरीही बोलके प्रेम विसरलो. ती डोळ्यांतील निरागसता विसरलो. मालती जवळ येताच मी तिचा हात पकडून तिला जवळ ओढले.

--बाहेर दुपारची उन्हे अंगाची लाहीलाही करीत होती. मी मात्र उन्हातही थंड थंड होत होतो.

संध्याकाळी घरी आलो. मन दुपारच्या प्रसंगाने विषण्ण बनले होते. नकळत माझ्या हातून काय घडून गेले होते ? त्या रजनीला या घटनेने काय वाटेल ? जिने आपल्या मानलेल्या पतीशिवाय कुणालाही आपले शील दिले नाही. ती माझी पवित्र रजनी आणि तिचा मी भावी पती—

माझे संस्कारक्षम मन जागे झाले. माझ्या सुसंस्कृत मनात हे शल्य दिवसेंदिवस खोल खोल रुतत होते. जखम करीत होते.

मालतीचा आणि माझा संबंध दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत होता. मनाला पटत असूनही मोहाच्या कक्षा मी सांभाळू शकत नव्हतो. मालतीने मला पुरे वेड केले होते. तिच्या शरीराने मला जखडून टाकले होते. अशी माया लावली होती की त्यात एका निरागस प्रीतीचा अंकूर कोमेजून जात होता.

लग्न आठ दिवसांवर आले होते. मालतीचा सहवास सोडणे जिवावर येत होते. तिची अतृप्त नजर आणि तारुण्याला आवाहन देणारी शरीरयष्टी यांच्या जाळ्यात मी अधिकाधिक गोवला जात होतो. अखेर खूप विचार करून मी रजनीला नकार कळवला. मी पुरुष होतो. मला मर्यादा नव्हत्या. स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू एवढीच माझी भूमिका होती. सारा समाज माझ्या बाजूने होता. समाजाची नैतिक मूल्ये माझ्या प्रतिष्ठेच्या आड येऊ शकत नव्हती. मला सारे आकाश मोकळे होते. स्वैरपणे हिंडायला, वागायला. कारण मी एक पुरुष होतो.

—मालतीच्या तारुण्याचा बहर आता ओसरला आहे. पहिली भरतीची लाट केव्हाच संपून गेली आहे. तिची दिखाऊ वागणूक आणि तिचे श्रीमंती नखरे पुरवता पुरवता मला माझ्या पहिल्यावहिल्या प्रीतीची आठवण डंख मारून जाते. अखेर मालतीत काय होते ? ना पतीबद्दलची तीव्र ओढ. सदैव वखवखलेली स्वैर वृत्ती. तिच्या मंदिरात मी पुजारी होतो व ती देवता होती.

मालतीही अखेर हाडामांसाचा गोळाच आहे. तोही अखेर माती होऊन भूमीला मिसळणारा. पण रजनीने जपलेल्या प्रीतीचा सुगंध तिच्या मृत्यूनंतर मातीतूनही येत होता.

आजच तार आली आहे. " रजनीने विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. "

माझे पुरुषी मन या बातमीने थोडावेळ का होईना पण कष्टी बनते. त्या प्रीतीच्या पाऊलवाटेवर दोन अश्रू ढाळते. पण रजनीच्या मृत्यूने मला काय वाटणार आहे ? तिच्या शरीरवर मी प्रेम केले. माझ्या रजनीने माझ्या मनावर, माझ्या कर्तृत्वावर

प्रेम केले होते. मालतीने माझ्यातील फक्त पैसाच पाहिला. सुख पाहिले. पण रजनीने माझ्यातील जिव्हाळा आणि स्नेह पाहिला होता.

अजूनही त्या पाऊलवाटेवर तिचे शब्द त्या आम्रवृक्षाच्या थंडगार सावलीत मिसळतात आणि स्टॅंडवरचा हिरवा लिंब क्षणभर स्तब्ध होतो. अजूनही तिचे शब्द माझ्या पुरुषी मनाला इंगळ्याप्रमाणे डसतात व माझे मन आक्रंदून उठते--

" रजनी, मी चुकलो. मला क्षमा करशील का ?"

O


ज्वलंत राष्ट्रवादाच्या
भयानक दीप्तीचा
ललितभव्य आलेख

नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,
४१९ नारायण पेठ, पुणे २.

# शब्दांनी उभारलेली स्मारके

वि. शं. पारगावकर

## लढा असा हा स्वातंत्र्याचा

---

**पाहिजेत। शूर सैनिक**

---

१९१४ साली भारतातील एका वर्तमानपत्रात एक जाहिरात आली होती आणि ती जाहिरात चारआठ दिवसांनी पुन्हा पुन्हा येत होती. आजच्या वर्तमानपत्रांत दररोज हजारो जाहिराती प्रसिद्ध होतात, परंतु पन्नास वर्षांनंतर त्यांमधील एकाही जाहिरातीचे पुनर्मुद्रण होणार नाही अशी मला खात्री आहे. परंतु १९१४ साली 'गदर' नावाच्या एका वृत्तपत्रात फडकत असलेल्या जाहिरातीचे पुनर्मुद्रण झाले आहे. ती जाहिरात अशी :

**पाहिजेत !**
**हिंदुस्थानात जाऊन**
**गदरची उठावणी करणारे**
**शूर सैनिक !**
**पगार–मृत्यू !**
**बक्षीस–हौतात्म्य !**
**पेन्शन–स्वातंत्र्य !**
**नोकरीचे क्षेत्र–हिंदुस्थान !**

वरील जाहिरातीचे पुनर्मुद्रण ना. वि. काकतकर यांच्या 'लढा असा हा स्वातंत्र्याचा !' या २३० पानांच्या पुस्तकात झालेले आहे. हे एक इतिहासाचे पुस्तक आहे. भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याचा इतिहास या पुस्तकात ग्रथित केला गेला आहे. शिवाय हा इतिहास लिहिला गेला आहे किशोर वाचकांसाठी आणि तरीही त्यात केवळ सनावळ्या नाहीत. राजांच्या वंशावळी नाहीत.

इंग्रजांनी निर्माण केलेल्या खोट्या पुराव्याचा आधार नाही किंवा रुक्ष शब्दांत यात केवळ घटनांची नोंद केलेली नाही.

इथे लेखकाच्या रक्तात, मनात, प्रतिभेत आणि लेखणीत चैतन्य आहे. इथला शब्द वाचकांना फक्त अर्थच देऊन थांबत नाही, तर तो वाचकांशी बोलतो. इथल्या शब्दांनी निर्माण केलेल्या घटना केवळ अर्थ देऊन थांबत नाहीत तर त्या संपूर्णपणे साकार होतात. वाचकांच्या डोळ्यांसमोरून शब्द नाहीसे होतात आणि घटनांची, व्यक्तींची रूपे हालू-बोलू लागतात.

येथे आर्ष भारताचे पूर्वदर्शन घडते. त्यामधील सिंधू, तापी, ब्रह्मपुत्रा नद्यांच्या पाण्याचा खळखळाट ऐकू येतो. गंगचा धीरगंभीर प्रवाह कानात घुमतो. हिमालयाची शुभ्र शिखरे उन्हाने चकाकतात आणि डोळ्यांचे पारणे फेडतात. अशा या भारताचे स्वातंत्र्य हिरावले जाते. इ. स. १५०० चा काळ. त्या काळात इस्लाम येतो आणि दिल्ली हस्तगत करतो. उणीपुरी ३०० वर्षे इस्लाम आणि मोंगल यांचा या देशावर अम्मल होता. इ. स. १६०० साली बहुतेक साऱ्याच भारताचे पाकिस्तान झालेले होते. पण त्यानंतर लगेच रायगडी शिवाजीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. जणू काही काळ शिवाजी भारताचा राजा झाला आणि छत्रपतींचा जरीपटका अश्वमेधाच्या विजयी अश्वाप्रमाणे साऱ्या भारतखंडात डौलाने फडकला. रामेश्वरापासून अटकेपर्यंत ! इ. स. १७०० ते १७९८ या काळात भारताचे सम्राट हिंदू होते, मोंगलाच्या दिल्लीच्या तख्ताचा चुराडा झालेला होता. शीखांनी सारा पंजाब मुसलमानी अमलापासून मुक्त केला होता. काबूलपर्यंत त्यांचे राज्य होते.

परंतु याच वेळी एक नवा पापग्रह भारताच्या अस्मितेला गिळंकृत करण्यासाठी क्षितिजावर उगवला आणि हळूहळू मोठ्या धूर्तपणाचे आणि कावेबाज डाव टाकून त्याने सारा भारतवर्ष गिळंकृत केला.

असा हा स्वातंत्र्याच्या वेदीवर घडलेला पारतंत्र्याचा इतिहास ! पारतंत्र्याच्या, दास्याच्या लाजिरवाण्या अवस्थेवर चिडलेल्या आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शिर तळहातावर घेऊन फिरणाऱ्या अक्षरशः हजारो व्यक्तींच्या धगधगत्या जीवनाची, काकतकरांचे पुस्तक जणू मंगल गाथा आहे. भारतातील आजच्या तरुण पिढीचे हे पुस्तक स्फूर्तिस्थान आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

"२० जुलै १८७९ ची काळरात्र. गाणगापुरापासून दहा कोसांवर असलेल्या देवर नाभणी नावाच्या एका खेड्यात वासुदेव बळवंत होते. त्या वेळी त्यांच्या

अंगात सडकून ताप होता. पोटात अन्नाचा कण नव्हता. पित्ताने कपाळ चढलेलें होते. अशा अवस्थेत ते एका देवळात प्रवाशांच्या गर्दीत झोपलें होते. उशाशी एक बोचके. कमरेला विक्राळ खड्ग व पिस्तूल. दाढीस लंगोट बांधलेला. पायात पायजमा. डोक्याला पांढरा फेटा. अशा अवस्थेत ते झोपले होते. आणि दुर्दैवाने ती झोप आणि ती रात्र काळझोप आणि काळरात्र ठरली ! मेजर डॅनियल वासुदेव बळवंतांचा वास घेत नेमका तेथे आला. चोरकंदिलाच्या प्रकाशात त्याने वासुदेव बळवंतांना ओळखले. सभोवती पहारेकरी बंदुकी रोखून उभे केले. स्वत: एका हातात तलवार घेऊन त्या असावध सिंहाच्या दंडावर त्याने आपले बुटाचे पाय ठेवून छातीवर बैठक मारली. हालचाल करणेही अशक्य. अशा स्थितीत सापडलेल्या वासुदेव बळवंतांचा क्रोध अनावर झाला. त्यांनी डॅनियलला द्वंद्वाचे आव्हान दिले. पण भ्याड इंग्रजी रक्त अशा धीरोदात्त आव्हानाचा स्वीकार करण्याएवढे थोडेच मूर्ख होते. त्याने त्यांच्या हातापायांत शृंखला अडकविल्या आणि नरसिंह पिंजऱ्यात कोंडला गेला.

## ‘ मला क्षमा करा ’

वासुदेव बळवंतांची न्यायालयीन चौकशी झाली. म्हणजे न्यायालयीन चौकशीचा फार्स झाला. त्या यमपुरीतील देखावा चांगलाच रंगला. पिंजऱ्यात उभे राहून वासुदेव बळवंतांनी एक चिरंतन मूल्याचे वक्तव्य केले. ते म्हणाले,

> ‘ कुत्र्याप्रमाणे स्वत:चे पोट जाळण्याची लाजिरवाणी पाळी आमच्यावर आली, हे माझ्याच्याने पाहवले नाही. म्हणून मी ब्रिटिश सरकारविरुद्ध बंड पुकारले. आमची योजना सिद्धीस गेली असती तर फार मोठा चमत्कार होऊन, इंग्रजांना हाकून लावून, हिंदी प्रजासत्ताक राज्याची स्थापना करण्याचे माझे उद्दिष्ट साध्य केले असते. मग आकाशातील बापानेच इंग्रजांना वाचविले असते, तर कोणास माहीत ! पण ते होऊ शकले नाही. शेवटी मला अपयश आले. पण ईश्वरालाच माहीत की, मी हे सर्व देशासाठीच केले ! अहो, हिंदुस्थानवासी लोकहो, माझ्यामुळे तुम्हाला काहीसुद्धा लाभ झाला नाही ! मी माझे उद्दिष्ट साध्य करू शकलो नाही. याबद्दल मला क्षमा करा !’

“ ···शेवटी १७ फेब्रुवारी १८८३ ला संध्याकाळी ४–२० ला या तेजोभास्कर दधीचीचा प्राणदीप मालवला. ”

त्यानंतर आले लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. त्यांच्या जीवनाचा ललामभूत इतिहास तर गेल्या पिढीला चांगलाच ज्ञात आहे. या पगडी आणि धोतरधारी गृहस्थाने वासुदेव बळवंतांप्रमाणे हातात पिस्तूल बाळगले नव्हते. त्यांची वाणी हेच एक अमोघ लखलखते शस्त्र होते. त्यांचे दुसरे शस्त्र होते ‘ केसरी ’. अस्त्रांप्रमाणे जन्मभर लोकमान्य शब्द फेकीत होते.

याच काळात चाफेकर बंधूंनी अग्निदिव्य केले.

१८९६ साली मुंबईत आणि पुण्यात प्लेगने थैमान घातले होते. या भयंकर प्लेगचा फायदा घेऊन इंग्रज सरकारने रँड नावाच्या एका खास अधिकाऱ्याची पुण्यास प्लेग–निवारणार्थ नेमणूक केली. हा रॅण्ड पशूच्या जातीचा होता, राक्षसी मनोवृत्तीचा होता. एखाद्या घरात प्लेगाची लागण झाली आहे असे समजताच गोरे सैनिक त्या घरात शिरत आणि तरुण स्त्रिया-पोरींवर अत्याचार करीत. त्या घरातील शीलाचे आणि पैशाअडक्याचे अपहरण करीत. सरकारचा ज्या ज्या व्यक्तींवर डोळा होता त्या त्या व्यक्तींवर याच प्लेगच्या निमित्तान जुलूमजबरदस्ती केली जात होती. थोडक्यात म्हणजे एकीकडे प्लेगचे थैमान आणि दुसरीकडे सरकारच्या पाशवी वृत्तीचे थैमान असा हा नंगा नाच चालला होता. तशातच इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीचा हीरक महोत्सव मोठ्या थाटात साजरा करण्याची घाई सुरू झाली.

लोक एकीकडे धडाधड मृत्युमुखी पडत होते, दुसरीकडे त्यांच्यावर सरकारी अत्याचार होत होते आणि तिसरीकडे इंग्लंडमधला आनंद त्यांच्यावर लादला जात होता. चाफेकर बंधूंना हे सहन झाले नाही. आणि त्यांनी रॅण्डचा खून केला. आपल्या देशबांधवांच्या रक्षणासाठी, आपल्या देशाच्या स्वाभिमानाच्या रक्षणासाठी, आपल्या हिरावल्या गेलेल्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीच चाफेकर बंधूंच्या पिस्तुलातून गोळी सुटली होती. ती गोळी एखाद्या दरोडेखोराच्या पिस्तुलातून सुटलेली नव्हती तर एका ज्वलंत देशभक्ताच्या पिस्तुलातून सुटलेली होती !

वासुदेव बळवंत, लोकमान्य टिळक, चाफेकर बंधू, स्वातंत्र्यवीर सावरकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, खुदीराम बोस, रासबिहारी बसू, लाला हरदयाळ, डॉ. खानखोजे, महात्मा गांधी, डॉ. हेडगेवार, स्वामी श्रद्धानंद, क्रांतिवीर भगतसिंग, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस अशी एक ना दोन, अक्षरश: हजारो लहान मोठ्या व्यक्तींनी आपली बुद्धी, आपली शक्ती, आपली युक्ती, आपले रक्त, आपले अश्रू, आपले शिर आणि आपले सारसर्वस्व या स्वातंत्र्यदेवतेच्या यज्ञात समर्पण केलेले आहे.

स्वातंत्र्याइतकी प्रिय गोष्ट या जगात दुसरी कोणतीही नाही. मनुष्याच्या बुद्धीचा, भावनेचा अंतर्बाह्य जो झगडा चाललेला असतो तो स्वातंत्र्यासाठी. स्वातंत्र्य नाही तर खरे जीवन नाही. ऐहिक, आत्मिक, आध्यात्मिक कोणतीच प्रगती नाही. असे हे स्वातंत्र्य या शब्दाचे महत्त्व आहे. त्या स्वातंत्र्यासाठी जीवन वेचणाऱ्या व्यक्तींची महती शब्दांनी काय वर्णन करावी ? तरीही काकतकरांनी आपल्या जवळचे सारे शब्दसामर्थ्य पणाला लावून ही धगधगती जीवने पुन्हा उभी केली आहेत, व्यक्तींचे दगडी पुतळे उभे करण्यापेक्षा शब्दांचे साह्य घेऊन काकतकरांनी उभी केलेली ही स्मारके केवळ अलौकिक आहेत. ‘ लढा असा हा स्वातंत्र्याचा ’ हे पुस्तक देशातल्या प्रत्येक तरुणाने तर वाचलेच पाहिजे, परंतु थोरांनीदेखील ते वाचायला हवे, असे सुचवावेसे वाटते. ○

**[ लढा असा हा स्वातंत्र्याचा ! लेखक : ना. वि. काकतकर प्रकाशक : य. गो. जोशी ]**

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ¤ प्रेमाचे जंतू

रशियात मच्छर मारण्याचे एक नवीन यंत्र तयार झाले आहे. हे यंत्र म्हणे मादी मच्छरासारखा आवाज करते, व त्या आवाजाला भुलून नर मच्छर त्याच्याजवळ गेला की त्याला मारून टाकते. भले शाब्बास ! डी. डी. टी. चा किंवा फ्लिटचा फवारा मारला की डास मरतात असा आपल्याकडे साधा हिशेब आहे, पण प्रेम-भंगाने मच्छर मारायचे हे यंत्र अजब म्हणायचे. पण मला वाटते यात एक-दोन मेखा आहेत. त्यांतली पहिली म्हणजे सगळेच डास इष्कासाठी जान कुर्बान करणारे प्रेमवीर असतील असे कशावरून ? यांत्रिक प्रेयसीने साद घातल्यावर " क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव पडो मरणांचा " अशा निर्धाराने धावून–चुकलो, उडून–जायच्या ऐवजी पोरींना बिचकणाऱ्या फर्स्ट इयरमधल्या पोराप्रमाणे एखाद्या बुजऱ्या डासाने " आता जरा बिझी आहे, मग केव्हा तरी भेटू " असे म्हणून टाळाटाळ केली तर ? दुसरे म्हणजे प्रेमयंत्राची हाक मला आहे की तुला यावर नर मच्छरांत सुंदोपसुंदी माजली तर ?

आणि मुख्य म्हणजे हे प्रेमयंत्र मादी मच्छरांची काय वासलात लावणार ? यांत्रिक मादीची मंजुळ हाक ऐकून खरी मादी म्हणायची " हिला वाटतं आपणच अगदी लता मंगेशकर आहोत ! खरं म्हणजे माझाच आवाज जास्त गोड आहे.' मत्सराच्या भरात खऱ्या माद्यांनी गटाला प्रतिगट म्हणून आपले गोड गुणगुणणे सांघिक प्रमाणावर चालू केले तर प्रभावगीत-स्पर्धा लागायची अन् ' कोणता मानू चंद्रमा ' या धर्तीवर कोणत्या हाकेत अधिक प्रेम आलेले आहे याचा बिचाऱ्या नर मच्छराला संभ्रम पडायचा. म्हणून म्हणतो, हे जंतू मारण्यासाठी प्रेमापेक्षा डी. डी. टी. हे अधिक सोपे औषध नाही काय ?

## ¤ गाढवाचे सरकारी स्तोत्र

परवा लोकसभेत भारत-सरकारच्या एका मंत्र्याने गाढवाचे गुणगान करून म्हटले की गाढव हा श्रमाचा प्रतिनिधी आहे व आपण श्रमिकाला योग्य तो मान दिला पाहिजे. अर्थात, यात काय संशय ? म्हणून तर बऱ्याच मंडळींना मंत्री होण्याचा मान मिळाला आहे. गाढवांच्या या देशात खरे म्हणजे गाढवांना नुसता

मानच नव्हे तर अग्रपूजेचा मान मिळाला पाहिजे. कारण राजकारणापासून सिनेमापर्यंत सर्व क्षेत्रांतल्या मंडळींच्या मस्तकावर गाढवाने आपला वरदहस्त (की वरदपाद ?) ठेवलेला दिसतो. दोन-चार राजकीय पक्ष मिळून एखादी संयुक्त आघाडी तयार झाली की ही मंडळी शुभारंभ करतात तो एकमेकांवर दुगाण्या झाडून. ही कोणाची प्रेरणा ? हिंदी सिनेमातला डिटेक्टिव्ह मुंबईच्या भयंकर उकाड्यात सकाळ-संध्याकाळ ओव्हरकोट घालून मिरवतो. हे कोणाचे डोके ? पूर्वीचे विद्यार्थी शिकायला जाताना हातात पुस्तके घेऊन जात तर हल्लीचे दगड अन् विटा घेऊन जातात, हा कोणाचा प्रताप ? राजधानीतले रस्ते रोड राहता कामा नयेत या ईर्ष्येने सर्व रस्त्यांच्या नावाच्या पाट्या नवीन रंगविण्यात आल्या, पण त्यात बरेच रस्ते मार्ग व्हायच्या ऐवजी र्माग झाले, हे कोणाचे ज्ञान ? प्रचंड चीनपासून पिटुकल्या सिलोनपर्यंत कोणीही भारताचा प्रदेश खिशात घालावा असा प्रकार आपण निमूटपणे पाहतो हा कोणाचा सोशिकपणा ? अन शेवटी म्हणजे अस्मादिकांचे लहानपण ज्या लहानशा गावात गेले तेथे रात्री रस्त्यावरच्या दिव्याखाली शिस्तीत वर्तुळाकार उभ्या राहिलेल्या गाढवांनी भरविलेले संगीत-संमेलन मी पाहिले व ऐकले आहे. हिंदुस्थानातल्या मंडळींना कोठलीही गोष्ट करायची म्हणजे आधी स्टँडिंग कमिटीची मिटिंग लागते त्याचे मूळ हेच नाही तर कोणते ?

## ▫ रोममध्ये राम नाही !

अमेरिकन मंडळी जग-पर्यटणाच्या हौसेपायी फार पैसे परदेशांत खर्च करतात. अशी तक्रार मध्यंतरी अध्यक्ष जॉन्सन यांनी केली आणि 'फार भटकू नका' अशी त्यांना ताकीद दिली तेव्हा तेथल्या वर्तमानपत्रांत पर्यटण-विरोधी जाहिराती झळकू लागल्या. त्यात एका जाहिरातीत म्हटले होते—" पॅरिसचा एफेल टॉवर गंजला आहे—म्हणून अमेरिका आधी बघा. " परकीय चलनाची नेहमीच चणचण असणाऱ्या आपल्या सरकारने ही कल्पना उचलायला हरकत नाही. पहिली गोष्ट म्हणजे सरकारने पर्यटणखाते बंद करून पर्यटण-विरोधी खाते उघडावे आणि या खात्याच्या मार्फत परदेश-प्रवासातले धोके स्पष्ट करावेत—

न्यूयॉर्कला जाऊन एकशे दोन मजल्यांची एंपायर स्टट बिल्डिंग पाहायला चढू नका—वर फार जोराचा वारा असतो. त्यामुळे सर्दी होण्याची भीती आहे. नायगरा धबधबा पाहण्यासाठी अमेरिकेला जाऊ नका—कपडे भिजतील. लंडन पाहणे धोक्याचे आहे—कारण तेथल्या तरुण मंडळींत बाई कुठली व बुवा कुठला हे पोशाखावरून आणि केसांच्या लांबीवरून तुम्हाला ओळखता येणार नाही. इटालीत पिसाचा कलता मनोरा पाहायला जाऊ नका—अंगावर पडला तर काय कराल ? टोकियो टाकाऊ आहे, रोममध्ये राम नाही, मॉस्कोत मजा नाही, हाँगकाँगपेक्षा किंगकाँग बरा इत्यादी इत्यादी. ○




‘जुगाऱ्याची बेफिकिरी लेनिनच्या स्वभावात भरपूर आहे. मात्र हा जुगार तो वैयक्तिक स्वार्थासाठी खेळत नाही. अनेक गोंधळांनी घुसमटून गेलेल्या या जगात आपल्याला महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे याची त्याला जाणीव आहे.’ *–गोर्की*

लेनिनचे एक स्वप्न साकार झाले होते.

रशियात बोल्शेव्हिक राजवट प्रस्थापित झाली होती आणि या राजवटीला विरोध करू शकणारी एकही शक्ती आता रशियात शिल्लक उरलेली नाही याबद्दल तो निश्चित होता. या साऱ्या यशाचा तो एकटा मानकरी होता. वस्तुतः स्वतः संबंधी लेनिन असे सहज म्हणू शकला असता की, ‘बोल्शेव्हिक पक्षाचा मीच जनक आहे. नोव्हेंबर क्रांती घडली तीही माझ्याच प्रयत्नांमुळे. बोल्शेव्हिक राजवटीला ज्या ज्या वेळी धोका निर्माण झाला त्या प्रत्येक वेळी मीच या राजवटीला संकटांच्या खाईतून बाहेर काढले. एकदा मी लोकांचा

विरोध सहन करून जर्मनीशी तह केला तर तशी वेळ आली तेव्हा शेतकऱ्यांच्या मनातील असंतोष दूर करण्यासाठी मानव्या आर्थिक धोरणाचा पुकारा केला बोल्शेव्हिक क्रांती केवळ रशियापुरतीच मर्यादित न ठेवता साऱ्या जगभर तिचा प्रसार केला पाहिजे हा आग्रहही माझाच आणि यासाठी कॉमिन्टर्नची स्थापना करण्याचा उपक्रमही माझाच. साम्यवादाच्या तत्त्वज्ञानाला जागतिक शक्ती प्राप्त करून देण्याची किमयाही माझीच.'

परंतु लेनिनने अशी बढाई कधीच मारली नाही.

उलटपक्षी कोणी त्याची प्रशंसा करू लागला तर त्याला कमालीचा संकोच वाटे.

लेनिनच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त बोल्शेव्हिक पक्षाच्या मॉस्को शाखेने सत्कार-समारंभ आयोजित केला होता. या वेळी आपल्या स्तुतिपर होणारी भाषणे आपल्याला ऐकावी लागू नयेत म्हणून लेनिनने या समारंभाला गैरहजर राहण्याचे ठरविले. परंतु सहकाऱ्यांच्या आग्रहापुढे त्याचे चालू शकले नाही. तरीदेखील तो या समारंभाला मुद्दामच उशिरा गेला. उत्तरादाखल बोलताना तो म्हणाला, 'मित्रांनो, मला तुमचे दोन कारणांसाठी आभार मानायचे आहेत. एक तर तुमच्या सदिच्छांबद्दल आणि दुसरे असे की, माझ्या गौरवार्थ झालेली भाषणे माझ्या कानांवर पडली नाहीत याबद्दल.'

या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रत्येक सोव्हिएट वृत्तपत्रात लेनिनच्या कार्याची प्रशंसा करणारा मजकूर सतत कित्येक दिवस प्रसिद्ध होत होता. त्यासंबंधी बॉरव ब्रुयेव्हिचजवळ बोलताना लेनिन म्हणाला, 'हे सारं कशासाठी चाललंय! सध्या मला वृत्तपत्रं वाचणं अशक्य झालेलं आहे. कोणताही अंक घ्या; त्यात माझ्यासंबंधी काही ना काही मजकूर आहेच, कोणत्याही एका व्यक्तीची एवढी अफाट स्तुती करणं मला बिलकूल मंजूर नाही. निदान मार्क्सवाद्यांना तर हे खचित शोभत नाही. ही गैरवाजवी स्तुती ताबडतोब थांबलीच पाहिजे. आणि हे बघ, सगळीकडे माझीच छायाचित्रं प्रसिद्ध होत आहेत. मला तर हा सारा प्रकार उबग आणणारा वाटतो.'

राजकीय नेत्यांना अभिप्रेत असलेल्या आत्मगौरवापासून लेनिन नेहमीच दूर राहात असे. कॉमिन्टर्नच्या एका बैठकीत त्याला कोणी तरी विचारले, 'तुम्हांला दुसरी कोणती परकी भाषा नीट बोलता येते?'

११

'कोणतीच नाही'—लेनिनने तत्काळ उत्तर दिले. परंतु ही गोष्ट खरी नव्हती. त्याला जर्मन भाषा चांगली येत होती. कॉमिन्टर्नच्या तिसऱ्या परिषदेत त्याने जर्मन भाषेतच भाषण केले होते. बोल्शेव्हिक पक्षाच्या एका परिषदेत प्रत्येकाला 'तुमचं वैशिष्टय कोणतं'? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्या वेळी लेनिनने उत्तर दिले होते—'कोणतंही नाही.'

एकदा नाथान आल्टमान हा शिल्पकार लेनिनचा पुतळा तयार करीत होता. आपण हा पुतळा तयार करीत असताना लेनिनने आपल्यासमोर विवक्षित तऱ्हेने बसले पाहिजे, अशी आल्टमानची अपेक्षा होती. परंतु तसे करण्याने या पुतळ्यातील सहजता जाईल, असे लेनिनला वाटले. तो आल्टमानला म्हणाला, ' मी माझं काम करतो, तू तुझं काम चालू ठेव. त्यातून जसा काही पुतळा तयार होईल, तसा होऊ दे.'

लेनिनच्या स्वभावातील या विसंगतीचा त्याच्या सहकाऱ्यांनाही बोध होत नसे. माक्झिमा गोर्कीसारख्या प्रतिभावंत साहित्यिकाला लेनिनच्या सहवासात राहूनही त्याच्या स्वभावाचे नेमके विश्लेषण करता आलेले नाही. तरीदेखील लेनिनसंबंधी आपल्याला काय वाटले, हे नमूद करताना गॉर्की लिहितो–' जुगाऱ्याची बेफिकिरी लेनिनच्या स्वभावात भरपूर आहे, असे मला वाटते. मात्र हा जुगार तो स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी खेळत नाही, हेही तितकेच खरे आहे. आपला अंतरात्मा आणि बाहेरचे जग यांचा काही तरी अतूट संबंध आहे, असे लेनिन मानतो. विविध प्रकारच्या गोंधळांनी घुसमटून गेलेल्या या जगात आपल्यालाही एक महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे, या जाणिवेने त्याचे कार्य चालू असते. हा सारा गोंधळ नष्ट करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर आहे, असेही तो मानतो.'

लेनिनच्या स्वभावातील आणखी किती बारकावे गोर्कीने टिपलेले आहेत. तो लिहितो–' लेनिन ज्या उत्साहाने बुद्धिबळे खेळतो, तितक्याच उत्साहाने ' हिस्टरी ऑफ ड्रस ' सारखा जाडाजुडा ग्रंथही वाचतो. आपल्या सहकाऱ्यांशी तास न् तास चर्चा करताना तो जसा रंगून जातो तितकाच त्याला मासे पकडण्यातही रस वाटतो. कोळ्यांच्या गलिच्छ मुलांच्या सहवासातही तो रंगून गेलेला आढळतो. जंगलांतून भटकताना सूर्यकिरणांमुळे वृक्षांचे बदलणारे रंग पाहताना लेनिन भोवतालचे जग विसरलेला असतो. एखाद्या संध्याकाळी जुन्या लोककथा ऐकताना तो चटकन विषण्ण होऊन म्हणतो–' खरंच, मला रशियासंबंधी किती कमी माहिती आहे ! सिबर्स्क, कझान, पीटर्सबर्ग, विजनवास–बस्स, यांपेक्षा मला अधिक काहीही माहिती नाही.'

' लेनिनला विनोद आवडतो. एखाद्या विनोदावर तो इतका खूष होतो की मोठ्यांदा हसताना त्याचे सारे शरीर हेलकावे घेऊ लागते. शेवटी तर त्याच्या डोळ्यांत आसवे गोळा होतात. परंतु हाच लेनिन जेव्हा चिडतो तेव्हा त्याच्या डोळ्यांतून ठिणग्या बाहेर पडत आहेत असा भास होतो.'

लेनिनच्या खाजगी जीवनात आणि राजकीय जीवनात किती तरी तफावत होती हेच गोर्कीला सांगावयाचे होते.

आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांच्या बाबतीत लेनिन कमालीचा असहिष्णू होता. विरोधकांना बदनाम करण्यासाठी त्यांच्यावर खोटेनाटे आरोप करायला त्याला मुळीच संकोच वाटत नसे. बोल्शेव्हिक क्रांती झाल्यानंतरच्या पहिल्या वर्ष-सहा

महिन्यांतील एक घटना उदाहरण म्हणून सांगता येईल. पेट्रोगाडमधल्या काही सैनिकांनी मद्यांच्या दुकानात जाऊन बराच गोंधळ घातला, ही बातमी कळताच कोणतीही चौकशी न करता लेनिन म्हणाला, ' ही सारी कॅडेट पक्षाची बद-माषी आहे. '

मार्तोव्हला बदनाम करण्यासाठी लेनिन सतत त्याचा ' लोकशत्रू ' म्हणून उल्लेख करीत असे. ' रशियात दोनच सच्चे कम्युनिस्ट आहेत. एक लेनिन आणि दुसरी मादाम कोलोन्ताय '. हे मार्तोव्हचे मत लेनिनच्या कानांवर येताच तो खदखदून हसला आणि म्हणाला, ' मार्तोव्ह बराच शहाणा झालेला दिसतोय ! '

लेनिन असली कुचेष्टेची भाषा आपल्या सहकाऱ्यांच्या संदर्भातही वापरत असे. शिक्षणमंत्री लुनाखरस्की आणि कॉमिन्टर्नचा प्रमुख मानुइल्स्की हे दोघेही बिनडोक आहेत असे त्याने एका पत्रात म्हटले आहे. राडेकसंबंधी लिहिताना लेनिन म्हणतो, ' आपण काय करीत आहोत हे जर राडेकला समजत नसेल तर तो मूर्ख आहे. आणि समजून उमजून जर तो असे वागत असेल तर तो लुच्चा आहे. ' याच पत्रात लेनिनने पिआटाकोव्हसंबंधी लिहिले आहे– ' त्याच्या डोक्यात मेंदूच नसावा असे मला वाटते. पिआटाकोव्ह म्हणजे शुद्ध डुक्कर आहे. '

१९१६ च्या नोव्हेंबरमध्ये पिआटाकोव्ह आणि बुखारिन यांच्याशी भांडण झाल्या-नंतर त्यांना लिहिलेल्या पत्रात लेनिन म्हणतो– ' तुमच्याशी शक्य तितके नमते घेण्याचा मी आतापर्यंत प्रयत्न केला आहे. परंतु तरीही तुमची समजूत पटत नसेल तर मी तुमचे तुकडे करून तुम्ही किती मूर्ख होता हे जगाला समजावून देईन. ' १९१७ च्या फेब्रुवारीमध्ये ट्रॉटस्कीसंबंधी लेनिनने लिहिले आहे– ' त्या बदमाषाने उजव्या गटाच्या ' नोव्हीमिर'शी दोस्ती केलेली आहे. ट्रॉटस्की हा असा आहे. तो केवळ स्वत:पुरताच विचार करतो. आपण डाव्या गटाचे आहोत, असा जरी तो ओरडा करीत असला तरी त्याला उजव्या गटाशी हातमिळवणी करण्यात काहीच शरम वाटत नाही. '

एखाद्यावर हल्ला करताना लेनिन त्या व्यक्तीसंबंधी आपले खाजगी मत काय आहे याचा मुळीच विचार करीत नसे. कोणावर तो कोणत्या शब्दांत टीका करील याचा भरवसा नसे. लेनिनच्या या स्वभावासंबंधी लिहिताना गोर्की म्हणतो–' लेनि-नचे सार्वजनिक जीवनातील सूत्र अगदी साधे आहे. जो आपल्याबरोबर येत नाही तो आपला शत्रू आहे अशी त्याची धारणा आहे. '

आपल्या या विधानाच्या पुष्टीसाठी गोर्कीने लेनिनचे भाषण उद्धृत केले आहे. तरुण कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या सभेत बोलताना लेनिन म्हणाला होता– ' आपल्या सिद्धान्ताला जी नीती विरोधी ठरते ती नीती आपण ठोकरून दिली पाहिजे. एकदा वर्गयुद्ध सुरू झाले की नीति-अनीतीचा विचार करायचा नसतो. पिळवणूक करणारी जीर्ण समाजरचना नष्ट करण्यासाठी जे जे काही करावे लागेल ते सारे

नैतिकच आहे. याशिवाय इतर कोणतीच नीती आम्ही मानीत नाही. दिखाऊ नीतीचा आपण बोजवारा उडवला पाहिजे. कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करणे याव्यतिरिक्त जगात दुसरे कोणतेच नैसर्गिक मूल्य अस्तित्वात नाही.'

धर्मासंबंधी विवेचन करताना लेनिन लिहितो– 'धर्म म्हणजे आध्यात्मिक दडपशाहीचा एक प्रकार आहे. मृत्यूनंतरच्या जीवनाचा विचार करणारा धर्म श्रमिक जनतेने आहे त्याच परिस्थितीत राहावे असे सांगून पिळवणुकीला मदतच करीत असतो. जे लोक दारिद्र्यात जीवन कंठत आहेत त्यातच त्यांनी समाधान मानावे, असे धर्म सांगतो. लोकांनी असे वागल्यामुळे त्यांना स्वर्गप्राप्ती होईल असे आमीषही दाखविले जाते. श्रीमंतांनी थोडासा दानधर्म केला की त्यांना स्वर्गाचे तिकीट मिळते असे त्याना धर्ममार्तंडांकडून सांगितले जाते. म्हणून धर्म ही एक अफू आहे, ते एक प्रकारचे आध्यात्मिक मद्य आहे असे मी मानतो. दारिद्र्यातही लोकांना समाधान मानावयास सांगणारा धर्म माणसांना भांडवलशाहीचे गुलाम करून सोडतो.'

लेनिन हा पक्का राजकारणी असल्यामुळे आपल्या भूमिकेत केव्हाही बदल करणे त्याला सोईस्कर वाटत होते. राडेकवर हल्ला करणाऱ्या लेनिनने राडेकला खूष करण्याचाही अनेक वेळा प्रयत्न केलेला आढळतो. लेनिनने बऱ्याच वर्षांपूर्वी लिहिलेले लेख राडेक वाचत बसला असताना लेनिन त्याला म्हणाला, 'मी त्या वेळी किती मूर्ख होतो, हे या लेखावरून सहज कळून येत असेल नाही?'

संगीत, साहित्य, चित्र आदी कलांबाबत लेनिनची मते पारंपरिक होती. राजकारण आणि समाजकारक यांत आमूलाग्र क्रांती घडवून आणण्यासाठी धडपडणाऱ्या लेनिनचा ललित–कलांमधील प्रायोगिकतेला विरोध होता. लंडन, पॅरिस आदी शहरांतील वास्तव्यात त्याने कधीही चित्रप्रदर्शनांना भेट दिलेली नव्हती. संगीताच्या मैफलींनाही तो क्वचितच जात असे. काव्याबाबत बोलताना तो म्हणायचा, 'ते कानांना गोड लागतं, पण त्यांत फारसा अर्थ नसतो.' तुर्गेनेव्हच्या साहित्याबद्दल लेनिनला आदर वाटायचा. परंतु 'व्हॉट इज टु बी डन?' ही चेर्निव्हेशस्कीची कादंबरी ही त्याची सर्वांत आवडती कादंबरी होती. 'नाईन्टी थ्री' या व्हिक्टर ह्युगोच्या कादंबरीबद्दलही तो नेहमी कौतुकोद्गार काढत असे. नेक्रासोव्ह आणि तिउचेव्ह हे त्याचे आवडते कवी होते. डोस्टोव्हस्की त्याला प्रतिगामी वाटे तर टॉल्स्टॉयच्या साहित्यातील नैतिक प्रतिपादन त्याला मान्य नसे.

टॉल्स्टॉयच्या साहित्यासंबंधी लिहिताना लेनिन म्हणतो, 'टॉल्स्टॉयच्या लिखाणातील आणि शिकवणुकीतील विसंगती इतक्या ठळक आहेत की, त्या सहज नजरेस पडतात. जागतिक वाङ्मयात रशियन साहित्याला स्थान प्राप्त करून देणारा थोर लेखक हे टॉल्स्टॉयचे एक स्वरूप आहे तर उमरावी थाटाचा जमीनदार आणि संत–प्रवृत्तीचा महामूर्ख हे त्याचे दुसरे रूप आहे. कारण तो धर्मासारख्या जगातील सर्वांत बदनाम झालेल्या मूल्याचा प्रचार करीत असतो.'

याच लेनिनने बीथोव्हन वृंदवादन एकल्यावर गोर्कीशी बोलताना असे सांगितले—'अॅपासिओनाटा' इतकी दुसरी चांगली संगीतिका मी ऐकलेली नाही. मला ती दररोज ऐकावीशी वाटते, इतके त्यातील संगीत स्वर्गीय आहे. परंतु सतत संगीत ऐकणं माझ्या स्वभावात नाही. ते माझ्या अंगावर येतं.'

क्रेमलिनमधल्या वास्तव्यात लेनिनने जास्तीत जास्त दहा एक नाटके पाहिली असतील. गोर्कीचे 'लोअर डेप्थ्स' हे नाटक पाहायला तो मुद्दाम गेला होता. परंतु आपल्या मित्राचे हें नाटक त्याला आवडले नाही. आणि तेव्हापासून नाटक पाहायचेच नाही, असे त्याने ठरविले. त्यानंतर बऱ्याच दिवसानी त्याने डिकन्सचे 'दि क्रिकेट ऑन दि हर्थ' हे नाटक पाहिले. परंतु त्या वेळीही पहिल्या अंकानंतर तो उठून गेला.

ललितकलांमध्ये होत असलेल्या नवनव्या प्रयोगांबद्दल त्याला किंचितही आस्था नव्हती. नवनाटचासंबंधी बोलणे निघाले असताना लेनिन म्हणाला, 'केवळ नवी आहे म्हणून एखाद्या गोष्टीचे कौतुक करणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे. मला कोणी रांगडा म्हटलं तरी चालेल. परंतु साहित्यातील भिन्न भिन्न वादांबद्दल मला काहीही कळत नाही हे सांगायला मी संकोचणार नाही.'

तत्त्वचर्चेत रममाण होणारा आणि त्याबरोबरच आम जनतेला आपल्या पाठीमागे खेचण्याचे सामर्थ्य असलेला, डोळ्यापुढे स्वप्ने रंगवताना वास्तवाचे भान न सोडणारा असे लेनिनच्या व्यक्तिमत्त्वाचे संमिश्र स्वरूप होते.

जागतिक कामगार क्रांती हे लेनिनचे लाडके स्वप्न होते. परंतु त्यासाठी दैनंदिन राजकारणाकडे त्याचे मुळीच दुर्लक्ष होत नसे. आपली राजवट स्थिर राखण्यासाठी काय केले पाहिजे, यासंबंधी तो जागरूक असायचा. त्याची आपल्या तत्त्वज्ञानावर असीम निष्ठा होती. परंतु त्याबरोबरच आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी कोणतीही तडजोड करायला त्याला संकोच वाटत नसे. त्याने आपल्या घोषणा वेळोवेळी बदललेल्या आहेत. जोपर्यंत केरेन्स्कीविरुद्ध लोकमत पेटविण्यासाठी घटना समितीचा उपयोग होत आहे, तोपर्यंत त्याने घटना समितीच्या मागणीचा पाठपुरावा केला. परंतु जेव्हा घटना समिती आपल्याविरुद्ध जात आहे, असे त्याला आढळून आले तेव्हा क्षणभरही विचार न करता त्याने ती समिती विसर्जित केली. जेव्हा सोव्हिएटमध्ये आपल्याला हुकमी बहुमत मिळत नाही, असे लेनिनला आढळून आले तेव्हा त्याने बोल्शेव्हिक पक्षाची हुकूमशाही प्रस्थापित केली. इतकेच नव्हे तर पक्षाच्या हुकूमशाहीच्या नावाखाली केवळ स्वतःची हुकूमशाही स्थापन करण्याचीही त्याने चतुराई दाखविली. विरोधकांनी एखादी कल्पना सुचविली की, त्यांना बदनाम करण्यासाठी लेनिन त्या कल्पनेची कुचेष्टा करी. हे विरोधक निष्प्रभ झाले की, मग तो तीच कल्पना आपल्या फायद्यासाठी दाखवीत असे. अर्थात हे सारे करताना आपल्या मूळ ध्येयापासून तो दूर जात नसे, हे मान्य केलेच पाहिजे. ज्या दिवशी त्याने आजीव क्रांतिकारकाची शपथ घेतली, तेव्हापासून त्याने आपले सारे आयुष्य

कामगार–क्रांतीसाठी व्यतीत केले. अर्थात कामगार–क्रांतीची त्याची स्वत:ची अशी खास कल्पना होती आणि त्या अनुरोधानेच त्याच्या कार्याची दिशा ठरत असे. आपले साध्य आणि साधन यांत सुसंवादित्व असले पाहिजे, असा त्याचा कधीच आग्रह नसे. आपले ध्येय साध्य करण्यासाठी जे कोणते मार्ग सोईस्कर असतील, त्या सर्व मार्गांवरून त्याने बिनदिक्कतपणे वाटचाल केली. साध्य महत्त्वाचे, साधनांना तसे काहीच महत्त्व नाही, हे लेनिनच्या कार्यप्रणालीचे मुख्य सूत्र होते.

आजच्या परिभाषेत बोलायचे तर लेनिन चांगल्या अर्थाने अतिकुशल संधिसाधू होता.

तत्त्वज्ञानासाठी लेनिन कार्ल मार्क्सचे शिष्यत्व पत्करले असले तरी प्रवृत्तीने तो त्काचेव्ह आणि नेचॅयेव्ह या आजीव क्रांतिकारकांचा वारस होता. त्काचेव्ह आणि नेचॅयेव्ह यांचे 'संपूर्ण आणि सर्वंकष' विनाशांच्या आग्रहाने तो तरुणपणापासून भारला गेला होता. १९०४ मध्ये बॉंख-ब्रुयेव्हिचेशी बोलताना लेनिन म्हणाला होता, 'खरं सांगायचं तर त्काचेव्ह आणि नेचॅयेव्ह हेच आपल्याला इतरांपेक्षा अधिक जवळचे आहेत.' १९१७ ची क्रांती झाल्यानंतरही तो प्रत्येकाला त्काचेव्ह वाचण्याचा आग्रह करीत असे.

नचॅयेव्हइतका संघटनाकुशल क्रांतिकारक आपल्याला माहीत नाही असेही लेनिन वारंवार म्हणत असे. राजघराण्यातील कोणकोणत्या व्यक्तींना आपण ठार केले पाहिजे असे एकदा नेचॅयेव्ह याला विचारण्यात आले होते. नेचॅयेव्ह उत्तरला होता– 'संपूर्ण राजघराणंच आपल्याला नष्ट करायचं आहे.' नेचॅयेव्हचे हे वाक्य लेनिनने अनेक वेळा स्वत:शी उच्चारले होते. लेनिनने क्लॉसविट्झचाही चांगला अभ्यास केला होता. युद्ध हा राजकारणाचाच एक अपरिहार्य भाग आहे या क्लॉसविटझच्या वचनाचे त्याला सदैव स्मरण होते. क्लॉसविट्झच्या पुस्तकावर आपला अभिप्राय नोंदवून ठेवताना लेनिनने लिहिले आहे–

'क्लॉसविट्झ हा एक चांगला नेता होता.'

रशियासंबंधीही लेनिनला खास जिव्हाळा वाटत नव्हता. साम्यवादाची एक विशाल प्रयोगशाळा या भावनेनेच तो रशियाकडे पाहात होता. त्यामुळेच रशियन जनतेच्या तात्कालिक गरजांकडे लक्ष देण्याची त्याला कधीच गरज वाटली नाही. आपला प्रयोग यशस्वी व्हावा यासाठी त्याने कित्येकांचे बळी घेतले. दया हा भेकडांचा सद्गुण आहे असे तो म्हणत असे. चेकाचे पोलिस दररोज हत्याकांडे घडवून आणत होते आणि त्याबाबत लेनिनने एकदाही नापसंतीचा शब्द उच्चारलेला नाही. या बाबतीत गोर्की काही सांगू लागला तर लेनिन उत्तर द्यायचा 'या क्षुल्लक गोष्टीबाबत चर्चा करून वेळ वाया घालविण्याची माझी तयारी नाही.'

आपल्या शत्रुबाबत दयामाया दाखवणे त्याला कधीच जमले नाही. त्याचप्रमाणे आपल्या एखाद्या सहकाऱ्याने अनैतिक वर्तन केले, परंतु हा सहकारी आपल्याला

उपयोगी पडणार आहे अशी त्याची खात्री असली तर लेनिन त्या अनैतिक वर्तनाचेही समर्थन करीत असे. तो म्हणायचा, 'राजकारणात नीति-अनीती ही गोष्ट अस्तित्वातच नसते. राजकारणात जाणायची असते ती फक्त आपली गरज.'

लेनिनच्या वक्तृत्वात अशी काही धार होती की त्यामुळे सर्वसामान्य कामगारवर्गाला हा आपला नेता आहे असे चटकन वाटू लागायचे. आपण सत्ता हस्तगत केल्याशिवाय आपल्याला काहीही करता येणार नाही, यासंबंधी त्याची प्रारंभापासूनच खात्री होती. सत्ता हस्तगत करण्याची उचित संधी प्राप्त होईपर्यंत तो विजनवासात भटकत होता; परंतु आता तशी संधी आली आहे हे कळताच तो जिवाचा धोका पत्करून पेट्रोग्राडला परतला होता. सत्ता हाती आल्यानंतर ती आपल्या हातून हिसकावली जाणार नाही याचीच तो सदैव काळजी करीत होता. लोकांचे सर्व अधिकार हिरावून घेऊन आणि देशात दहशतवादाचे वातावरण निर्माण करून त्याने आपली सत्ता सुरक्षित राखली. रशियन जनतेला तिचे हिरावून घेतलेले अधिकार पुढे कधी काळी देता येतील की नाही यासंबंधी लेनिनने आपल्या अखेरच्या दिवसांत विचार केला होता काय यासंबंधी कोणताच पुरावा उपलब्ध नाही. साम्यवाद आणि भांडवलशाही यांचा संघर्ष अटळ असून या संघर्षात साम्यवादाचा विजय होईपर्यंत लोकांच्या स्वातंत्र्याचा विचार करण्याचे कारण नाही अशी त्याची धारणा असावी. जोपर्यंत संघर्ष अस्तित्वात आहे तोपर्यंत हुकूमशाहीदेखील तितकीच अपरिहार्य आहे असेच लेनिन मानत होता.

कामाचा ताण नसला की मित्रांशी गप्पा मारण्यात लेनिन मशगुल होऊन जाई. कचेरीत गंभीर दिसणारा लेनिन अशा वेळी हास्यविनोदात असा काही रंगून जाई की सारे वातावरण तो आपल्या अस्तित्वाने उजळून टाकीत असे. एखाद्या विनोदावर ही स्वारी खूष झाली की खदखदून हसे आणि या हास्यात इतरांचे आवाज बुडून जात. आपल्या सहकाऱ्यांच्या मुलांशी खेळण्यातही लेनिनला आनंद वाटे. क्रेमलिनमध्ये सत्तासूत्रे स्वीकारल्यानंतरही वेळ सापडला की लेनिन भोवतालच्या बालगोपालांना बोलावून त्यांच्याबरोबर निरनिराळे खेळ खेळत असे. बेझिन हा लेनिनचा जवळचा मित्र होता. त्याची माया नावाची मुलगी लेनिनच्या घरी आली की लेनिन इतर सर्व कामे बाजूला ठेवून तास न तास तिच्याबरोबर खेळत राही. लेनिन आणि माया लपंडाव खेळत असल्याचे एक छायाचित्रही त्या काळात प्रसिद्ध झाले होते.

शनिवार-रविवार लेनिन क्रुपस्काया आणि मारिया यांना घेऊन मॉस्कोलगतच्या खेड्यात फिरायला जाई. लेनिनची गाडी खेडेगावात पोचली की शेतकऱ्यांची मुले गाडीभोवती जाऊन 'आम्हांलाही गाडीत घ्या ना' असा एकच गिल्ला करीत. लेनिन त्यांची मागणी तत्काळ मान्य करीत असे. सारी गाडी धुळीत माखलेल्या मुलांनी भरून जायची आणि तशा गर्दीत लेनिन एकेका मुलाला जवळ घेऊन

त्याच्याशी गप्पा मारीत बसायचा.

शनिवार उजाडला की लेनिन आपल्या शोफरला म्हणायचा, ' शहरातल्या गोंगाटापासून–मॉस्कोतल्या गजबजाटापासून–दोन दिवस तरी दूर जाऊन यायचं. ' उन्हाळा असला तर लेनिन मॉस्कोलगतच्या जंगलात जाऊन शिकार करीत बसायचा. त्यानंतर तलावात अंघोळ करून तो हिरवळीवर विश्रांती घेत असे. शनिवारची रात्र तो एखाद्या शेतकऱ्याच्या घरातही व्यतीत करी. आपल्या पाहुण्यासाठी शेतकरी चांगल्या अंथरुणाची व्यवस्था करू लागे. त्याला थांबवून लेनिन म्हणे, ' नको, मला या चाऱ्याच्या ढिगावर चांगली झोप येते. अंथरूण वगैरे काही नको. खेड्यातला हा आनंद शहरात मिळत नाही. बस्स, मी इथंच झोपणार. '

एवढे बोलून अंगावर कोट किंवा ब्लँकेट घेत लेनिन चाऱ्याच्या ढिगावर आडवा होई. सकाळ झाली की नदीवर जाऊन तोंड धुणे आणि नंतर शिकार करणे,गवतावर पडून राहणे किंवा जंगलात भटकणे असा लेनिनचा दिनक्रम असे. सोमवारी सकाळी लेनिनची गाडी पुन्हा मॉस्कोच्या रोखाने धावत निघायची.

लेनिन असाच एकदा एका खेडेगावात आला असताना तेथल्या शेतकऱ्याशी गप्पा मारीत बसला. त्या दोघांचे बराच वेळ बोलणे झाल्यानंतर तो शेतकरी म्हणाला, ' लेनिन नावाचा माणूस सध्या रशियावर राज्य करीत आहे असं मी ऐकलं आहे. तुझं नाव लेनिनच आहे. तो लेनिन जर तुझ्यासारखा असता तर रशिया कितीतरी सुखी झाला असता. '

मंद स्मित करीत लेनिनन त्या शेतकऱ्याचा निरोप घेतला. गाडीत बसल्यानंतर त्या शेतकऱ्याबद्दलच लेनिनच्या मनात विचार येत होता. त्या शेतकऱ्याला उद्देशून लेनिन स्वतःशी पुटपुटला–' भाबडा बिचारा. '

क्रेमलिनमध्ये परतल्यानंतर लेनिन हे सारे बोलणे विसरून जाई. राजकारणाच्य डावपेचात गुरफटले गेल्यानंतर लेनिनला इतर कोणत्याच गोष्टीचे भान राहात नसे. जागतिक क्रांती कशी घडवून आणता येईल हाच एक ध्यास त्याच्या मनाला व्यग्र करून टाकी.

विशेषतः क्रोन्स्टाट येथील बंडाचा बीमोड केल्यानंतर कॉमिन्टर्नच्या कार्यावर लक्ष केंद्रित करण्याचे त्याने ठरविले होते.

परंतु आता मनाच्या उभारीला त्याचे शरीर साथ देत नव्हते. अनेक कष्ट आणि ताण सहन केलेल्या या तापसाची काया थकत चालली होती.

(क्रमशः)




## □ हॅट्स ऑफ हर्डीकर

रणजी करंडक अंतिम सामन्यात मुंबईने सुप्रसिद्ध ब्रेबॉर्न स्टेडियमवर मद्रासचा पहिल्या डावावर ५४ धावांनी पराभव केला आणि दोन्ही डावांवर सामना अनिर्णित ठेवण्याची अभूतपूर्व कामगिरी बजावून लागोपाठ दहा वर्षे रणजी करंडक स्वत:कडे राखण्याचा जागतिक विक्रम केला. ऑस्ट्रेलियातील 'शेफिल्ड शील्ड' स्पर्धेत न्यू साऊथ वेलस संघाने सतत नऊ वेळा अजिंक्यपद मिळविले होते. मुंबईला हे जे यश मिळाले ते सुखासुखी नाही. मद्रासचा दुसरा डाव संपला तेव्हा मुंबईला ३९० मिनिटांत २४९ धावा जिंकण्यासाठी हव्या होत्या. चौथ्या दिवशी मुंबईने १ बाद ४५ धावा केल्या. पाचवा शेवटचा सबंध दिवस आणि २०४ धावा एवढेच काम मुंबईकडे राहिले होते.

मद्रासच्या पहिल्या डावात २५८ व दुसऱ्या डावात ३०२ धावा झाल्या. त्यात आर. प्रभाकर (६७), सी. के. भास्कर (नाबाद ७६), पी. के. बेलिअप्पा (५१), के. आर. राजगोपाल (७३), मायकेल दळवी (५१) अशा प्रमुख धावा होत्या. अरुण वर्दे या मुंबईच्या वेगवान गोलंदाजाने पहिल्या डावात ४५ धावांत ४ व लेग स्पिनर बाळू गुप्ते यांनी दोन्ही डावांत ६ बळी घेतले. मुंबईच्या पहिल्या डावात ३१२ धावा झाल्या. त्यात अशोक मनकड यांनी शतक (११२) झळकाविले. कर्णधार हर्डीकर यांनी ७३ धावा केल्या.

शेवटच्या दिवशी उपाहारापर्यंत मुंबईचे ५ फलंदाज १२२ धावांत तंबूत परतले. मद्रासला एक मोठी संधी चालून आली होती. परंतु मनोहर हर्डीकर आणि एकनाथ सोळकर ही जोडी एकत्र जमली आणि पाचवा सबंध दिवस खेळून त्यांनी सामना अनिर्णित ठेवला. मुंबई ५ बाद २२५ धावसंख्येत हर्डीकर ६२ व सोळकर ५५ धावांवर नाबाद राहिले. जिद्द, एकाग्रचित्त आणि फलंदाजीचे योग्य तंत्र यांनी हर्डीकर हे मद्रास आणि विजय यांच्यामध्ये पर्वतासारखे उभे राहिले. सोळकर हे नवोदित खेळाडू एखाद्या अनुभवी फलंदाजाप्रमाणे लढत देत होते.

गतवर्षी नाडकर्णींची उचलबांगडी करून मुंबई क्रिकेट असोसिएशनने हर्डीकरांची कर्णधारपदी नेमणूक केली. त्या वेळी जरी नाडकर्णींना नेतृत्वावरून काढल्यावरून हळहळ व्यक्त करण्यात आली तरी नाडकर्णींना त्या पूर्वी नेतृत्व देताना हर्डीकरांना

का दिले गेले नाही, असे विचारणारा एक मोठा वर्ग मुंबईत होताच. उम्रीगर आणि रामचंद यांच्या निवृत्तीनंतर मुंबई संघात एक पोकळी निर्माण झाली. दुर्दैवाने त्या वेळी हर्डीकर मुंबई संघाकडून नियमित खेळ शकत नव्हते. नाडकर्णींचे नाव कसोटी सामन्यात सतत गाजत होते आणि त्याचा प्रभाव पडून मुंबईने नाडकर्णींना संघ-नायकत्व दिले. नाडकर्णींना गेल्या वर्षी मुंबईचे नेतृत्व न देण्यामागे निवडसमिती-ऐवजी खुद्द त्यांच्या संघातील खेळाडूच होते, असे म्हणतात. म्हणूनच हर्डीकरांकडे नेतृत्व आले, ही फार चांगली गोष्ट झाली.

हर्डीकरांचा रणजी करंडक स्पर्धेतील पराक्रम उल्लेखनीय होता. १९५५–५६ मध्ये २० व्या वर्षीच त्यांनी गुजरातविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात ५२ धावा केल्या व दोन्ही डावांत ७८ धावांत ७ विकेट्स घेतल्या. १९५८–५९ च्या वेस्ट इंडिज-विरुद्धच्या कसोटी सामन्यात त्यांनी पहिल्याच षटकात २ विकेट्स घेतल्या. १९५६–५७ मध्ये त्यांनी गुजरातविरुद्ध २०४ धावा रचल्या. १९५५–५६ मध्ये त्यांनी बंगालचे ८ बळी अवघ्या ३९ धावांत घेतले होते. १९५७–५८ मध्ये ते इंग्लंडला लँकेशायर लीगमध्येही खेळले.

नेतृत्वाचा अनुभव त्यांना मुंबई विद्यापीठ संघाकडून खेळतानाही होता. विचक्षण बुद्धिमत्ता, चिंतनशील स्वभाव आणि विषयाशी एकरूपता हे त्यांचे विशेष आहेत. मैदानावर त्यांचे अस्तित्व क्वचितच जाणवते. संघासाठी परिस्थितीनुरूप खेळत राहणे, त्यांना चांगले मानवते. म्हणूनच ते मुंबईच्याच काय पण भारताच्या नेतृत्वा-लाही लायक उमेदवार ठरले असते. परंतु मध्यंतरी मुंबईकडूनच त्यांची वर्णी न लागल्याने त्यांचे पुढचे सर्व यश हातून निसटले.

तरी पण मुंबईचे नेतृत्व मिळताच एका छोट्या जगात त्यांनी स्पृहणीय कार्य केले. मुंबईच्या संघात अधिक सुसूत्रता आणली. नव्या–जुन्यांना एका विचाराने पुढे नेले. आणि एवढे करूनही स्वतःचा बडेजाव माजविण्याच्या कधी ते भरीस पडले नाहीत. रणजी ट्रॉफीच्या मर्यादित क्रिकेट–क्षेत्रात जागतिक विक्रम करताच त्यांनी प्रथमश्रेणी स्पर्धेतून आपली निवृत्ती जाहीर केली. पराक्रमाच्या आणि कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर असतानाच ते क्षितिजाआड अंतर्धान पावले. मनाचा मोठेपणा, प्रसंगाचे भान, कुठल्या क्षेत्रात कुठे थांबावे, ही वरच्या दर्जाची तारतम्यता मनोहर हर्डीकरांनी मोठ्या चपखलपणे नव्या खेळाडूंपुढे सादर केली. आज काही भारतीय क्रिकेटपटूंनी सक्तीने निवृत्त व्हावे, अशी हाकाटी पिटली जात आहे. कुठे विश्रांती घ्यावी, हे विचाऱ्यांना न समजल्याने त्यांची हास्यास्पद परिस्थिती झाली. म्हणूनच हर्डीकरांच्या निवृत्तीचा निर्णय केवळ कौतुकास्पदच नाही, तो मोठा गौरवा-स्पदही आहे. हॅट्स ऑफ् हर्डीकर, दुसरे काय !

—मनोहर रेगे



# मॉन्टीज डबल

**रुबाबदार बेरेटमधला मॉंटी जेम्सने प्रथमच पाहिला, आणि त्याचे विचारचक्र चालू झाले. कुठे मॉंटी ? कुठे मी ? छे: हे जमणेच अशक्य.**

## ३

**अनुवाद– अनन्त भावे**

ठरल्याप्रमाणे बरोबर सात वाजता जेम्सला नेण्यासाठी जीप आली. सार्जंट ज़ेम्स जीपमधून मॉंटगोमेरीच्या तळावर पोहोचला. तळाच्या ठिकाणी अनेक तंबू ठोकले होते. त्याच्याबरोबरच्या कॅप्टनने त्याला एका तंबूत थांबायला सांगितले आणि तो निघून गेला.

कॅप्टन लगेच परत आला तो कर्नलने जेम्सला बोलावल्याचा हुकूम घेऊनच.

रात्र बरीच झाली होती तरी जेम्स कार्यालयात पोहोचला तेव्हा तो कर्नल आणि त्याचे सहकारी आपापल्या टेबलापाशी बसून कामाचा फडशा पाडीत होते.

कर्नल चांगला तरुण आणि देखणा होता. परंतु सतत मोठ्या जबाबदारीची कामे करणाऱ्या माणसासारखा त्याचा चेहेरा किंचित ओढलेला होता. बोलण्या-पूर्वी जेम्सकडे एक शोधक दृष्टिक्षेप टाकून त्याने बोलायला सुरुवात केली, " उद्या जनरल मॉंटगोमेरीच्या परिवारात वावरण्याची तुझी व्यवस्था मी केली आहे. म्हणजे तुला मॉंटीला जवळून पाहता येईल. गुप्तहेरखात्याचा सार्जंट म्हणून इथं वावरताना तुला कसलीच अडचण पडणार नाही. आणि पडली तर ती निवारायला कर्नल डॉने आहेच."

" ठीक आहे. " जेम्सने तत्परतेने म्हटले.

कर्नल आता आपल्याला जायला सांगणार असे जेम्सला वाटले. इतक्यात त्याने एक प्रश्न फेकला, " तुझं शिक्षण कुठं झालं ? "

खरे म्हणजे जेम्सने कर्नल लेस्टरने पाठविलेल्या सार्जंटला प्रश्न विचारून स्वतः-बद्दलची माहिती तयार केली होती. कॅप्टनला हे माहीत असावे असे जेम्सला वाटत होते. त्यामुळे तो वरच्यासारख्या काही प्रश्नांची अपेक्षा करीत होता. पण प्रश्न प्रत्यक्ष विचारला गेल्यावर मात्र तो गोंधळून गेला. क्षणभर त्याची स्मृती नष्ट झाली. पण क्षणभरच. नंतर स्वतःला सावरून सार्जंटने दिलेल्या माहितीच्या आधारे त्याने उत्तर दिले, " विंचेस्टरला झालं माझं शिक्षण. कर्नल फॅरडेच्या हाताखाली—"

कर्नलने जेम्सकडे एक तीक्ष्ण दृष्टिक्षेप टाकला आणि त्याला जाण्याची अनुज्ञा दिली. जेम्स निघाला तेव्हा तो म्हणाला, " आत्ताचं तुझं काम संपलं आहे. उद्या रात्री तुला न्यायला जीप येईल. गुडलक. "

सलाम ठोकून जेम्स खोलीतून बाहेर पडला. आपल्या मुक्कामावर आल्यावर जेम्सला पुन्हा एकदा स्वतःबद्दल शंका वाटू लागली.नुकत्या झालेल्या कर्नलबरोबरच्या भेटीचा तो विचार करू लागला. या गुप्त हेरखात्याच्या कर्नलचे त्याच्याबद्दलचे मत जेम्सच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते. जेम्सला वाटले, त्याने आपल्याकडे असे तीक्ष्णपणे का पाहिले असावे ? बहुधा मी खरोखरच मॉंटीसारखा दिसतो की नाही हे तो स्वतः निरखून पाहात असावा. मग त्याला काय वाटले असेल ? छे, छे ! त्याचे नक्कीच समाधान झाले नसणार.

जेम्स जो जो जास्त विचार करू लागला तो तो अधिकाधिक खिन्न होत गेला. सरतेशेवटी ती खिन्नता असहनीय झाली आणि तो तडक पुन्हा त्या कर्नलपुढे जाऊन उभा राहिला. म्हणाला, " मी इथं का आलो याची तुम्हांला कल्पना करता येईल. अगदी खरं सांगा. मी जनरल मॉंटगोमेरीसारखा दिसतो, असं वाटतं का तुम्हांला ? अगदी खरं सांगा."

जेम्सचा प्रश्न ऐकून पहिल्यांदाच त्या कर्नलच्या चेहेऱ्यावर स्मितरेखा उमटली.

तो स्नेहाने म्हणाला, " जेम्स, तुला तशी भीती वाटायचं बिलकूल कारण नाही. माँटीमध्ये आणि तुझ्यात विलक्षण साम्य आहे. तू पहिल्यांदा या कार्यालयात आलास ना, तेव्हा लोकांना वाटलं की जनरलसाहेबच त्यांच्या सवयीप्रमाणं अचानक भेट द्यायला आले आहेत. ज्यानं कोणी या मोहिमेवर तुझी निवड केली त्याला आपण काय करतो आहो याची नेमकी कल्पना होती !"

जेम्स परत आला तेव्हा त्याच्या मनावरचे दडपण बरेच कमी झाले होते. त्याची जागा आता एका वेगळ्याच विचाराने घेतली. दिसण्यापलीकडे माँटीच्यात आणि त्याच्यात यत्किंचितही साम्य नव्हते.

## विलक्षण तफावत

बिशपचा मुलगा असलेला माँटी टास्मानियात वाढला, आणि दहा वर्षे पुरी होण्याआधीपासूनच त्याची स्वतंत्र वृत्ती आणि बाणेदार स्वभाव लक्षात येऊ लागला होता. लहानपणी, खेळातसुद्धा कर्णधाराशिवाय इतर भूमिका त्याला रुचत नसे. त्यावरून सहकाऱ्यांशी सदैव त्याच्या भांडण–तंटे–मारामाऱ्या होत. इंग्लंडला आल्यावर सेंट पॉल स्कूलमध्ये माँटगोमेरीने सर्व खेळांत प्रावीण्य प्रकट केले होते. आणि तेथेही तो अल्पावकाशात संघाचा कप्तान झाला होता. आई–वडिलांच्या मताला न जुमानता तो सैन्यात दाखल झाला, आणि एकामागून एक हुद्दे मिळवीत शेवटी जनरल या सर्वोच्च पदाला पोहोचला. माँटी हा जन्मजात नेता होता.

ही माँटीची कारकीर्द कुठे आणि जेम्सची कारकीर्द कुठे ! जेम्सने कधी कोणाचे नेतृत्व केले नव्हते. नटाशिवाय दुसरे कोणी होणे त्याला जमले नसते. वर्चस्व गाजवणे, मार्गदर्शन करणे, योजना आखणे, ही त्याची कामेच नव्हती. हजार वर्षांचे आयुष्य लाभते तरी जेम्स जनरल होऊ शकला नसता ! !

या तुलनेचा विचार डोक्यात असल्यामुळे जेम्सचा रात्रभर डोळा लागला नाही. आणि पहाटे डोळा लागत होता इतक्यात कोणीतरी त्याला खाना आणून दिला. मग त्याची झोपच उडाली. दहा मिनिटांत तयार होऊन जीपमधून तो माँटीच्या तळाकडे निघाला. दहाबारा मैल गेल्यानंतर एक जुने घर दृष्टिपथात आले. घराच्या एका बाजूला काही मोटारी आणि जीप्स एका ओळीत उभ्या होत्या. त्या ओळीच्या अग्रभागी माँटीची रोल्सराईस होती.

जेम्स आणि जेम्सबरोबर आलेला कॅप्टन दोघंही खाली उतरले. कॅप्टनने आत जाऊन वर्दी दिली. काही वेळाने तो बाहेर आला, आणि रात्री पुन्हा भेटू असे जेम्सला सांगून, जीपमधून तो निघून गेला.

जेम्सची अवस्था मोठी चमत्कारिक झाली, काय करावे ते त्याला सुचेना. काही ड्रायव्हर्सची आपल्याबद्दलच कुजबूज चालली आहे, असे जेम्सच्या लक्षात आले. बरे वेंधळ्यासारखे तेथेच किती वेळ उभे राहणार ?

इतक्यात एक कर्नलसाहेब त्याच्या दिशेने येताना त्याने पाहिले. दक्ष होऊन

त्याने सलाम ठोकला. कर्नलसाहेब म्हणाले, "मी कर्नल डॉने, तुला कसली अडचण पडली तर मला कळव. जनरल माँटगोमेरीच्या जास्तीत जास्त जवळ राहण्याचा प्रयत्न कर. पण तरीही तुझ्याकडे कोणाचं लक्ष फारसं वेधलं जाणार नाही याची काळजी घे. त्या मोटारीत बैस आता तू." त्यांनी एका मोटरीकडे बोट दाखविले, "आणि ड्रायव्हरशेजारीच बैस. समजलं."

"होय" म्हणून जेम्स त्या मोटारीत बसण्यासाठी निघाला. इतक्यात मागून कोणीतरी त्रासिक स्वरात त्याला विचारले, "महाशय, आपण छायाचित्रकार आहात काय?"

जेम्स मागे वळला. एक कॅप्टन क्रुद्ध नजरेने त्याच्याकडे रोखून पाहात होता. काय उत्तर द्यावे ते लगेच न सुचल्यामुळे जेम्स तसाच अवाक उभा होता. ते पाहून तो कॅप्टन कडाडला, "महाशय, आपण बहिरेबिहिरे आहात की काय? तुम्हांलाच विचारतोय मी – तुम्ही छायाचित्रकार आहात काय?"

आता काय उत्तर देणार? रात्रभरच्या जाग्रणामुळे आणि खाणे अपुरे झाल्यामुळे असेल कदाचित, जेम्सने चिडचिडल्या स्वरात उत्तर दिले, "नाही. मी छायाचित्रकार नाही." आणि तो मोटारीकडे वळला.

कॅप्टन त्याच्या आकाराशी विसंगत अशा चपळाईनें जेम्सला सामोरा आला आणि म्हणाला, "अधिकाऱ्याशी बोलताना जरा अदबीनं बोला म्हटलं. जा, बसा त्या मोटारीत."

जेम्सने कॅप्टनला अदबीने सलाम ठोकला आणि मोटारमध्ये ड्रायव्हरच्या शेजारच्या सीटवर बैठक मारली. ड्रायव्हरने त्याच्याकडे पाहून स्मित केले.

## माँटीचे प्रथम दर्शन

अग्रभागी उभी असलेली रोलसराईस आता बंगल्याच्या प्रवेशद्वाराशी जाऊन उभी राहिली. जेम्सच्या ड्रायव्हरने आपली गाडी रोलसराईसच्या मागे बरोबर पाच फुटावर उभी केली. जेम्सने वळून मागे पाहिले. प्रत्येक गाडी आता समोरच्या गाडीमागे बरोबर पाच फुटांचे अंतर राखून उभी होती. नंतर जेम्सला समजले की ही पद्धती माँटीच्या खास हुकमावरून अवलंबिलेली होती. गाड्या उभ्या असोत वा चालत्या असोत, पाच फुटांचे अंतर त्यांनी राखलेच पाहिजे, असा दंडक होता. जेम्सच्या ड्रायव्हरने इंजिन बंद केले, आणि तो गाडीच्या बाजूला उभा राहिला. जेम्सने पाहिले, सगळे ड्रायव्हर्स आता आपापल्या गाड्यांच्या बाजूला खडे होते. अर्थात हा एक कवायतीचा भाग असणार, हे जेम्सच्या लक्षात आले, आणि तोदेखील आपल्या ड्रायव्हरच्या बाजूला जाऊन उभा राहिला.

पाच मिनिटे गेली. वातावरणात एक प्रकारचे दडपण निर्माण झाले होते. नंतर अचानक कर्नल डॉने बाहेर आला. माँटीच्या ड्रायव्हरने त्याला सलाम ठोकला. कर्नलने गाड्यांच्या बाजूने एक फेरी मारली आणि तो पुन्हा आत गेला. त्यानंतर

त्याचा ड्रायव्हर काही आकडे मोजतो आहे, असे जेम्सच्या लक्षात आले. सहावा आकडा मोजून झाला, आणि कर्नल डॉने एका ब्रिगेडियरबरोबर बाहेर आला. त्यांनी पुन्हा गाड्यांच्या बाजूने फेरी मारली. मग ब्रिगेडियर आत गेला. या वेळी ड्रायव्हरने बारा आकडे मोजले; आणि बाराव्या आकड्याला ब्रिगेडियरसह माँटी बाहेर आला. सर्वांवर एक ओझरता दृष्टिक्षेप टाकून तो हसला.

जेम्सला नंतर कळले की माँटीच्या तळावरचा हा दैनंदिन कार्यक्रम होता. त्यात एकही दिवस खंड पडत नसे की एक सेकंद इकडचा तिकडे होत नसे.

जेम्सला या कार्यक्रमाचे प्रथमदर्शन होत होते. बहिरी ससाण्याच्या नजरेने तो माँटीला न्याहाळीत होता. त्याच्या एकदम लक्षात आले की माँटीची सलाम करण्याची पद्धती खास स्वतंत्र आहे. सैनिकी सलामातील यांत्रिकता आणि भावनाशून्यता त्यात अगदी नव्हती. माँटीचा सलाम म्हणजे आपुलकीचे प्रत्याभिवादन होते.

गेले काही दिवस जेम्सने माँटीबद्दल इतका विचार केला होता, इतके वाचले होते, इतके ऐकले होते की आता माँटी प्रत्यक्ष पुढे उभा राहिल्यानंतर तो थरारून गेला. अंगात कातड्याचे जर्किन घातलेला आणि डोक्यावर त्याची ती सुप्रसिद्ध काळी बेरेट चढवलेला माँटी जेम्सने कल्पनेने रेखाटलेल्या त्याच्या चित्रासारखाच हुबेहूब होता. वरवर पाहता त्याला कसली काळजी आहे किंवा त्याच्यावर कसली जबाबदारी आहे असे वाटतच नव्हते. मग एकदम जेम्सला जणू साक्षात्कार झाला. या माँटीचीच भूमिका त्याला करायची होती. पुन्हा त्याला भीती वाटू लागली. माँटीच्या कणखर आणि आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा आभास आपण कसा निर्माण करणार ?

कर्नल डॉने व ब्रिगेडियरबरोबरचे बोलणे संपवून माँटगोमेरी आपल्या गाडीत जाऊन बसला. गाडी सुरू झाली. तिच्या मागे पाच फुटांवरून जेम्सची गाडी चालली होती, आणि त्याची नजर माँटगोमेरीवर खिळली होती.

रस्त्यावरून गाड्या जात असता लोकांचे लक्ष जायचे, माँटीची परिचित काळी बेरेट दृष्टीला पडताच ते खुषीने हसायचे आणि हात हलवायचे. माँटगोमेरीसुद्धा त्यांना हसून प्रत्यभिवादन करीत होता.

एका गावाबाहेरच्या शेताच्या कुंपणाजवळ एक म्हातारा शेतकरी उभा होता. दुरून येणाऱ्या मोटारींच्या काफिल्यावर त्याची नजर खिळली होती. आपली गाडी त्या शेतकऱ्याच्या नजरेच्या टप्प्यात येताच माँटीनेच हसून स्वत: प्रथम त्याला सलाम ठोकला. शेतकरी आश्चर्याने नुसता पाहात राहिला आणि मग एकदम त्याने माँटीला ओळखले. त्या वेळी त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव अविस्मरणीय होते. क्षणार्धात त्याचा थकलाभागलेला चेहेरा उत्साहाने उजळून निघाला. युद्धाच्या भीषणतेची, आपल्या देशाच्या तत्कालिक पराभवाच्या वार्तेने निर्माण झालेली

भयाची, भविष्याबद्दलच्या काळजीची त्याच्या चेहेऱ्यावर रेखलेली संमिश्र भावना पुसली गेली, माँटी सेनापती असताना आपला पराभव होणे कसे शक्य आहे, असेच त्याला वाटले असावे. आपली जुनीपुराणी, चेपलेली हॅट उचलून ती हातात घेऊन त्याने हात हलवला आणि आपोआप त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ◘

काही वेळानंतर समुद्र दिसू लागला. समुद्रावरचा एकंदर देखावा मोठा विलक्षण होता. आपण डी-दिनाच्या रंगीत तालमीला जात आहो, हे जेम्सला माहीत होते; पण त्या तालमीच्या तसल्या अद्‌भुत हल्ल्याची कल्पना त्याने केली नव्हती.

समुद्रात जवळच वेगवेगळ्या प्रकारची असंख्य जहाजे होती. काही जहाजांतून किनाऱ्यावर रणगाडे व चिलखती गाड्या उतरविण्यात येत होत्या. आकाशात अगणित विमानांची दाटी झाली होती. जहाजातून किनाऱ्यावर उतरणारे लक्षावधी सैनिक शिस्तीने पुढे सरकत होते.

जवळच्याच एका हॉटेलच्या गॅलरीत दोस्तांचे सारे प्रमुख सेनाधिकारी गोळा होऊन ही तालीम पाहात होते. माँटगोमेरी मोटारीतून उतरून तिकडेच जायला निघाला. त्याच्या मागोमाग जावे, असे क्षणभर जेम्सला वाटले; पण मग पुन्हा त्याने माँटी खाली येईपर्यंत वाट पाहण्याचे ठरविले.

पंधरा मिनिटांतच माँटी त्याच्या परिवारासह खाली आला. कोणाच्या लक्षात येणार नाही अशा सावधगिरीने जेम्सदेखील माँटीच्या परिवारात सामील झाला. जेम्ससारख्या सामान्य कारकुनाला, योगायोगाने जगाच्या इतिहासातील सर्वांत प्रचंड युद्ध–मोहिमेची रंगीत तालीम अशा मोक्याच्या ठिकाणाहून पाहण्याचे भाग्य लाभले होते.

जेम्स त्या अद्‌भुत दृश्याने भारावून गेला. या प्रचंड मोहिमेचा एक सूत्रधार असा जनरल माँटगोमेरी कुठे आणि त्याची भूमिका करण्याची जबाबदारी अंगावर पड-लेला आपल्यासारखा नट कुठे? नाटकाच्या पहिल्या रात्री होते तशी धडधड त्याच्या छातीत होऊ लागली. सिंहांच्या मेळाव्यात एखाद्या कोल्ह्याने लुडबुड करावी तशी आपली स्थिती आहे असे जेम्सला वाटले. कर्नल लेस्टर भेटला नसता तर किती सुखाने, निश्चिंतपणे आपण पगारखात्यात कारकुनी करीत बसलो असतो, असा विचार त्याच्या मनात आल्यावाचून राहिला नाही.

पण त्याचबरोबर नकळत त्याचे मन प्रत्यक्ष डी–दिनाचे चित्र रेखाटू लागले. त्या मोहिमेत हजारो सैनिक मरणे वा जखमी होणे अटळ होते. आणि एकदम त्याच्या मनात विचार चमकून गेला. आपण आपली भूमिका चोखपणे पार पाडली तर त्यांतल्या कितीतरी मरू घातलेल्या दुर्दैवी सैनिकांचे प्राण वाचतील. आफ्रिकन युद्धाचा यशस्वी सेनापती होणे आपल्याला कधीच शक्य होणार नाही; पण आपले त्याच्याशी असलेले आश्चर्यकारक साम्य आणि अभिनयकौशल्य पणाला लावून

स्वदेशहितासाठी त्याची भूमिका तर आपल्याला यशस्वीपणे करता येईल !

मॉंटी हळहळू फिरत होता. फिरता फिरताच तो सहकाऱ्यांना हुकूम करीत होता, प्रश्न विचारीत होता, सल्ला-सूचना देत होता. जेम्स सावलीसारखा त्याच्या मागे होता. मॉंटीला न्याहाळताना त्याला इतर साऱ्या गोष्टींचा विसर पडला. मॉंटीच्या व्यक्तिमत्त्वाच्या निकटदर्शनाने तो भारावून गेला.

नाटयव्यवसायात पडता तर मॉंटी कोडोपती होता, असे जेम्सला वाटले; कारण हे विशाल युद्ध-नाटय सादर करताना त्याने आपली नटमंडळी मोठ्या चिकित्सेने निवडली होती. अत्यंत चतुर दिग्दर्शक, व्यवस्थापक, तंत्रज्ञ, नेपथ्यकार यांची योजना त्याने केली होती; आणि त्यांपैकी प्रत्येकाला आपली भूमिका त्यातील बारकाव्यांसहित कळलेली आहे याची त्याने खात्री करून घेतली होती.

आता डी-दिनाच्या रंगीत तालमीने उत्कर्षबिंदू गाठला होता. आकाशात अधिकच विमाने जमा झाली होती, आणि वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्यात तसे हजारो सैनिक जहाजांतून किनाऱ्यावर उतरत होते. त्यातील कित्येक समुद्रसफरीने आजारलेले होते. परंतु त्यांची पाहणी करणाऱ्या मॉंटीचा कोणत्याही प्रकारच्या आजाराबद्दलचा, शैथिल्याबद्दलचा अत्यंतिक तिटकारा त्यांना माहीत असल्यामुळे तो आजार लपविण्याची शिकस्त त्यांनी चालविली होती.

मॉंटीला निरखीत असतानाच जेम्स मोवतालचा देखावा पाहात होता. आणि अचानक एक असा प्रसंग घडला, की त्यातून मॉंटीच्या व्यक्तिमत्त्वावर चांगला प्रकाश पडावा.

जेम्स उभा होता तेथून जवळच किनाऱ्यावर एक पलटण उतरत होती. पलटणीतला एक जवान अत्यंत श्रांत आणि ओढलेला दिसत होता. तरीदेखील तो आपण मागे पडणार नाही याची कोशिश करीत होता, रायफल आणि पाठीवरची अवजड सामान-पिशवी यांचे त्याला ओझे होत असावे. वजनदार बुटांमुळे वाळूतून पाय ओढीत तो चालला होता. जेम्स आणि मॉंटीसह त्याचा परिवार जेथे उभा होता तेथपर्यंत पोहोचला असेल नसेल इतक्यात तो पाय अडखळून वाळूत पालथा पडला. धडपडत तो तसाच उठला आणि भलत्याच दिशेने चालू लागला.

मॉंटीने सारा प्रकार पाहिला होता. तो पटकन पुढे सरसावला. त्या जवानाजवळ जाऊन म्हणाला, "बेटा, या वाटेनं जा. चांगली दिसते तुझी तयारी मला. पण आपल्या पलटणीतून चुकू नकोस." मॉंटीने त्या जवानाच्या खांद्यावर हात ठेवला आणि त्याची वेडीवाकडी झालेली, घसरलेली सामान-पिशवी सारखी केली.

ही सगळी मदत करणारा कोण आहे, हे जेव्हा त्या जवानाच्या लक्षात आले तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर रेखली गेलेली मूक आदरभावना पाहण्यासारखी होती. रंगभूमीवरील बंदिस्त नाटचापेक्षा प्रत्यक्ष जीवनातले नाटय किती वेगळे असते, याचा प्रत्यय जेम्सला या प्रसंगामुळे आला. जेम्सच्या मनात त्याने पूर्वी पाहिलेल्या

जनरलची आणि मॉंटीची तुलनादेखील यऊन गेली. १९१४ साली जेम्स सैन्यात असताना, कवायत पाहणीसाठी कधीतरी एक जनरलसाहेब आले होते. घोड्यावर बसलेले, सोनेरी कुसरीचा झळकणारा पोशाख घातलेले ते उग्रमुख जनरलसाहेब कुठे आणि जवानासारखाच पोशाख केलेला, सामान्य जवानाची घसरलेली सामान-पिशवी स्वतः तत्परतेने सारखी करणारा हा सदा हसरा जनरल मॉंटी कुठे ! १९१४ ते १९४० सैन्य उभारणीत मोठाच फरक पडला म्हणायचा.

साडेबारा वाजता मॉंटी पाहणी संपवून आपल्या मोटारीकडे निघाला. सारे सुरळीत पार पडल्यामुळे सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. जेम्स आतापावेतो उपाशीच होता. पण मॉंटीच्या एतद्विषयक सहनशीलतेच्या इतक्या कथा त्याने ऐकल्या होत्या की जेवण मिळालेच नसते तरी त्याला फारसे आश्चर्य वाटले नसते. कुठून तरी कर्नल डॉने आला आणि मोटारींच्या रांगेजवळ असलेल्या एका जीपकडे बोट दाखवून जेम्सला म्हणाला, "तू त्या जीपमध्ये बैस."

जेम्स आज्ञेप्रमाणे जीपमध्ये जाऊन बसला. का कुणास ठाऊक, जीपड्रायव्हर त्याच्याकडे संशयाने पाहात होता. त्याचे कारण उघड होते. हा आणि इतर ड्रायव्हर्स मॉंटीच्या हाताखाली बरीच वर्षे असल्यामुळे त्याच्या साऱ्या परिवाराला ते ओळखत होते. त्यामुळे हा गुप्तहेरखात्याचा उपटसुंभ सार्जंट कशाला यावा इथे, याबद्दल त्यांना कुतूहल आणि संशय वाटणे साहजिकच होते. जेम्सने ते ओळखले आणि त्याला काहीतरी सांगून वेळ निभावून नेली. पण त्याच्या लक्षात आले की जर यांच्याच बरोबर काही दिवस राहणे भाग असेल तर त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे. त्यांच्याशी मैत्री जोडली पाहिजे.

मॉंटीच्या मोटारींची मिरवणूक वाटेत सैन्याच्या तुकड्यांच्या कार्यालयांशी थांबत होती. मॉंटी तेथील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत होता. त्यातले कित्येक अधिकारी अगदी तरुण होते. युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना फार थोडा होता, आणि ते एका ऐतिहासिक मोहिमेत भाग घेत होते. त्यामुळे थोडे बावरले होते ते. पण मॉंटीच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्यावर एखादी जादूची कांडी फिरवावी तसा परिणाम होत होता. त्यांची हुरहूर, साशंकता मॉंटीच्या भेटीत सकाळच्या धुक्यासारखी वितळून जात होती.

## अनुभवी मित्र

जेम्सला वाटले हा प्रकार अगदी एखाद्या नाटकासारखा आहे. अनेक दिवसांच्या चांगल्या तालमीनंतरदेखील नटवर्ग एकदम हताश होतो. आपले नाटक पडणार, प्रेक्षक आणि टीकाकार त्याची हुर्यो करणार, अशी त्याची खात्री पटते. आणि मग कधीतरी कोणी दिग्दर्शक वा निर्माता येतो. उत्साहवर्धक, आश्वासक अशा बहुमोल सूचना करतो. आणि निराशेचे वातावरण नाहीसे होऊन नटवर्ग पुन्हा उत्तेजित आणि निश्चित होतो.

माँटीच्या व्यक्तिमत्त्वाचा त्या अधिकाऱ्यांवर अगदी असाच परिणाम होत होता. जेम्सने इतिहासात काही विख्यात सेनापतींच्या कथा वाचल्या होत्या. लढाईपूर्वी सैनिकांपुढे एखादे चित्तथरारक भाषण करून ते त्यांना चेतना देत असत. माँटीच्या बाबतीत ते प्रत्यक्ष घडताना जेम्स पाहात होता. पण सैनिकांपुढे आवेशपूर्ण, सनसनाटी भाषण करण्याऐवजी माँटी त्यांच्याशी एखाद्या अनुभवी मित्रासारखा मनमोकळेपणी बोलत होता; आणि त्याचा परिणाम कितीतरी पट अधिक होत होता.

अर्थात सहकाऱ्यांमध्ये, अनुयायांमध्ये स्फूर्ती उत्पन्न करून विजयाचा मार्ग दाखविणाऱ्या माँटीला कठोर बनणे भागच होते.त्याच्या अखत्यारीत शैथिल्य आणि कामचुकारपणा यांना वाव नव्हता. जेम्सने पाहिले, माँटीला एक सवय होती. एकदम आपली भेदक नजर तो एखाद्यावर रोखायचा आणि जणू त्याला त्या व्यक्तीच्या अंतरंगाचे दर्शन व्हायचे. या नजरेच्या धाकामुळे माँटीचे सैन्य नेहमी 'हुश्शार' असायचे. शिवाय माँटी स्वतः नेहमीच इतका 'हुश्शार' असायचा की हाताखालच्या माणसांची हलगर्जी त्याच्या ताबडतोब लक्षात येत असे.

गेले कित्येक तास माँटीचे अत्यंत बारकाईने निरीक्षण चालविल्यामुळे, भुकेमुळे, आणि थकव्यामुळे जेम्स कंटाळला. त्याची चुळबूळ चालली होती. इतक्यात त्याच्या लक्षात आले की माँटी आपले बोलणे मध्येच थांबवून त्याच्याचकडे रोखून पाहतो आहे. तो एक आगळा, भिवविणारा अनुभव होता. जेम्सला वाटले, एखाद्या लहान मुलाप्रमाणे आपल्याला खोडी करताना पकडले आहे. काळ जणू एकदम थांबला होता. जेम्सचे पाय जमिनीला खिळले होते. मग थोड्या वेळाने माँटीने नजर फिरवली आणि तो पुन्हा बोलण्यात गढून गेला.

दीड वाजण्याच्या सुमारास ते एका शेताजवळ आले. शेतात असलेल्या झाडांच्या आसऱ्याने काही झोपड्या उभारल्या होत्या. विभागीय कार्यालय येथेच होते. माँटी आणि इतर अधिकारी त्यांच्या जेवणघरात गेले. उजव्या हाताला एक फिरते खानगृह होते. त्याच्यासमोर ड्रायव्हर्स वगैरे मंडळींनी रांग लावली होती. जेम्ससुद्धा त्या रांगेत जाऊन उभा राहिला. त्याने खाद्यपदार्थ घेतले. जवळच ड्रायव्हर्स खाण्यासाठी कोंडाळे करून बसले होते. जेम्स तिकडेच निघाला. त्यांच्याजवळ पोहोचल्यावर अचानक संभाषण थांबवून ते जेम्सकडे संशयी नजरेने पाहू लागले. जेम्स गोंधळून गेला. पण त्याने तेथेच बैठक मारली आणि थोड्याच वेळात त्यांच्या कलाने बोलून जेम्सने त्यांच्या मनातला किंतू घालविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आता त्यांच्याशी जेम्सची दोस्ती जमली.

जेवणानंतर पुन्हा पाच वाजेपर्यंत पाहणी झाली. मग सगळे माँटीच्या तळावर परतले. माँटी आता गेला आणि त्या दिवसावर पडदा पडला. जेम्स पार थकून गेला होता. जीपमधून तो आपल्या तंबूत परत आला, आणि थोडा वेळ विश्रांती घेऊन त्याने लंडनला जाणारी गाडी पकडली.

जवळजवळ नऊ-दहा तास, अगदी जवळून, जेम्सने माँटीचे अवलोकन केले होते. माँटीचा आवाज, हावभाव, लकबी यांची नक्कल करता येईल असा विश्वास त्याला वाटू लागला होता. यांच्यापलीकडे असलेले माँटीचे प्रभावी व्यक्तिमत्त्व ही अर्थात वेगळी गोष्ट होती. ते इतके एकमेवद्वितीयम् होते की त्याची 'नक्कल' करणे शक्य नव्हते. माणसाच्या बाह्यरूपाचे अनुकरण वेगळे आणि त्याचे अंतरंग आत्मसात करणे वेगळे. लोकांवर माँटीच्या बोलण्याचा परिणाम हा त्याच्या आंतरिक व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव होता. उद्या त्यांच्याशी जेम्स बोलला असता तर तसा परिणाम होणार होता काय ? जेम्सला वाटले, आपण शिंप्याच्या दुकानात असणाऱ्या निर्जीव प्रतिमेसारखे आहो, आणि आपल्यावर माँटीसारख्या जगद्विख्यात सेनापतीचा पोशाख चढविण्यात आला आहे.

दोघांच्या आयुष्यक्रमात इतकी तफावत होती की त्यामुळे सिद्ध झालेल्या दोन विभिन्न व्यक्तिमत्त्वांमधले अंतर नाहीसे करणे कठीण होते. अल्डेनहॅम येथे जेम्स शाळकरी मुलगा असताना माँटी वॉरविक्समध्ये लेफ्टनंटच्या हुद्द्यावर होता, इतकेच नव्हे तर त्याने हिंदुस्थानची वारी केली होती. लहानपणचे सोडा, जेम्सने तोपर्यंत इंग्लंडचा किनारा सोडला नव्हता. पहिल्या महायुद्धानंतर पाच वर्षांनी मेजर झालेला माँटगोमेरी तरुण अधिकाऱ्यांना युद्धशास्त्राचे पाठ देत होता; आणि जेम्स आपल्या नाटककंपनीच्या फ्रान्स-दौऱ्यावर होता. हे असे दुसऱ्या महायुद्धापर्यंत चालले. आता माँटगोमेरी मेजर-जनरल होऊन कीर्ती संपादन करीत होता, तर जेम्स पगारखात्यातला कारकून होऊन हिशेबाचा ताळेबंद जमवीत होता.

छे, माँटीचे व्यक्तिमत्त्व संपादन करणे त्याला अशक्य होते. आपण हे काम करायला लायक नसल्यामुळे ते दुसऱ्या अधिक लायक माणसावर सोपवावे असे कर्नल लेस्टरला सांगण्याचा त्याने निश्चय केला.

दुसऱ्या दिवशी युद्धखात्याकडे जाताना, कर्नल लेस्टरला काय काय कसे कसे सांगायचे याची जेम्स पुनः पुन्हा उजळणी करीत होता. सर्वसाधारणपणे माणसे आपल्या उणिवा झाकून प्रयत्नपूर्वक मोठेपणाचा आभास निर्माण करीत असतात; पण आज जेम्सला स्वतःच्या उणिवांवरच भर द्यावयाचा होता, प्रयत्नपूर्वक आपला खुजेपणा लेस्टरच्या ध्यानात आणून द्यावयाचा होता.

जेम्स नेहमीच्या खोलीत गेला. कर्नल लेस्टर त्याच्याकडे वेगळ्याच नजरेने पाहात होता.

दीर्घ श्वास घेऊन जेम्सने पाठ केलेल्या ओळी म्हणायला सुरुवात केली, " गुड-मॉर्निंग सर, माफ करा. पण मला हे काम... "

" खाली बैस " लेस्टरने त्याला मध्येच अडविले, " सिगारेट तर ओढ आधी. मग बोलू. "

जेम्सला काय करावे सुचेना, तो सिगारेट पेटवत असताना कर्नल लेस्टर म्हणाला,

" तू मला काही सांगण्याआधी मलाच तुला काही सांगायचं आहे. जनरल मॉंटगोमेरी खूष झाला आहे, ज्या पद्धतीनं तू काल आपलं काम केलस ती पद्धत जनरलला अत्यंत पसंत आहे."

जेम्सला आश्चर्याचा धक्का बसला, तरी त्याने आपले घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न केला, " नाही, पण तुम्ही असं पाहा की..."

" तू काय सांगणार ते मला सारं माहीत आहे. 'कालचा दिवस एखाद्या वाईट स्वप्नासारखा होता. ते काम करायला मी सर्वस्वी नालायक आहे. मॉंटी कुठं आणि मी कुठं ?' हेच सांगणार की नाही तू ? तसं असेल तर तुझा गैरसमज झाला आहे, असंच मी म्हणेन."

हे बोलताना प्रथमच कर्नल लेस्टर भावनावश झाला आहे, असे जेम्सला आढळले. लेस्टर उठून उभा राहिला, आणि त्याने आपले डोळे जेम्सवर रोखले. जेम्सला वाटले, सगळी हुकमतदार मंडळी विशिष्ट परिस्थितीत, आपल्या डोळयांनी मोहिनी घालतात, हुकमत बजावतात. नजर तशीच रोखून लेस्टर पुढे म्हणाला,

" तू आणि फक्त तूच हे काम यशस्वीपणे करशील हे तुझ्या मठ्ठ डोक्यात अजून कसं शिरत नाही ? मला तशी खात्री असल्याशिवाय का मी तुझी निवड केली ? हजारो सैनिक बांधवांचे प्राण वाचवण्याचं सामर्थ्य अंगी असताना केवळ आपल्या वेडगळ लहरीखातर तू हे काम झुगारून देणार काय ? " लेस्टरच्या चेहऱ्यावर वेगळेच भाव जमा झाले होते. वेगळ्या स्वरात तो म्हणाला, " मघाशी तुला मी जे सांगितलं त्याचा तुझ्या डोक्यात प्रकाश पडलेला दिसत नाही. कालची तुझी कामगिरी जनरल मॉंटगोमेरीला – पुन्हा सांगतो – खुद्द जनरल मॉंटगोमेरीला पसंत पडली आहे."

" असेल कदाचित. पण–"

" पण काय ? "

" पण प्रत्यक्ष तोतया बनण्याचा प्रसंग येईल तेव्हा ? – तेव्हा काय होईल ? "

" काही होणार नाही. तू निश्चित यशस्वी होशील. उगाच वेडयावाकडया कल्पना करू नकोस. पोर्टस् माऊथला जातानासुद्धा तू नसत्या शंकाकुशंका काढीत होतास. पण प्रत्यक्षात मात्र काहीच झालं नाही. खरी वेळ येईल तेव्हाही तसंच होईल, गोष्टी जशा घडतील तशा घडू देत. आणि काळजी करायचं तू माझ्यावर सोपवलंस तर बरं होईल." ☐

कर्नल लेस्टरबरोबरच्या या शेवटच्या मुलाखतीचा जेम्स विचार करू लागला तेव्हा एका अत्यंत चतुर माणसाशी आपली गाठ पडली आहे, हे त्याला पटले. कारण संबंधित मनुष्याचे इंगित आणि संभाव्य प्रतिक्रिया जाणणे आणि त्याप्रमाणे आपले पवित्रे आखणे, हे चातुर्याचे प्रधान लक्षण समजले जाते. डॉक्टर असो, पुढारी

असो, वकील असो, सेनानायक असो वा व्यवस्थापक असो, जनमानस जाणण्याची देणगी नसेल तर तो फारसा यशस्वी होऊ शकणार नाही.

कर्नल लेस्टरजवळ ही देणगी निश्चितच होती. आदल्या दिवशी जेम्सला काय वाटले असेल आणि त्यामुळे आपली भेट झाल्यानंतर तो काय बोलेल, याची नेमकी अटकळ कर्नल लेस्टरने बांधली होती. आणि पुन्हा हा प्रश्न कसा सोडवावा, हताश झालेल्या जेम्सला धीर कसा द्यावा, हेही त्याला पक्के माहीत होते. अनेक दिवसांच्या महत्प्रयासानंतर सापडलेला माँटीचा तोतया गमावणे, त्याला परवडण्यासारखे नव्हते

परिणामत: थोड्याच वेळानंतर जेम्स कर्नल लेस्टरला म्हणाला होता, "कालची डी–दिनाची रंगीत तालीम मोठी अद्‌भुत होती. आपण ती पाहायला असायला हवे होता."

"मला माहीत आहे. मी होतो तिथं." कर्नल लेस्टर सहजपणे म्हणाला.

जेम्स चमकून त्याच्याकडे पाहात राहिला. लेस्टर पुढे म्हणाला, "मी सारा वेळ तिथंच होतो. एकदा तर मी अगदी तुझ्याजवळ उभा होतो; पण तुझं लक्ष माझ्याकडं गेलंच नाही."

"बापरे...म्हणजे तुम्ही ड्रायव्हरबियव्हरच्या वेषात होता की काय?"

कर्नल लेस्टरने जेम्सच्या प्रश्नाला उत्तर न देता त्यालाच उलट विचारले "मग कसा काय वाटला एकंदर मामला तुला? काही भानगड वगैरे झाली नाही ना?"

जेम्सने ड्रायव्हरच्या संशयीपणाबद्दल सांगितले. तेव्हा मान हलवून नकार दर्शवीत लेस्टर म्हणाला, "त्यांची काही काळजी करू नकोस. त्यांनी सावध राहणं स्वाभाविकच आहे. याच्याशिवाय काही भानगड नाही ना उपटली?"

"याच्याशिवाय...म्हणजे?...हो. एका कॅप्टनशी बोलताना थोडा उद्धटपणा झाला माझ्याकडून. भलताच रागावला तो."

"छान झालं. पण त्यानं तुझा रिपोर्ट केला असता तर खरी गंमत आली असती." कर्नल लेस्टर मिश्किलपणे म्हणाला.

"हे एवढं सोडता बाकी काही झालं नाही. नाही म्हणायला एकदा कंटाळून मी वेंधळ्यासारखा इकडेतिकडे बघत असताना अचानक खुद्द जनरल माँटगोमेरीच माझ्याकडे टक लावून बघू लागला. असा टरकलोय म्हणता मी."

"माँटी अंतर्ज्ञानी असावा."–लेस्टरला काय सूचित करायचे होते ते जेम्सला नेमके कळले आणि पटलेदेखील.

"आणखी थोडे दिवस मिळाले तर मला वाटतं, माँटीचे हावभाव आणि लकबी यांचं अनुकरण मी हुबेहूब करू शकेन. तो थंड आणि धीम्या प्रकृतीचा असता तर काम कठीण झालं असतं; पण तो इतका उत्साही आहे आणि त्याच्या लकबी इतक्या विचित्र आहेत की, मला त्याची नक्कल करणं जड जाणार नाही. पण दुर

असल्यानं मला त्याचं बोलणं मात्र दुर्दैवानं व्यवस्थित कळू शकलं नाही. आणि त्याच्या आवाजासारखा आवाज काढायचा म्हणजे त्याला अगदी जवळून पाहायला पाहिजे."

"बरोबर आहे तू म्हणतोस ते. तशी व्यवस्था करायला पाहिजे आपल्याला. तू असं कर ना जेम्स, मंगळवारी दुपारी साडेचार वाजता इकडे ये. आठवडाभर बाहेर जायच्या तयारीनं ये. बाकी सारं तू येशील तेव्हा कळेलच तुला. अच्छा."

## स्कॉटलंडला प्रयाण

"जेम्सने एक–दोन दिवस आरामात घालवले. एके दिवशी सिनेमा पाहून तो भुयारी गाडीने लंडन स्टेशनवर परतला. प्रवेशद्वाराशी तिकीट दाखवण्यासाठी त्याने पाकीट काढले आणि वर पाहतो तो समोर मेजर व्हाइट, हा पगारखात्यातला त्याचा एक वरिष्ठ अधिकारी उभा होता. त्याला पाहताच जेम्सने पाकीट वरच्या खिशात खुपसले आणि तोंड फिरवून तो धूम पळत सुटला. थोड्या वेळाने त्याने मागे वळून पाहिले तो दुसराच एक माणस दुरून हातवारे करून त्याला बोलावीत होता. जेम्स त्याच्याजवळ गेला, तेव्हा त्याने जेम्सचे पाकीट काढून त्याच्या हातात ठेवले. मेजर व्हाइटला गुंगारा देण्याच्या गडबडीत पाकीट ठीक खिशात पडण्याऐवजी ओव्हरकोट आणि कोटाच्या पोकळीमधून खाली पडले होते!

ठरल्याप्रमाणे मंगळवारी जेम्स लेस्टरला भेटायला आला तेव्हा त्याच्या कार्यालयात जॅक हेरवेदेखील होता. नंतर त्याला समजले की हेरवेबरोबरच तो स्कॉटलंडमध्ये जाणार आहे. तेथेच माँटगोमेरी आणि त्याचे सहकारी एका आठवड्याच्या विश्रांतिसाठी गेले होते. या विश्रांतीकालात माँटीला जवळून पाहायला मिळण्याची अधिक शक्यता होती.

सगळी योजना समजावून सांगितल्यावर कर्नल लेस्टर म्हणाला, "जेम्स, आपल्या जवळ वेळ थोडा आहे. एका आठवड्यात तुला तुझं काम उरकता येईल काय?"

हा प्रश्न नव्हता तर प्रश्नाचे रूप घेतलेली आज्ञा होती. परंतु या वेळी जेम्सने आत्मविश्वासाने होकार दिला. थोड्याच वेळात जेम्सने लंडन सोडले. गाडी स्कॉटलंडकडे धावू लागली, पण जेम्सच्या डोक्यात त्याहीपेक्षा वेगाने नव्या योजनेची चक्रे धावू लागली.

(अपूर्ण)

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## ६ ते १२ एप्रिल राशि-भविष्य

**मेष :** तुमच्या राशीतच हे सारे ग्रह तुम्हांला आव्हान देत आहेत. पण गुरु-शुक्राची सहानुभूती तुमच्या बाजूस असल्यामुळे त्यांचे आव्हान स्वीकारायला मुळीच डरू नका.

सध्याची परिस्थिती फारशी चांगली आहे असं माझं मुळीच म्हणणं नाही, पण निराशाजनक खासच नाही. निर्धार-निष्ठेचे व्रत आचरणाऱ्यांच्या समोवार यशाचे अभेद्य कवच असल्यामुळे कोणत्याही ग्रहाने धडक द्यायचा प्रयत्न केला तर त्याच्याच ठिकऱ्या उडतील. शिवाय मेष राशी व्यक्तींच्या स्वभावातच असे वैशिष्ट्य आहे की, अशा आणीबाणीच्या वेळीच त्यांचा निर्धार पेटून उठतो, प्रयत्नवाद उफाळून येतो.

शैक्षणिक यश मिळेल, सामाजिक प्रतिष्ठेला यत्किंचितही धक्का लागू शकणार नाही.

दि. ९,१०,११ एप्रिल अपेक्षेबाहेर यश लाभणारा काल.

**वृषभ :** रवि-शनीसह पंचग्रही योग लाभस्थानी आलेले असताना – व्ययस्थ मंगळाची डर कशाला ? अशा बारीकसारीक ग्रहांची दखल घेत बसलात तर महत्त्वाची कार्ये हातून घडतील कशी ? सर्वांगाने प्रगतीचा काल कधीच कुणास येत नसतो. या वेळी वापण कर्तृत्वाची शिस्त केलीत तर हवं ते मिळवू शकाल. सध्या तरी निदान आपणास अपयशाची धास्तीच नको.

व्यावसायिक-यशात विक्रम संपादन करून दाखवाल. या आगामी कालात सामाजिक अत्युच्च स्थानही आपणास लाभेल. जे जे शिकस्तीचा प्रयत्न करूनही आजवर घडू शकले नाही ते या काली घडून यावे.

स्थावराचा आणि वाहनाचा प्रश्नही नजीकच्या कालात सुटावा.

दि. ९ ते १२ एप्रिल या कालात अपेक्षेबाहेर यश मिळेल.

**मिथुन :** तुमच्या कर्मस्थानी रवि. शनि सह चार ग्रहांची बैठक सुरू आहे. असा एखादा प्रस्ताव या बैठकीत मंजूर होईल की, त्यामुळे तुमच्या गतिहीन जीवनाला वेग येईल, प्रगती दृष्टिक्षेपात येईल. सांपत्तिक लाभ पदरी टाकणे हा या ग्रहांचा प्रमुख हेतू नाही, चिरंतन कल्याणाच्या घटना घडवून आणणे हेच त्यांचे मनोगत आहे.

आगामी कालात समाजातील प्रतिष्ठेचे स्थान लाभेल, औद्योगिक क्षेत्रात आवाज उठेल, राजकीय क्षेत्रातही तुमची नितांत गरज भासू लागेल.

वेगवान प्रगतीचे आजवर न सुटलेले गणित या वेळी सुटायला लागेल.

रुसलेल्या वाहनाची समजूत निघेल. स्थावरांची समस्या सुटेल.

दि. ९ ते १२ एप्रिल या काली बऱ्याच महत्त्वपूर्ण घटना घडाव्यात.

**कर्क :** आपल्या भाग्यस्थानी इतके अनेक ग्रह एकावेळी येणे – ही घटना मला वाटते तुमच्या हयातीतील-हीच पहिली असावी. भाग्याला उत्थान देणाऱ्या या ग्रह-स्थितीची आपण दखल घेतलीत तर आजवर कधीही घडून आल्या नाहीत व पुढेही घडून येण्याची शक्यता कमी अशा कित्येक चांगल्या गोष्टी या काली घडून याव्यात.

नोकरीत बदल, प्रगती लाभणे, अनपेक्षित लाभ घडणे इ. अनेक गोष्टी या काली सहजासहजी घडून याव्यात.

वैद्यकीय, यांत्रिक, तांत्रिक क्षेत्रांत क्रांती घडवून आणाल. आजवरच्या अनेक असफल आशाआकांक्षा सफल होतील, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

दि. १० ते १२ एप्रिल हाच काल विशेष कार्यात यश देणारा जाणवेल.

**सिंह :** तुमच्या राशीच्या अष्टमस्थानी अनेक अनिष्ट ग्रहांचा जमाव असल्या-मुळे मधून मधून काही अस्वास्थ्याचे प्रकार जाणवले तरी भाग्यस्थानी आलेला एकटा मंगळ विरोधकांचे सारे हल्ले परतवून लावण्याला समर्थ ठरेल.

प्रवास वरचेवर करावा लागेल. दैविक कृपेचा हातोहात प्रत्यय येऊ लागेल. अनेकांचे सहकार्य मिळाल्याने नव्या व्यवसाय-क्षेत्रात पदार्पण घडेल.

या आठवड्यापासून परिस्थितीचा ताण निश्चितच कमी होईल, कौटुंबिक अना-रोग्य निवळेल, मनावरील नैराश्य दूर होईल, आणि उत्साही वातावरण जाणवू लागेल.

दि. ९ ते ११ या काली बऱ्याच अपेक्षा सफल व्हाव्यात.

**कन्या :** सूर्य-शनीसह अनेक स्फोटक ग्रहांचा धिंगाणा सप्तमस्थानी सुरू अस-ताना स्वास्थ्य लाभणे कसे शक्य आहे? गेल्या महिन्यापासून अडीअडचणींशी आपणास झगडावे लागत आहे. तुमच्या असहाय्यतेचा, दुर्बलतेचा फायदा उठवण्याचा हितशत्रूंचाही प्रयत्न सुरू आहे. अष्टमातील मंगळ तर हात धुऊन पाठीशी लागला.

या साऱ्या अनिष्टतेतून पार पडण्यास एकच एक उपाय – मनोनिग्रह आणि निर्धार हाच.

परमेश्वरी कृपेचा याच वेळी प्रत्यय येईल.

वादविवादापासून चार हात दूर राहण्याचा प्रयत्न सतत करा.

व्यवसाय-धंद्यात घसरण जाणवेल. सामाजिक प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही, पण मन बेचैन बनेल.

दि. ७,८,९ एप्रिल काहीसे अनुकूल दिवस.

तूळ : मंगळ सप्तमात आल्यामुळे काही काल खटकल्यासारखे जाणवेलही पण त्यामुळे तुमच्या प्रगतीला काही फारसा बाध येणार नाही. काहीसे जुळते मिळते घेण्याची प्रवृत्ती ठेवलीत तर सहसा तुमच्या प्रगतीच्या आड कोणीही येऊ शकणार नाही.

अपेक्षित प्रगती काही काल लांबेल, सांपत्तिक लाभ फार मोठ्या प्रमाणावर होऊ शकणार नाहीत. व्यावसायिक मूल्यांचे निर्धाराने जतन करण्याचे ठरविलेत तर सध्याची ही अनिष्टता फार काल जाणवणारही नाही.

दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा, मानसिक प्रक्षोभाला थारा देऊ नका. उद्योगधंद्याचे तंत्र काही काल बदला.

दि. ८ ते ११ एप्रिल या काली अपेक्षित यश पदरी पडावे.

वृश्चिक : मंगळ षष्ठातून भ्रमण करीत आहे ही इष्टापत्तीच ठरेल. या वेळी अनेक पेचप्रसंग निर्माण होतील पण त्या काली आपल्या कर्तृत्वाचे असे काही जगाला दर्शन घडेल की, त्यामुळे पुन्हा तुमच्या वाटेला फिरकण्याचे कुणालाही धाडस होणार नाही.

या वेळी सांपत्तिक ताण बराच जाणवेल पण त्यातूनही आपले ईप्सित आपण साध्य करू शकाल. निष्कारण चालत्या गाड्याला खीळ लावणारे असंख्य लोक आपणास भेटतील पण तरीही आपला मार्ग निर्वेध–निष्कंटकच राहील. या काली रासायनिक, यांत्रिक क्षेत्राशी आपला घनिष्ठ संबंध येईल.

दि. ९ ते ११ एप्रिल या काली बऱ्याचशा अपेक्षा सफल व्हाव्यात.

धनू : अनेक ग्रह अजूनही चतुर्थातून संचारत आहेत. पण एकटा मंगळ त्यांची कारस्थाने उधळून लावण्यास पुरेसा आहे. गेल्या महिन्यातील गुरु–मंगळ त्रिकोणापासून तुम्हाला कोणीही विरोध करण्याचे साहस करणार नाही.

स्थावराच्या, नोकरीधंद्याच्या विवंचना मिटायला लागतील. नोकरीधंद्याच्या


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

प्रयत्नाला घवघवीत यश घेण्याची लक्षणे दिसायला लागतील.

पण या काली न पेलण्यासारख्या जबाबदाऱ्या उचलू नका. उद्योगधंद्यात अती साहस करू नका. राजकीय क्षेत्रात पाऊल टाकण्याचे शक्यतो टाळा.

दि. ८, १०, १२ एप्रिल या काली अनुकूल वातावरण निर्माण व्हावे.

**मकर :** मंगळ चौथा आलाय पण पराक्रमातील अनेक ग्रह त्याच्या कारवाया चालू देणार नाहीत. कितीही अडीअडचणी निर्माण झाल्या तरी त्याच्यावरही ते मात करू शकतील.

पण आव्हान देणे आणि आवाहन करणे या दोन्हीही गोष्टी या वेळी टाळाच. सरळमार्गी जीवन जगणाऱ्यांना कोणत्याही अनिष्ट ग्रहाची सहसा बाधा होऊ शकणार नाही. आततायीपणाने कोणतीही गोष्ट करण्यास प्रवृत्त होऊ नका. आणि लोकांनी दिलेल्या तोंडभर आश्वासनाला मुळीच किंमत देऊ नका. व्यापार-धंद्यात नोकरी–चाकरीत दक्षता बाळगण्याची नितांत गरज याच वेळी भासू लागेल.

वाढत्या खर्चाला आळा घालायचा शिकस्तीचा प्रयत्न करा.

दि. ६, ८, ११ एप्रिल या काली नेत्रदीपक यश मिळवू शकाल.

**कुंभ :** मंगळ पराक्रमात आला आहे आणि त्याचेच आपणास या वेळी हरघडी साहाय्य मिळायला लागेल. तो कौटुंबिक अस्वास्थ्य दूर करील, व्यावहारिक पेचप्रसंग सोडवील, सांपत्तिक नैराश्य दूर होईल, नव्या आशा अंकुरायला लागतील, प्रगतीचे एक नवे क्षेत्र या आठवड्यापासून दृष्टिक्षेपात येईल. बेचैन मनावर ईश्वरी कृपेची फुंकर बसल्याने, मनाला दिलासा मिळेल. निर्धारनिष्ठेची जोपासना प्राणपणाने करणाऱ्यांना कोणतीही गोष्ट अपेक्षेप्रमाणे सफल करून घेता येते, याचा आदर्श आपण जगापुढे ठेवू शकाल.

उद्योगधंद्याचे बदललेले तंत्र यशस्वी ठरू लागल्याचा प्रत्यय यायला लागेल.

दि. ६, ८, १० एप्रिल या काली अनेकांचे साहाय्य लाभेल.

**मीन :** तुमच्या राशीच्या आसपास अनेक जहाल ग्रहांचे संचलन सुरू असल्याने हे दिवस आपणांस स्वास्थ्याचे जाणवतील असे वाटत नाही. प्रकृती, पैसा, मन:स्थिती यांवरच यांचा विशेष रोख दिसतो. खर्च आवरत नाही आणि प्राप्ती वाढत नाही हीच एक विवंचना कित्येक दिवस मनात घर करून बसेल.

पण फार काल ही अनिष्ट स्थिती सहन करावी लागणार नाही. सूर्याचे तुमच्या राशीतून उच्चाटन झाले की, बराचसा अनिष्ट काल ओसरल्याचा प्रत्यय यायला लागेल.

अती परिश्रम करणे, जबाबदाऱ्या वाढवून घेणे परिणामी त्रासाचेच ठरेल.

दि. ७, ९, ११ एप्रिल या काली अल्पसे यश लाभेल.

O

## एका वाटेवरच्या गावी

[पृष्ठ ५ वरून]

स्वच्छ; निर्मळ असते. ठिणगी त्याला बोलावून घेते. किंचित इशारा त्याला पुरेसा होतो. जे सगळ्यांच्या ' सहित ' जाते ते या संचलनासहित जागरुकतेने नांदले तर त्यात काय बिघडणार आहे ?

दिनांक २२ व २३ सायंकाळपर्यंत संचलनाचा विचार मांडण्याचे काम माजगावकर करीत होते. सकाळी शाळेतल्या विद्यार्थ्यांशी त्यांनी हितगुज केले. पंचायत समितीच्या अध्यक्षांशी ते बोलले, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पां. सि. देशमुख यांचे बरोबर व परिषदेच्या कर्मचाऱ्यांबरोबर त्यांनी जशी चर्चा केली त्याचप्रमाणे येथील ' मातसा ' प्रकल्पाचे अधिकारी श्री. मा. आ. चितळे व मुंबई पुण्याहून आलेल्या मंडळींशी बोलून संचलनामागची भूमिका त्यांनी विशद केली. या हालचालींचा परिणाम रात्री जाणवला.

" खाडे विद्यालयाच्या पटांगणात " रात्री ९।। वाजता सात आठशे गावकऱ्यांची मोठी सभा जमली. सहा हजार वस्तीच्या घरात ही सभा खूपच मोठी म्हटली पाहिजे. श्रीकृष्ण लेले यांनी " असले हे फळ केवि तपाला " या बा. भ. बोरकरांच्या कवितेने सभा सावधान केली. डॉ. स. गं. मालशे, श्री. रा. सबनीस, विनायकराव पाटील, प्रा. शेवडे यांनी आपल्या भाषणांत प्रचलित भारतीय जीवनातील सर्व क्षेत्रांत पसरलेली ' भिकमागी ' वृत्ती श्रोत्यांपुढे रंगवली. सभेचे अध्यक्ष श्री. पां. सि देशमुख यांची जबाबदारी नाजुक होती. सत्ताधारी पक्षाचे ते एक नेते होते. श्रोत्यातून उठणाऱ्या उपहासाच्या लकेरी ह्या त्यांच्या पक्षाला ओरखाडे वाटावेत अशा तीव्र होत्या. परंतु माजगावकरांनी आपल्या भाषणांत संचलनाची जी आपली भूमिका आकडेवारीने बिनतोड मांडली तिला श्री. देशमुख यांचा मनापासून पाठिंबा आहे, ही गोष्ट दुपारच्या चर्चेतच स्पष्ट झालेली असल्याने फार मोठी अस्वस्थता निर्माण होऊ शकली नाही. अध्यक्षांनी आपल्या भाषणात परकीय धान्य मदत बंद करा, या आक्रोशा सायसाथ, भूकबळी पडले तरी हिंसक आंदोलने निर्माण होणार नाहीत याचीही काळजी घेतली पाहिजे असे सांगितले. राजकारणात संगीताप्रमाणे घराणी असली तर देशमुखांचे भाषण यशवंतराव घराण्यातले होते. शहापुर जिल्ह्यातील-काही गावे निफाडच्या पावलावर पाऊल टाकून स्वावलंबी करण्याचा मनोदय जेव्हा अध्यक्षांनी जाहीर केला तेव्हा श्रोत्यांनीही त्यांना टाळ्यांनी साथ दिली.

२–२।। तास रंगलेली सभा, सामुदायिक राष्ट्रगीताने संपली. अन्न-स्वतंत्रता आंदोलनाची भूमिका त्याच्यावरील सत्ताधारी पक्षाच्या टिपणीसह शेकडो लोकांपर्यंत निश्चित पोचली होती. अपक्ष भूमिकेवरून कुठल्याही पक्षाचे कुंकू न लावता श्री. माजगावकरांनी या आंदोलनाचे संचलन कुशलतेने चालवले आहे याचा हा प्रत्यय होता. संचलनाच्या कपाळावर कुंकू नसले तरी कपाळावरचे गोंदण तर

स्पष्ट आहेच. विवेकानंदांची आणि सावरकरांची विज्ञाननिष्ठा आणि राष्ट्रप्रेम आणि महात्माजी व विनोबा यांच्या भागवत सांप्रदायी चैतन्याच्या मुशीतून या आंदोलनाचा जन्म झाला आहे. यामुळे घोटाळा काय होतो – की ' विनोबांसारख्या अध्यात्मवादी छांदिष्टाची पदयात्रा ही नाही ' म्हणून काही विद्वान आनंद व्यक्त करतात तर ' मूदानी भ्रमिष्ठांनी ' हे आंदोलन गिळून टाकल्याचे भय काहींना वाटते.

या अन्न-स्वतंत्रता संचलनाच्या विविध कक्षा आता अधिक स्पष्ट होऊ लागल्या आहेत. ' फादर फेरर ' चा पैसा या अन्न मदतीच्या पैशांतून कसा उपलब्ध होतो याची विलक्षण हकीकत विनायकराव पाटील यांनी सभेत सांगितली. आदिवासी भागांत डोळे उघडे ठेवून व डोके ठिकाणावर ठेवून जो कुणी फिरेल त्याला होऊ घातलेल्या ' **वारली लँड** ' चे स्वरूप त्वरित ध्यानी येईल. ही लागण आता भारत-भर झाली आहे. मिशनऱ्यांचा हा पैसा परकीय अन्नधान्य मदतीतून कसा निर्माण होतो, हा स्वतंत्र विषय या संचलनातून मुक्त होताच श्री. माजगावकरांनीच हाताळावा.

दि. २४ ला रविवारी सकाळी संचलन पुढच्या गावी निघाले. शहापूर येथील कार्यक्रमासाठी मुद्दाम आलेले डॉ. स. गं. मालशे, खडकवासला येथील मध्यवर्ती जलसंशोधन केंद्राचे अधिकारी श्री. कुलकर्णी, श्री. रंगा मराठे, सौ. निर्मला पुरंदरे ही मंडळी मुंबई पुण्याकडे रवाना झाली. श्री. माजगावकर संचलन स्वयंसेवकांसह ' वाशिंद ' या गावाकडे मार्ग क्रमू लागले.


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

**डोंगरे**

# अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

**के. टी. डोंगरे अँण्ड कं., प्रा. लि.,**

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

**डोंगरे बालामृताचे**

आम्ही काहीजण त्यांच्याबरोबर निरोप देण्यासाठी चालत होतो. सगळे बरोबर चालत होते. तरी प्रत्येकजण विचारात एकटा असावा. समोर माऊली डोंगराची शिखरे गडद निळ्या रंगात कोरल्यासारखी दिसत होती. सकाळचे गार वारे अंगावरच्या कपड्याशी लघळपणा करीत सुखावत होते. गावात संचलन आले आणि आता पुढे निघाले होते. या ३०० मैलांच्या पदयात्रेत श्री. माजगावकरांनी गांवोगाव शेकडो माणसांच्या मनात अन्नब्रह्माचे भीकमागे रूप ठसवले असणारच! हे आंदोलन मग यशस्वी की अयशस्वी याचा हिशेब कसा करायचा?

परार्थलक्ष्मी पडली भूमि, तरी काखेला अमुच्या झोळी।
स्वातंत्र्याच्या पारावरती अमुच्या चारित्र्याची होळी ।।

असा चौफेर निराशाजनक सूर घुमत असताना जे कुणीतरी सांगायला हवे होते ते सांगायला, स्वाभिमानाचा मंत्र द्यायला संचलन निघाले होते. आवाज क्षीण होता. गुदमरलेलाही होता. परंतु अंगावर उन्हे येण्यापूर्वीच जाग आणणारी पक्ष्यांची पहाटेची किलबिल यशस्वी का अयशस्वी? आवश्यक की अनावश्यक? कसं सांगणार आणि कोण ठरवणार?

राजा दुष्यंत हरिणपाडसामागे धावत मारायला तपोवनात शिरला तेव्हा तिथले आश्रमीय बालक त्याला धिटाईने आडवू लागले –" राजा ही हत्या इथे करू नकोस!" माणसांचा स्वाभिमान हा त्या आश्रमातल्या हरणाच्या पाडसासारखा असतो. कुणीतरी राजसत्तेला धिटाईने सांगायला हवे—

"अभाग्यांनो सगळे वैराण केलेत. आता ही हत्या तरी करू नका!"

श्री. माजगावकरांनी हा धिटाईचा आवाज सर्वांना ऐकवण्याचे ठरवले आहे. हा आवाज क्षीण असला तरी आजच्या घटकेचा हा एकच सच्चा आवाज आहे.

संचलनाला निरोप देऊन परत फिरलो तेव्हा उन्हे चांगलीच झाली होती. माजगावकर ज्या नव्या गावात शिरत होते तिथे कुणा मंत्र्याच्या हस्ते 'प्रसूति गृहाचे' उद्घाटन होते. सरकारी जिपा धावत होत्या, पोलिस गाड्या फिरत होत्या. सगळी माणसे व्यवहारामागे धावत होती. इथे गळ्यांत हार नव्हते की स्वागत नव्हते. होता तो उपहासच. प्रसूतिगृहाचे उद्घाटन एकीकडे चालू होते आणि 'वेदना' एकाकी अवधान मागत होती. मला तिथे फार काळ थांबावेसे वाटेना.

परंतु स्वतःच्या उपेक्षेला श्री. माजगावकर गमतीने हसत होते. मला म्हणाले– "हे नवीन नाही" पहिले भूदान जिथे झाले त्या पोचमपल्लीला पायी जाऊन– 'भूमिपुत्र' न पाहता 'विनोबा मंदिर' पाहून आल्यामुळे निराशा त्यांनी पचवली असावी.

मी मात्र विपण्ण झालो. अजून आहे. ○

'प्रतिपच्चंद्ररेखेव–८' 'माणूस'च्या पुढील अंकी – संपादक

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No M H-649

अल्पावधीत लोकप्रिय झालेली

स्वस्तिक

पादत्राणे

आकर्षक रंग
लेटेस्ट डिझाईन्स
टिकण्यास मजबूत




स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि., पुणे 3.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**